जून २०१४/ पाने ६०/ किंमत ₹ १०

# लोकराज्य



## फुलणारे हसू - घडणारा महाराष्ट्र

# फुलणारे हसू - घडणारा महाराष्ट्र






















१) चंद्रपूर येथील रमेश चांदेकर यांना रमाई घरकूल योजनेमुळे हक्काचे घर मिळाले.
२) वर्धा जिल्ह्यातील गिरगाव येथील रामकृष्ण आणि रतन जीवतोडे या बंधुंना शासनाच्या धोरणामुळे कसण्यासाठी हक्काची जमीन मिळाली.
३) रोजगार हमी योजनेमधून बांधलेल्या वनराई बंधाऱ्यातील पाण्यामुळे यशवंत उघडा व हिरा यशवंत उघडा या आदिवासी कुटुंबास भाजीपाला पिकवता आला.
४) भंडारा जिल्ह्यातील झाडगाव या घनदाट जंगलात वसलेल्या आदिवासी गावातील महिलांनी दुग्धोत्पादनातून आर्थिक उन्नती साधली.
५) दुष्काळात डाळींबाच्या बागा उद्ध्वस्त झालेल्या बीड जिल्ह्यातील आंबील वडगाव येथील अंकुश दराडे यांना शासनाच्या मदतीने जगण्याची नवी उमेद मिळाली.
६) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेद्वारे मुंबईतल्या दत्तात्रय मोरे या गिरणी कामगाराची मोफत शस्त्रक्रिया झाली.
७) शिक्षण हक्क कायद्यातील आरक्षणामुळे लातूर जिल्ह्यातील हरंगुळ येथील भक्ती बरुरे या गरीब कुटुंबातील मुलीला नामांकित इंग्रजी शाळेत प्रवेश मिळाला.
८) शासनाच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेमुळे गरीब घरातील आश्विनी कांबळे रशियात जाऊन डॉक्टर बनली.
९) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठीच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून सातारा येथील परवेझ नाईकवडी या तरुणाचे सनदी अधिकारी होण्याचे स्वप्न साकारले.
१०) हालाखीच्या परिस्थितीवर मात करीत नेमबाजीमध्ये पदक मिळविणारा बीड जिल्ह्यातील नवनाथ फरताडे याला जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून थेट नियुक्ती मिळाली.

वर्ष ६६ वे | अंक १ | मे २०१४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

**संपादन**

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर – म्हैसकर
- मुख्य संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- सहसंपादक — किरण केंद्रे

**प्रशासन**

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम

**सजावट**

- मुखपृष्ठ — श्रावण गुरव
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
**email :** lokrajya2011@gmail.com

**वितरण आणि वर्गणीदार**

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
**email :** lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

## अंतरंग


### संवेदनशील शासन



सरकारने घेतलेल्या निर्णयामध्ये सामाजिक भावना नसतील तर तो निर्णय परिपूर्ण म्हणता येणार नाही. राज्याच्या स्थापनेपासून आजतागायत जे महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले आहेत त्या प्रत्येक निर्णयाच्या पाठीमागे सामाजिक जाणिवा होत्या. त्यामुळेच महाराष्ट्र नेहमीच संपूर्ण देशात एक नेतृत्व करणारे राज्य ठरले. ६

### सर्वसामान्य जनतेला बळ



आघाडी शासनाने विविध योजना राबवून शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्य जनतेला बळ देण्याचे काम केले आहे. वंचित, उपेक्षित घटकांच्या आर्थिक उन्नतीसोबतच सामाजिक समरसतेसाठी शासन सातत्याने प्रयत्नशील राहिले आहे. आर्थिक उन्नतीची फलश्रुती म्हणजे गेल्या दशकभरात राज्यातील दरडोई उत्पन्नात २४ हजार ३५ रुपयांवरुन १ लाख ५ हजार ४९३ रुपयांपर्यंत वाढ झाली. ९

### सुप्रशासनावर भर

श्री. ज. स. सहारिया यांनी सहा महिन्यांपूर्वी राज्याच्या मुख्य सचिवपदाची सूत्रे हाती घेतली. गेल्या सहा महिन्यांमध्ये त्यांनी प्रशासनाला गतिमान करण्यासोबतच नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. सुप्रशासनावर त्यांचा भर आहे. त्यांची विशेष मुलाखत... ११

### मदतीचा हात



राज्यात फेब्रुवारी- मार्च २०१४ या कालावधीमध्ये गारपीट व अवेळी पाऊस यामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली. शेती व फळपिकांच्या नुकसानीसाठी अर्थसाहाय्यासोबत प्रचलित दरापेक्षा अधिक दराने मदत देण्याचा निर्णय शासनाने तातडीने घेतला. १३

### हरितक्रांतीचा नवा अध्याय



कृषी क्षेत्राला प्राधान्य देण्यात आल्याने कृषी उत्पादनात मोठी वाढ झाली. फळांची निर्यात वाढली. दहा वर्षांत फलोत्पादनात चार पटीने वाढ झाली. २०

### अन्नसुरक्षेकडे...



राज्यात १ फेब्रुवारी, २०१४ पासून अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्याची अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्र अग्रेसर ठरले आहे. ३१

### सुकन्येचे मनोधैर्य

राज्य शासन महिलांसाठी मनोधैर्य, सुकन्या आणि इतर योजना राबवित आहे. यामुळे महिला सक्षमीकरणाला हातभार लागणार आहे. ४०

### गावांचा ग्लोबल चेहरा

ग्रामीण भागातील लोकांना शहरी भागाप्रमाणे किमान सुविधा आणि रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध करून दिल्यास गावातून शहराकडे होणारे स्थलांतर कमी होऊ शकेल. याच हेतूने ग्रामविकास विभाग अनेक योजना राबवीत आहे. ४२

### आरोग्यम् धनसंपदा...

नागरिकांना मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया उपलब्ध करून देण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, ब्लड ऑन कॉल, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, मोफत औषधे यासारख्या योजना सुरू करण्यात आल्या. ५१

**राशिवार**

जलसमृद्धीचे पाझर ...२३
सहकारातून समृद्धीकडे ... २९
प्रेरणादायी यशकथा

### कौतुकास्पद

माहे मार्च-एप्रिल २०१४ च्या अंकात लोकसभेच्या निवडणुकीच्या कालावधीतच आपण निवडणूक प्रक्रिया, आदर्श आचारसंहिता, निवडणुकांचा इतिहास, मतदारसंघांचे नकाशे यासंबंधी उपयुक्त माहिती छापून आणलीत, हे अत्यंत कौतुकास्पद आहे. या माहितीचा फायदा सामान्य जनतेस निश्चितच होईल.

– **जॉनी जोसेफ,** उप लोकआयुक्त, महाराष्ट्र


----------

### महाराष्ट्र मतदानासाठी सज्ज

मार्च-एप्रिल २०१४ च्या लोकराज्य मासिकामध्ये १६ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीविषयी अतिशय सखोलपणे माहिती दिली आहे. आदर्श आचारसंहिता कशाप्रकारे असावी याविषयी विस्तृत माहिती या अंकात आहे. महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघांचे अचूक दर्शन यामधून झाले. हा अंक वाचून झाल्यावर असे वाटते खरोखरच महाराष्ट्र मतदानासाठी सज्ज झाला आहे..

– **अतुल मार्कंडे,** उटाडेवाडी (ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद)

### निवडणूक विशेषांक : मानाचा तुरा





लोकराज्यचा प्रत्येक अंक हा जणू विशेषांक असतो. कोणत्या ना कोणत्या निर्णयास्तव वाहिलेला अंक अगदी संग्राह्य असतो. लोकसभा निवडणुकांचा बिगुल वाजला आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय कंबर कसून कामाला लागले आणि लोकराज्यचा मार्च-एप्रिल महिन्याचा संयुक्त 'निवडणूक विशेषांक' प्रकाशित करण्यात आला. अगदी संग्रही ठेवण्यासारखा. संदर्भ तर इतके की तुम्ही बोटे तोंडातच घालाल. मान्यवरांच्या लेखणीतून उतरलेले खूप काही या अंकात आहे.

– **योगेश त्रिवेदी,** ( दै. प्रहार १३ एप्रिल २०१४)

---


### विकासाचा ग्रंथ

सर्वांचे लाडके लोकराज्य हे माहितीचे आगर आहे. शिक्षण, उद्योग, पर्यटन, सामाजिक न्याय, आरोग्य, आदीवासी विकास व इतर माहिती




उपयुक्त असते. लोकराज्यचा प्रत्येक अंक वाचनीय व संग्राह्य असतो. असे मासिक देशातील एकमेव मासिक असावे. लोकराज्यने जनतेला डोळस केले. प्रशासकीय कार्यालयातून एखाद्या योजनेची माहिती अधिकारी/कर्मचारी देत नाहीत अशा वेळी लोकराज्य बळ देते. लोकराज्य 'विकासाचा ग्रंथ'च आहे. आत्मविश्वास जागृत करतो. अपंगांच्या विविध सवलती आणि योजना याविषयी लोकराज्यमधून सविस्तर माहिती द्यावी.

– **दीपक सातोरे,** नांदेड




### माहितीपूर्ण व वाचनीय

फेब्रुवारी,२०१४ 'लोकराज्य'चा मराठी भाषा विशेषांक प्राप्त झाला. या अंकात प्रकाशित केलेले डॉ.गणेश देवी, डॉ.नागनाथ कोतापल्ले, श्री. राजन खान, प्रा.रंगनाथ पठारे, श्री.अरुण साधू, डॉ.प्रमोद मुनघाटे, डॉ.प्रदीप आगलावे आदी मान्यवरांचे लेख अतिशय माहितीपूर्ण व वाचनीय आहेत.


– **अभय यावलकर,** खाजगी सचिव, पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्यमंत्री

---

### लोकराज्यमुळे अधिकारी झाले

स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी लोकराज्य खूपच फायदेशीर आहे. राज्यातील विविध योजनांची माहिती सहज देण्यात लोकराज्यचा सिंहाचा वाटा आहे. लोकराज्यच्या नियमित वाचनामुळे मी विक्रीकर निरीक्षक परीक्षेत राज्यात प्रथम आले (२०१२) आणि माझी अधिकारीपदी निवड झाली त्यामुळे मी लोकराज्यची खूप ऋणी आहे.

– **चारुशीला प्रकाश देशमुख (मोहिते),** जि.सातारा




'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

**वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)**

लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू असल्यामुळे लोकराज्यचा मे २०१४ या महिन्याचा अंक प्रकाशित झाला नाही. सर्व वर्गणीदारांची मुदत एक महिन्याने वाढवून देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी**

http://dgipr.maharashtra.gov.in

## अतिथी संपादकीय



# विकासाचा मानवी चेहरा

लोकराज्यशी माझे जुने नाते आहे. यापूर्वी सन २००६ ते २००९ या कालावधीत महासंचालक म्हणून कार्यरत असताना शासन आणि लोक यांच्यामधील संवाद दृढ करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. शासनाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचा व लोकांचा प्रतिसाद (feedback) शासनापर्यंत नेण्यासाठी अनेक प्रभावी माध्यमे निर्माण केली. ही माध्यमे आजघडीला जनमानसात चांगलीच रुजली आहेत. याच काळात लोकराज्यला 'न्यू लूक' दिला गेला. आशय आणि अभिव्यक्तीचे अनेक यशस्वी प्रयोग केले गेले. परिणामस्वरूप लोकराज्य लोकांच्या गळ्यातील ताईत बनले. वितरणाच्या बाबतीत तर लोकराज्यने विक्रमी उच्चांक स्थापित केला. वाचकांचा प्रतिसाद इतका मोठा होता की पाहता पाहता लोकराज्य देशातील सर्वाधिक खपाचे दुसऱ्या क्रमांकाचे मासिक ठरले. ABC अर्थात ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशन या संस्थेनेही यावर शिक्कामोर्तब केले. जूनच्या अंकापासून लोकराज्यचे अतिथी संपादन करण्याची जबाबदारी आली आहे. एका नव्या ऊर्जेने मन भरून आले आहे.

लोकराज्यचा जूनचा अंक हा शासनाच्या सामाजिक कल्याणाच्या विविध योजनांची माहिती देणारा आहे. सामाजिक हिताच्या योजनांनी महाराष्ट्राच्या विकासाला मानवी चेहरा मिळाल्याचे स्पष्टपणे दिसते. विकासाची फळे जेव्हा शेवटच्या घटकांपर्यंत पोहचतात तेव्हाच तो घटक राज्याच्या सर्वांगीण विकासात आपले योगदान सक्षमतेने आणि समर्थतेने देऊ शकतो. महाराष्ट्र याबाबतीत नेहमीच इतर राज्यांपेक्षा एक पाऊल पुढे राहिला आहे.

लोकराज्यच्या या अंकात समाजातील विविध घटकांसाठी असलेल्या योजना, निर्णय आणि धोरणांचा विस्तृत आढावा घेण्यात आला आहे. याच अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री यांनी त्यांच्या लेखांमधून विशेष भाष्य केले आहे. कोणत्याही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सुप्रशासन महत्त्वाचे असते. माहिती तंत्रज्ञान आणि सुप्रशासन यावर लक्ष केंद्रित केलेले मुख्य सचिव मा.श्री. ज. स. सहारिया यांची विशेष मुलाखत या अंकात समाविष्ट करण्यात आली आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या यशकथा हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. या यशकथा प्रेरणादायी आणि शासकीय योजनांची उपयुक्तता दर्शविणाऱ्या आहेत.

देशातील पहिले शासकीय न्यूज पोर्टल 'महान्यूज' सुरू करण्याचा आम्ही केलेला प्रयोग प्रचंड यशस्वी ठरला. वेबविश्वात आज या न्यूज पोर्टलने मानाचे स्थान मिळविले आहे. नुकतेच 'महान्यूज'ला मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुवर्ण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शासकीय माध्यमे प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहचतात यावर शिक्कामोर्तब करणारा हा पुरस्कार आहे. यानिमित्त महान्यूज टीमचे मन:पूर्वक अभिनंदन. शासनाची इतरही माध्यमे अशाच प्रकारे उत्कृष्ट कामगिरी बजावतील अशी आशा आहे.

लोकराज्यच्या इतर अंकाप्रमाणे हा अंकही आमच्या वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# संवेदनशील शासन

**सरकारने घेतलेल्या कुठल्याही निर्णयामध्ये सामाजिक भावना नसतील तर तो निर्णय परिपूर्ण म्हणता येणार नाही. राज्याच्या स्थापनेपासून आजतागायत जे महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले आहेत त्या प्रत्येक निर्णयाच्या पाठीमागे सामाजिक जाणिवा होत्या. त्यामुळेच महाराष्ट्र नेहमीच संपूर्ण देशात नेतृत्व करणारे राज्य ठरले. पंचायतराज्य व्यवस्था, रोजगार हमी योजना, माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी, घरेलू कामगार कायदा, अशी अनेक उदाहरणे देता येतील. गुटखाबंदीसारखा निर्णय, वरकरणी आरोग्याशी संबंधित असला तरी यामागे सामाजिक स्वास्थ्य आणि समाजाच्या हिताचाच विचार आहे. अनिष्ट चालीरीती आणि कुप्रथा बंद करण्यासाठी जादूटोणा विरोधी कायदा आणून राज्याने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. जातीचे दाखले देण्यासाठी असलेली जुनी आणि किचकट प्रक्रिया सोपी आणि ऑनलाइन करण्यात आली. मुंबईतल्या मोडकळीस आलेल्या इमारतींमधील १५ लाख रहिवाशांना अपघाती विमा देणे, दुष्काळ, गारपिटीत शेतकऱ्यांना तातडीने मदत करणे, गिरणी कामगारांना स्वस्तात घरे देणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ई-स्कॉलरशीप सुरू करणे हे निर्णय लोकांचे जीवनमान उंचावणे आणि गरिबांच्या आयुष्यात परिवर्तन घडविणारे आहेत. सांगताहेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण...**

सामाजिक क्षेत्रातील निर्णय सरकारने संवेदनशीलपणे घ्यायचे असतात. मोठमोठे उद्योगधंदे आले किंवा रस्ते, उड्डाणपूल बांधले, मोठ्या टाऊनशिप, मॉल्स आले, हॉटेल्स आले, म्हणजेच काही विकास नव्हे. विकास माणसांचा झाला पाहिजे, त्यांच्यातील क्षमता वाढली पाहिजे. इमारतींची उंची वाढणे म्हणजे खरी प्रगती झाली असे नाही.

आम्ही जी विकासाची पंचसूत्री मांडली आहे, त्यामध्ये शेतीला चांगले दिवस आणणे, शिक्षणाचा दर्जा सुधारणे, सर्वांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार आरोग्य देणे यावर भर दिला आहे.

**वेळेवर मदत**

मी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली त्या काळात महाराष्ट्र सातत्याने दुष्काळाचा सामना करीत होता. काही ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता होती. लघुसिंचन योजना, तुषार आणि सूक्ष्म सिंचन योजना, सिमेंटचे बंधारे अशा माध्यमातून पाणी अडवून आणि त्याचा योग्य वापर करून दुष्काळाचा कायमस्वरूपी मुकाबला करण्याचे पाऊल आम्ही टाकले आणि त्यात बऱ्याच प्रमाणात यशस्वी पण झालो. पाण्याचा दुष्काळ गेल्यावर्षी इतका टोकाला गेला होता की, राज्यातील १५ हजार वाड्या-वस्त्यांना



साडेपाच हजारपेक्षा जास्त टँकरने पाणी पुरवावे लागले. सरकारने केलेल्या मदतीमुळे अडीच लाख हेक्टर फळपिकांना आणि तीन लाख शेतकऱ्यांना फायदा झाला. एकंदर ६० लाख दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत पोहचविण्यात आली.

नुकत्याच झालेल्या भयंकर गारपिटीतही शासनाने अगदी वेळीच मदत केली. दीड हजार कोटी रुपयांचे वाटप आतापर्यंत करण्यात आले असून आणखी दीड हजार कोटी रुपयांची मदत देण्यात येत आहे.

**सहा जातींचा इतर मागासवर्गात समावेश**

मध्यंतरी आम्ही एक निर्णय घेतला आणि वैश्यवाणी समाजासह राज्यातील ६ जातींचा इतर मागासवर्गात समावेश केला. आज हा निर्णय या समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. गेली अनेक वर्षे हा समाज सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक लाभापासून वंचित होता. या समाजाची सर्वांगीण प्रगती आता शक्य होईल.

**झोपडपट्टीवासीयांना दिलासा**

नुकताच आम्ही वर्ष २००० पर्यंतच्या झोपड्या कायम करण्याबाबतचा घेतलेला निर्णय हादेखील आमच्या शासनाचा सामाजिक संवेदना दर्शवणारा निर्णय आहे. या झोपड्यांमधून अनेक वर्षे गरिबांच्या पिढ्या राहत आहेत. या झोपड्यांना संरक्षण मिळून काही सोयीसुविधा देखील मिळतील. दलित वस्ती सुधार योजनेमुळे राज्याच्या शहरी आणि ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या नागरिकांच्या वस्त्यांना मूलभूत सुविधा मिळाल्या आहेत.

**वीज दरात २० टक्के सवलत**

विजेच्या वाढत्या दरामुळे उद्योग, ग्राहक, शेतकरी हे सगळे ग्राहक शासनाकडे सातत्याने मागणी करीत होते. त्याप्रमाणे या वीज दरातही २० टक्के सवलत देण्याचा शासनाचा निर्णय देखील असाच दिलासा देणारा आहे.

**३४ लाख लोकांना दाखले**

महसुलाचे उदाहरण घ्या. सर्वसामान्य नागरिकांना किरकोळ कामांसाठी रडविणारे महसूल खाते हसवणारे कसे होईल, या दृष्टीने आम्ही सर्वांनी प्रयत्न केले आणि आज तेच रडविणारे महसूल खाते सामान्य नागरिकांना हसवणारे आणि समाधान देणारे ठरल्याचे दिसते. महसूल आणि विविध विभागाच्या योजना, माहिती आणि दाखले थेट गावपातळीवर शिबीर भरवून देण्यात येत आहेत. राज्यामध्ये ३४ लाख लोकांना दाखले मिळाले आहेत, यातून लोकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा खरा अर्थ कळला पाहिजे. रांग दिसली, की आपले कुठेतरी चुकते, हे अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवावे हे नेहमी मी सांगतो.

**अन्न सुरक्षा योजना**

अतिशय नाममात्र किमतीमध्ये महिन्याचे राशन देणारी अन्न सुरक्षा योजना आहे. राज्यात ती सुरू झाली असून व्यवस्थित सुरू आहे. या योजनेमुळे आता देशातील सुमारे ७२ टक्के नागरिकांच्या अन्नाची सोय झाली असून जगातील इतर कोणत्याही देशात भारतातील या योजनेसारखी योजना नाही. ही योजना अस्तित्वात येण्यात शेतकऱ्यांचा फार मोठा वाटा आहे. शेतकऱ्यांनी नवीन बियाणे, खते, साधने यांचा वापर करून अन्नधान्याचे विक्रमी उत्पन्न काढले त्यामुळे, मुबलक अन्न-धान्याचा साठा होऊ शकला. परिणामी लोकांना अतिशय नाममात्र दरात धान्य पुरवठा करणे शक्य होत आहे.

**महिला, ज्येष्ठ, भूमिहीन सर्वांचा विचार**

राज्यातल्या वाड्या-पाड्यांवर

## शिष्यवृत्तीची रक्कम बँक खात्यात



गेल्या वर्षीपासून आदिवासी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम बँक खात्यात थेट जमा करण्याचा निर्णयही महत्त्वाचा ठरला. आदिवासींसाठी आश्रम शाळा आणि शासकीय वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत. त्यांच्यामधील शाळा सोडण्याचे प्रमाण कमी व्हावे या हेतूने सुवर्ण जयंती आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना सुरु केली. १२ लाख विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळते आहे. २८ शासकीय आदिवासी निवासी शाळांचे रूपांतर मिनी आयटीआयमध्ये करण्यात आले आहे. त्याचाही फायदा निश्चितपणे होतो आहे.



**सुकन्या योजना : ३५ कोटी तरतूद**

राज्यातील मुलींना चांगले शिक्षण मिळणे, त्यांचे आरोग्य सुधारणे, बालविवाह थांबविणे, मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक तरतूद करणे, मुलींचा जन्मदर वाढविणे यासाठी सुकन्या योजना सुरू केली. चालू वर्षी यासाठी ३५ कोटी ६० लाख तर पुढील वर्षी ५७६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**मनोधैर्य योजना : २९६ महिलांना मदत**

बलात्कार, लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्लापीडित महिला आणि बालकांचे पुनर्वसन करण्यासाठी मनोधैर्य योजना देखील आमच्या सामाजिक जाणिवांचे प्रतीक आहेत. या योजनेसाठी ५ कोटींची तरतूद करण्यात आली होती. यात एकूण २९६ महिलांना आर्थिक साहाय्य करण्यत आले. पुढील वर्षात १५ कोटींची तरतूद केली आहे.

**शुभमंगल सामुदायिक विवाह**

शुभमंगल सामुदायिक विवाह योजना केवळ गरीब कुटुंबासाठी होती, आता त्याचे लाभ विधवा, परित्यक्त्या, बेघर महिला यांनादेखील मिळतील. यातून जास्तीत जास्त दोन मुलींच्या विवाहासाठी आर्थिक साहाय्य केले जाईल.

## सर्वोच्च प्राधान्य आरोग्याला




**सुसज्ज रुग्णवाहिका**

आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णांना सुरक्षित आणि दर्जेदार रक्त वेळेत पुरविणारी ब्लड ऑन कॉल ही योजना संपूर्ण राज्यात सुरू झाली आहे. आता केवळ १०८ क्रमांक डायल करताच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा रुग्णवाहिका काही मिनिटात धावून येतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. अशा ९७६ रुग्णवाहिका रस्त्यावर आहेत. ही सेवा सुरू झाल्यापासून २० हजार लोकांना वेळीच मदत झाली आणि त्यांचे प्राण वाचले आहेत.

**जीवन देणारी योजना**

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा फायदा आतापर्यंत सव्वा दोन लाख नागरिकांना झाला आणि त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात आले. संपूर्ण राज्यात ही योजना लागू केल्यामुळे गरिबांना आरोग्य सुविधा मिळणार आहेत.

**रुग्णांना मोफत औषधे**

राज्यातील शासकीय इस्पितळे आणि वैद्यकीय केंद्रांमध्ये रुग्णांना मोफत औषधे हा असाच एक महत्त्वाचा निर्णय आहे. गंभीर आजारावरील औषधांसाठी रुग्णांना दुकानांमध्ये जावे लागणार नाही.

**माता आणि अर्भक मृत्यूदर देशात कमी**

राज्याने विविध उपाय योजल्यामुळे गेल्या ७-८ वर्षात माता मृत्यूदर १३० वरून ८७ वर आला आहे. अर्भक मृत्यूदर ३६ वरून २५ पर्यंत कमी झाला आहे.

ग्रामपंचायती स्थापन करता याव्यात, यासाठी आम्ही 'पेसा' (पंचायत 'एक्स्टेंशन टु शेड्युल्ड') ॲक्टमध्ये आवश्यक सुधारणा केली. आम आदमी विमा योजनेने ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजुरांना विम्याचे कवच मिळाले. ३९ लाख जणांना त्याचा फायदा झाला. केंद्र सरकारने खरेदी केलेल्या धानावर प्रति क्विंटल २०० रुपये बोनस देण्याचा निर्णय, कोरडवाहू शेती अभियान, दारिद्र्यरेषेखालील बेघर कुटुंबांना इंदिरा आवास योजनेतून सुमारे ५ लाख घरकुले अशा अनेक निर्णयांचा उल्लेख या ठिकाणी करावा लागेल.महिला धोरण,ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण जाहीर करून शासनाने मोठे पाऊल टाकले आहे.

**सर्व तालुक्यांत विकास कामे**

राज्यातील सर्व तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक ठरवून त्यानुसार विकास कामांना प्राधान्य देण्याची भूमिका मी घेतली आहे. त्यासाठी शिक्षण, आरोग्य, पाणी, स्वच्छता, दरडोई उत्पन्न आदी निकषांच्या आधारे तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक ठरवून त्या त्या भागाची प्रगती केली जाणार आहे.

आपला समाज, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गेल्या दशकभरात, विशेषत: चार वर्षांच्या कालावधीत शासनाने कित्येक क्रांतिकारी निर्णय घेतले आहेत पण अद्याप मोठा पल्ला गाठायचा आहे याची कल्पना आम्हाला आहे. सर्वंकष विकासात सामाजिक क्षेत्राला महत्त्व आहे आणि हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आम्ही वाटचाल करणार आहोत.

**- शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे**
(मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी)

## अल्पसंख्याकांसाठी विकासाचा मार्ग

प्रगतीचा विचार करताना कोणत्याही समूहाला मागे ठेवून चालणार नाही. महाराष्ट्रात त्या अनुषंगाने व्यापक प्रयत्न करण्यात आले आहेत. राज्यात २००८ पासून कार्यरत असलेल्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत शिष्यवृत्ती योजना, आयटीआय व पॉलिटेक्निकमधील दुसऱ्या पाळीतील प्रवेश योजना, अल्पसंख्याक शाळांसाठी २ लाख रुपये अनुदान योजना, मुलींसाठी वसतिगृहे, उर्दू अकादमीचे सक्षमीकरण, अल्प-संख्याकबहुल शहरे व गावांसाठी अनुदान योजना, मदरशांचे आधुनिकीकरण अशा अनेक योजनांच्या माध्यमातून अल्प-संख्याकांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले गेले.



# सर्वसामान्य जनतेला बळ

**आघाडी शासनाने गेली साडेचौदा वर्षे विविध महत्त्वाकांक्षी योजना राबवून राज्यातील शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्य जनतेला बळ देण्याचे काम केले आहे. वंचित, उपेक्षित घटकांच्या आर्थिक उन्नतीसोबतच सामाजिक समरसतेसाठी आघाडी शासन सातत्याने प्रयत्नशील राहिले आहे. आर्थिक उन्नतीची फलश्रुती म्हणजे गेल्या दशकभरात राज्यातील दरडोई उत्पन्नात २४ हजार ३५ रुपयांवरुन १ लाख ५ हजार ४९३ रुपयांपर्यंत वाढ झाली. सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार. 'लोकराज्य'ला मुलाखत देताना त्यांनी विविध सामाजिक घटकांच्या अंगाने राज्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यासंदर्भात त्यांच्याशी साधलेला हा संवाद...**



**प्रश्न: शेतकऱ्यांना गेल्या दोन वर्षांपासून वेगवेगळ्या संकटांचा समाना करावा लागत आहे. अशावेळी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती भूमिका घेतली?**

**श्री. पवार :** गेल्या वर्षात राज्याला दुष्काळ, अतिवृष्टी आणि गारपीट अशा विविध नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. एकाच वर्षांत सर्व प्रकारची नैसर्गिक संकटे अशी परिस्थिती बहुदा पहिल्यांदाच निर्माण झाली असावी; परंतु शासनाने शेतकऱ्यांच्या पाठिशी भक्कमपणे उभे राहण्याची भूमिका घेतली. फेब्रुवारी-मार्च २०१४ मध्ये झालेल्या गारपीटग्रस्त शेतकऱ्यांकडून बँकांनी डिसेंबर २०१४ पर्यंत कर्जवसुली करू नये, असे आदेश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुढील तीन वर्षांकरिता पुनर्गठन केले जाणार आहे. २०१३-१४ च्या पीक कर्जावरील व्याज माफी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जिरायती पिकांसाठी हेक्टरी १० हजार, बागायती पिकांसाठी हेक्टरी १५ हजार; फळबागांसाठी हेक्टरी २५ हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विदर्भात जून ते सप्टेंबर २०१३ या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळे मोठ्याप्रमाणात पिकांची हानी झाली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत म्हणून ४५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. आदरणीय पवार साहेबांच्या अध्यक्षतेखालील केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय समितीनेही ९२२ कोटी रुपयांचा निधी अतिवृष्टीग्रस्तांसाठी मंजूर केला होता. त्याचबरोबर रस्त्यांच्या दुरुस्ती आणि इतर कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला.

राज्याला २०११-१२ आणि २०१२-१३ या दोन वर्षी दुष्काळ आणि पाणी टंचाईला सामोरे जावे लागले होते. त्यावर मात करण्यासाठी १,३१७ चारा छावण्यांवर १,४३४ कोटी रुपये खर्च करण्यात आले. जून २०१३ मध्ये ५,५०० टँकरद्वारे अंदाजे १५ गावे आणि वाड्यांना पाणीपुरवठा करण्यात आला. केंद्र शासनाकडून एकूण २,५६९ कोटी रुपयांची मदत मिळविण्यात आपल्याला यश आले होते.

**प्रश्न : शेतीच्या कायमस्वरूपी आणि शाश्वत विकासासाठी शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना केल्या आहेत?**

**श्री. पवार :** शेतकऱ्यांसाठी 'महाकृषी संचार'सारखी सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. कीड, रोग, सर्वेक्षण व सल्ला सेवांसारखी अत्याधुनिक योजना राबविली जात आहे. जमीन, आरोग्य सुधारणा योजनेंतर्गत 'सॉईल हेल्थ कार्ड'चे वाटप करण्यात आले आहे. जागतिक निविदा मागवून सूक्ष्म सिंचन साहित्याच्या दराची निश्चिती केल्याने शेतकऱ्यांची फसवणूक थांबली व खर्चामध्ये २५ ते ३० टक्के बचत झाली आहे. 'ई-ठिबक अज्ञावली'द्वारे ठिबक सिंचन अनुदान योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. ऐनवेळी टंचाई भासू नये म्हणून राज्यात ठिकठिकाणी रासायनिक खतांचा सुरक्षित साठा निर्माण केला जातो. कोरडवाहू शेती अभियानास मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली आहे.

**प्रश्न: पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मासेमारीसारख्या पूरक व्यवसायांना चालना देण्यासंदर्भात शासनाने कोणती पावले उचलली आहेत?**

**श्री. पवार :** कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी १ हजार मांसल कुक्कुट पालनाची योजना कार्यान्वित केली आहे. कुक्कुट पालन शेळीवाटप योजना, कृत्रिम रेतनाद्वारे उत्कृष्ट जातीच्या गायी-म्हशींची पैदास व आनुवंशिक सुधारणा कार्यक्रम राबविला जात आहे.

ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी मासेमारीला चालना देण्यासाठी मच्छीमारांना विविध प्रकारे आर्थिक साहाय्य केले जात आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील जाकीमिऱ्या, वरवडे, काळबादेवी, साखरीआगर आणि बुरोंडी या पाच बंदरांचा विकास करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १०४ मच्छीमार गावांमध्ये मासळी उतरविण्याच्या केंद्रांवर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

**प्रश्न: सहकाराच्या माध्यमातून आजही शेती आणि उद्योगाला चालना मिळू शकते. त्याकडे आपण कसे बघता?**

**श्री. पवार :** शेतकऱ्यांना आपण सहकाराच्या माध्यमातून प्रभावीपणे पीककर्जाचे वाटप करतो. २००५-२००६ मध्ये ५ हजार १५७ कोटी रुपयांचे पीककर्ज वाटप करण्यात आले होते. २०१३-१४ या आर्थिक वर्षात डिसेंबर २०१३ अखेर हा आकडा २५ हजार १५० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. शेतकऱ्यांना १ लाख रुपयांपर्यंतचे अल्पमुदतीचे पीककर्ज शून्य टक्के व्याज दराने दिले जाते. 'डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना' अत्यंत लोकप्रिय झाली आहे.

गाळप हंगाम २०१३-१४ साठी साखर कारखान्यांना ऊस खरेदी कर माफ करण्याचा निर्णय आपण घेतला होता. सहवीज प्रकल्प राबविण्यासाठी साखर कारखान्यांना प्रोत्साहन देण्याची शासनाची भूमिका आहे.

**प्रश्न: अन्न सुरक्षा योजनेची राज्यात कशाप्रकारे अंमलबजावणी करण्यात येत आहे?**

**श्री. पवार :** एकही व्यक्ती उपाशी राहू नये यासाठी राज्यात १ फेब्रुवारी २०१४ पासून अन्न सुरक्षा योजना लागू झाली आहे. या योजनेचे एकूण ८ कोटी ७७ लाख लाभार्थी आहेत. त्यांच्यापैकी १ कोटी ७७ लाख लाभार्थींचे दायित्व राज्य शासन उचलणार आहे.

**प्रश्न: देशाच्या किंवा राज्याच्या विकासाच्या दृष्टीने आरोग्यदायी समाज किंवा पिढी घडविणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी आपण कोणते कार्यक्रम हाती घेतले आहेत?**

**श्री. पवार :** दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी 'राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना' आपण सुरू केली आहे. वार्षिक १ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना कमाल दीड लाख रुपयांची औषधोपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. किडणी



**प्रश्न: पुरोगामी राज्य म्हणून ओळख कायम राखताना मागासवर्गीय आणि आदिवासी घटकांच्या उन्नतीसाठी राज्य शासनाने कोणती पावले उचलली आहेत?**

**श्री. पवार :** देशात प्रथमच आपल्याकडे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ई-स्कॉलरशिप सुरू केली आहे. शासकीय वसतिगृहामधील सोयी-सुविधांमध्ये वाढ केली आहे. रमाई आवास घरकुल योजनेंतर्गत सुमारे अडीच लाख घरांचे बांधकाम झाले आहे. अत्याचारग्रस्तांना त्वरीत न्यायासाठी ६ विशेष न्यायालये सुरू केली आहेत. अनुसूचित जातीच्या महिला बचत गटांना मिनी ट्रॅक्टर देण्याची महत्त्वाकांक्षी योजना सुरु केली आहे. विशेष मोहिमेद्वारे अपंगांसाठी ३ टक्के आरक्षणांतर्गत १० हजारपेक्षा जास्त पदांची भरती केली आहे. ज्येष्ठ नागरिक धोरणही जाहीर करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. जादूटोणाविरोधी कायदा आपण केला आहे. देशात पहिल्यांदाच असा कायदा झाला आहे.

विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती देण्यात येते. उच्च शिक्षण घेणाऱ्या आदिवासी कुटुंबातील विद्यार्थ्यांना लॅपटॉप देण्याचा निर्णय झाला आहे. इंदिरा आवास योजनेखाली घरकुल निर्मितीसाठीदेखील आपण वेळोवेळी भरघोस तरतूद केली आहे. १९८८-१९८९ ते २००२-२००३ या कालावधीतील ४१ कोटी ७२ लाख रुपयांच्या खावटी कर्जाची थकबाकी माफ करण्यात आली आहे.

ट्रान्सप्लान्टसारख्या उपचारांसाठी अडीच लाख रुपयांपर्यंत खर्चास मंजुरी मिळू शकते. आतापर्यंत या योजनंतर्गत २ लाख ६ हजार ७११ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.

आपत्कालीन वैद्यकीय सेवेची सुरुवात राज्यात झाली आहे. या योजनेतून संपूर्ण राज्यभरात ९३७ नवीन रुग्णवाहिका उपलब्ध होणार आहेत. 'जीवन अमृत सेवा' (ब्लड ऑन कॉल) देखील आपण सुरू केली आहे. १०४ या टोल-फ्री क्रमांकावरुन रुग्णास सहजपणे रक्त उपलब्ध होऊ शकते.

**प्रश्न: अल्पसंख्याक समाजाच्या विकासाच्या दृष्टीने कोणत्या महत्त्वाच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत?**

**श्री. पवार:** अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक उन्नतीवर शासनाने अधिक भर दिला आहे. मदरसा आधुनिकीकरण योजना त्याचेच एक प्रतीक आहे. विविध प्रकारच्या शैक्षणिक योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता यावी म्हणून मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल २२५ कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये केले आहे. अल्पसंख्याक समाजातील युवकांसाठी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण आणि स्पर्धा परीक्षांची तयारीसंदर्भात विविध उपक्रमही राबविले जात आहेत. अल्पसंख्याक समाजासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला आहे. मुंब्रा (ठाणे) इथे २५ कोटी रुपये खर्चून इस्लामिक कल्चरल सेंटर उभारण्याचा निर्णय आपण घेतला आहे. अशाप्रकारचे हे देशातले दिल्लीनंतरचे दुसरे आणि महाराष्ट्रातले पहिलेच कल्चरल सेंटर असणार आहे.

**प्रश्न: महिलांच्या विकासासाठी सरकार कोणत्या उपाययोजना करत आहे?**

**श्री. पवार:** अलीकडेच तिसऱ्या महिला धोरणाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

सर्व घटकांमधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात जन्मणाऱ्या मुलींसाठी सुकन्या योजना राबविली जात आहे. या योजनेतून मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला एकूण १ लाख रुपये मिळतील. बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसाहाय्य करणे व त्यांच्या पुनर्वसनासाठी मनोधैर्य योजना राबवण्यात येत आहे.

**– शब्दांकन : जगदीश मोरे**
(उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी)

# सुप्रशासनावर भर

**राज्याच्या मुख्य सचिव पदाची सूत्रे श्री. ज. स. सहारिया यांनी सहा महिन्यांपूर्वी हाती घेतली. गेल्या सहा महिन्यांमध्ये त्यांनी प्रशासनाला गतिमान करण्यासोबतच नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. सुप्रशासनावर त्यांचा भर आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियमित बैठकांद्वारे प्रलंबित समस्यांची तड लावण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे. क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांशी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे नियमित संपर्क साधून ही यंत्रणाही अधिक लोकाभिमुख केली आहे. त्यांच्या पुढाकारामुळे मार्च-एप्रिलमध्ये झालेल्या अनपेक्षित अशा गारपिटीच्या संकटाचा यशस्वीपणे सामना करता आला. लोकसभा निवडणूकही सुव्यवस्थितरित्या पार पडली. श्री. सहारिया यांनी राबविलेल्या विविध उपक्रमांबाबत ही विशेष मुलाखत...**



**प्रश्न : गेल्या सहा महिन्यातील आपल्या कार्यकाळाचे वर्णन कसे कराल?**

**उत्तर :** सहा महिन्यांपूर्वी मी मुख्य सचिवपदाचा कार्यभार स्वीकारला. दैनंदिन प्रशासकीय कामे समजावून घेऊन त्यावर मार्ग काढून राज्याच्या विकासात प्रशासनाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी प्रयत्न करीत असतानाच राज्याला 'न भूतो न भविष्यती' असा गारपिटीचा तडाखा बसला, त्याच दरम्यान लोकसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता लागू झाली. अशा परिस्थितीत प्रशासनाकडून निवडणुकीच्या कामांबरोबरच गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करणे आणि शेतकऱ्यांना वेळेवर मदत पोहोचविणे हे मोठे आव्हान होते. जिल्ह्यात अन्य विभागाच्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना मदतीला घेऊन ठिकठिकाणी पंचनामे करण्यात आले. त्याबाबत मी दर मंगळवारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडून आढावा घेत असे. दरम्यानच्याकाळात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने दिल्लीला जाऊन पंतप्रधानांची भेट घेतली. निवडणुक आयोगाचाही भेट घेऊन राज्यात उद्‌भवलेल्या नैसर्गिक आपत्तीची जाणीव करून दिली. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या मदतीच्या वाटपासाठी जिल्हायंत्रणा कामाला लागली. दरवर्षी शासन आपत्तीग्रस्तांना ३००० कोटी रुपयांचे वाटप करीत असते. मात्र यावर्षी दीड महिन्यातच १५०० कोटी रुपयांच्या मदतीचे वाटप केले. जी गोष्ट आम्ही बारा महिन्यात करीत असतो तीच दीड महिन्यात करून दाखवली. गारपीटग्रस्त शेतकऱ्याच्या खात्यात मदतीची रक्कम जमा झाली. मदत वाटपाबाबत एकही तक्रार प्राप्त झाली नाही. टीमवर्कमुळे हे शक्य झाले.

**प्रश्न : आपण व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवर अधिक भर देता असे कळले आहे...**

**उत्तर :** होय, अगदी बरोबर आहे. याचे कारण म्हणजे पूर्वी जिल्हा पातळीवरील अधिकारी बैठकीसाठी मंत्रालयात येत. त्यात त्यांचा बराच वेळ जात असे. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे दर आठवड्याला आढावा घ्यायला सुरुवात केल्यामुळे मंत्रालयात यायची त्यांना गरज भासत नाही. त्यामुळे वेळ आणि पैसाही वाचतो. मंगळवारीच व्हीडीओ कॉन्फरन्स घेत असल्यामुळे अन्य दिवस या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्यांच्या स्थानिकस्तरावरील बैठका आणि अन्य कामांसाठी पुरेसा होतो.

**प्रश्न: सुप्रशासनाची आपली संकल्पना काय आहे?**

**उत्तर :** सामान्य जनतेची कामे गतीने व्हावीत यासाठी माझा सुप्रशासनावर (गुड गव्हर्नन्स) भर असतो. व्हीडीओ कॉन्फरन्सिंग आणि सचिव समन्वय बैठक हा त्याचाच एक भाग आहे. विविध विभागांकडे प्रलंबित प्रकरणांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. याबाबतीत माझे मत असे आहे की, प्रत्येक विभागाकडे आज हाऊस किपिंग व्यवस्थितरीत्या केले जात नाही. त्यामुळे प्रत्येकाचा प्रलंबित कामांमध्ये वेळ जात आहे. हाऊस किपिंग जर अपडेट केले तर हा वेळ नक्कीच वाचून तो सामान्यांच्या कामांसाठी देता येईल. यासंदर्भात मी सर्व सचिवांना सूचना दिल्या आहेत. प्रशासनात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मानसिकता सकारात्मक असली पाहिजे. तरच ते जनतेच्या प्रश्नांकडे त्या दृष्टीने पाहतील. प्रत्येकाच्या कामात एकसूत्रता असणे आवश्यक आहे. बऱ्याचदा एखादा निर्णय घेतला तर त्यावर काय होईल, चूक झाली तर काय कारवाई होईल या भीतीपोटी अधिकारी, कर्मचारी वेळ

घालवत राहतात. त्यामुळे निर्णयास विलंब होतो. यावर उपाय म्हणून मी मंत्रालयीनस्तरावरील सहसचिव, उपसचिव यांची एक कार्यशाळा घेतली होती. त्यात सुप्रसिद्ध वक्ते शिव खेरा यांचे व्याख्यान ठेवले होते. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी काम करीत असताना किंवा एखाद्या फाइलवर निर्णय घेताना स्पष्टता आणली आणि वैयक्तिक हिताचा विचार बाजूला ठेवला तर नक्कीच विलंबाचे प्रमाण कमी होईल, असे मला वाटते.

लोकांना चांगली सेवा देणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. शासनाचे जे विभाग आहेत त्याने प्रत्येकाने आपली भूमिका काय याची जाणीव करून काम केले पाहिजे. बऱ्याचदा एखादे संकट आल्यावर त्यावर उपाययोजना केली जाते. मात्र मी या मताचा आहे की अशा संभाव्य प्रश्नांवर वेळीच मार्ग काढणे हे सुप्रशासन आहे. मी नेहमी प्रोॲक्टिव्ह गव्हर्नन्सला प्राधान्य देतो. राज्यातील ११ कोटी जनतेची कामे करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे या भावनेतून सर्वांनी काम केले पाहिजे. मी सहजपणे लोकांना भेटतो. त्यांच्या समस्या जाणून घेतो. मला भेटायला आलेली व्यक्ती परत जाता कामा नये अशी माझी भूमिका आहे. अशाच प्रकारच्या सूचना मी विभागीय आणि जिल्हापातळीवरील अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**प्रश्न : सामान्य जनतेच्या समस्या थेटपणे जाणून घेण्यासाठी आपण काय करता?**

**उत्तर :** लोकांच्या समस्या काय आहेत त्या कार्यालयात बसून कळणार नाहीत यासाठी मी नेहमी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना गावोगावी भेटी देण्याच्या आणि एखाद्या गावात रात्रीचा मुक्काम करण्याचा सूचना देत असतो. मी स्वत:देखील नुकताच ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील हातेरी गावात मुक्काम केला. सामाजिक न्यायाच्या, आदिवासी विकास विभागाच्या योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत कशा प्रकारे पोहोचतात याचा आढावा घेण्यासाठी अशा प्रकारच्या क्षेत्रभेटींना पर्याय नाही. प्रशासन आपल्या पाठीशी आहे अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाल्यास त्यांचा प्रशासनावरचा विश्वासही अधिक दृढ होईल.

**प्रश्न : महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या समस्या आणि प्रश्नांवर आपण लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते....**

**उत्तर :** मध्यंतरी मी विभागीय स्तरावरील दौरे केले. त्यात असे आढळून आले की, राज्याच्या प्रशासनात महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या सर्वच विभागात मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचबरोबर त्यांना वैयक्तिक आणि प्रसासकीय पातळीवरदेखील अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रश्न काय ते जाणून घेण्यासाठी आम्ही मुंबईत एक कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ दर्जाच्या महिला अधिकाऱ्यांनी आपले प्रश्न मांडले. त्यात काही आरोग्यविषयक समस्या होत्या. काही वैयक्तिक तर बऱ्याच प्रशासकीय पातळीवरच्यादेखील होत्या. अनेक जणी मनमोकळेपणाने बोलल्या. त्यांच्यासाठी अशाप्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हा पहिला प्रयत्न होता. या कार्यशाळेत आलेल्या तक्रारींची दखल घेऊन मी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ महिलांसाठी स्वच्छतागृहे आणि विश्रांती कक्ष बांधण्याचे आदेश दिले आहेत. त्याचबरोबर विभागावरून मंत्रालयात बैठकीसाठी येणाऱ्या महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी मंत्रालयातदेखील विश्रांती कक्ष सुरू करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले आहेत.

**मुलाखत – रविकिरण देशमुख,**
**अजय जाधव**

**प्रश्न: प्रशासन आणखी गतिमान आणि पारदर्शक कसे करणार?**

**उत्तर :** प्रशासनाला गती द्यायची असेल तर ई-गव्हर्नन्सच्या वापरावर भर दिला पाहिजे. शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन संगणकाच्या माध्यमातून झाले पाहिजे. आज राज्यात ज्या विविध शासकीय इमारतींची अर्धवट बांधकामे आहेत त्यांचे ऑनलाइन ट्रॅकिंग होणे आवश्यक आहे. मी ई प्रशासनाच्या संदर्भात कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. आजच्या परिस्थितीत काम करण्यासाठी भरतीप्रक्रियेची नियमावली आताच्या परिस्थितीला साजेशी असणे आवश्यक आहे. त्यासाठी मी रिक्रूटमेंट रूलचा आढावा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.



**प्रश्न : विकासप्रक्रियेमध्ये खाजगी क्षेत्राच्या सहभागाबद्दल आपली भूमिका काय आहे?**

**उत्तर :** राज्य शासनाने वेळोवेळी तयार केलेल्या लोककल्याणकारी योजनांची यशस्वी अंमलबजावणी करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. राज्याच्या प्रगतीला गती यावी यासाठी काही बाबींवर प्राधान्याने काम करणे मला आवश्यक वाटते. कल्पक आणि कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा निर्माण करणे, खासगी क्षेत्राचा सहभाग वाढविणे, राज्यात गुंतवणूकवाढीसाठी प्रयत्न करणे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मुंबईमध्ये सर्वच अग्रगण्य बँकांचे मुख्यालय आहेत. मोठे उद्योगपतीही याच शहरात वास्तव्यास आहेत. राज्याच्या विकासाच्या योजनांमध्ये त्यांचा सहभाग वाढविण्यावर भर दिला आहे. मध्यंतरी सर्व बँकांच्या अध्यक्षांची कार्यशाळा घेतली होती. मध्यंतरी ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा मंत्रालयात आर्वजून भेटायला आले होते. राज्य शासनासोबत शिक्षण, आरोग्य यासारख्या प्राधान्य क्षेत्रात काम करण्याची त्यांनी इच्छा प्रदर्शित केली. त्यानुसार पुढील वाटचाल सुरू आहे. याबाबत नुकतीच सह्याद्री अतिथीगृहात पुन्हा एकदा श्री. टाटा यांच्या समवेत वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची बैठकही झाली. मला आशा आहे की प्रशासन आणि कॉर्पोरेट क्षेत्राच्या सहभागामुळे विकासाच्या योजनांना नक्कीच फायदा मिळणार आहे. राज्याला प्रगतीकडे नेण्यासाठी पायाभूत सुविधा, दळणवळण व्यवस्था, बंदरांचा विकास, दर्जेदार शिक्षण, पर्यटन क्षेत्राचा विकास, सुनियोजित शहरे आणि जीवनपद्धती अशा घटकांवर विशेष लक्ष देण्यात येत आहे. सामान्यांच्या हिताच्या योजनांची प्रशासमार्फत यशस्वीरीत्या अंमलबजावणी नेहमीच केली जाते. त्यात अधिक गतिमानता आणून राज्याच्या विकासाच्या योगदानात सर्वांनी हातभार लावायला हवा.

❖ ❖

# मदतीचा हात

**राज्यात फेब्रुवारी- मार्च २०१४ या कालावधीमध्ये गारपीट व अवेळी पाऊस यामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली. शेतकऱ्यांचे गारपिटीमुळे झालेले नुकसान व त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता शेती व फळपिकांच्या नुकसानीसाठी अर्थसाहाय्यासोबत प्रचलित दरापेक्षा अधिक दराने मदत देण्याचा निर्णय शासनाने तातडीने घेतला. त्यासाठी ४००० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर करण्यात आले. गेल्या तीन वर्षांत दुष्काळ निवारणासाठी ५००० कोटी रुपयांची मदत करण्यात आली. जून-जुलै २०१३ मधील अतिवृष्टी व पूरपरिस्थितीतील आपद्‌ग्रस्तांना ३००० कोटींचे आर्थिक साहाय्य देण्यात आले.**

अवेळी पाऊस आणि गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले. त्यांना दिलासा देण्यासाठी विविध निर्णय तातडीने घेण्यात आले. त्यानुषंगाने बाधित शेतकऱ्यांकडून डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत सक्तीने कर्जवसुली करू नये, असे आदेश संबंधित बँकांना शासनाने दिले. डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत पीक कर्जाची परतफेड करण्यास मुदत वाढ देण्यात आली. २०१३-१४ या कालावधीसाठी बाधित शेतकऱ्यांच्या कर्जाचे व्याज सुमारे २६८ कोटी रुपये शासनातर्फे भरण्यात आले. बाधित शेतकऱ्यांच्या कर्जाच्या ३ वर्षांकरिता (२०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७) पीककर्जाचे पुनर्गठन करण्यात आले. बाधित शेतकऱ्यांची जानेवारी ते जून २०१४ या कालावधीतील वीज देयके (सुमारे २०० कोटी रुपये) शासनातर्फे भरण्यात आली. कोरडवाहू शेतीस एकूण १० हजार रुपये प्रतिहेक्टर या प्रमाणे अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेतला. ओलिताखालील शेतीस १५ हजार रुपये प्रतिहेक्टर इतकी मदत देण्यात येत आहे. बहुवार्षिक फळपिकांकरिता

गारपीट, अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीतील आपद्‌ग्रस्तांना १२ हजार कोटींचे आर्थिक साहाय्य.



## गारपीटग्रस्तांना मदत



- ❒ कोरडवाहू शेतीस अधिकची रक्कम रु.५,५००/- प्रतिहेक्टर, या व्यतिरिक्त प्रचलित दरानुसार रु.४,५००/- प्रतिहेक्टर अशी एकूण रुपये १०,०००/- इतकी मदत.
- ❒ ओलिताखालील शेतीस अधिकची रक्कम रु.६,०००/- प्रतिहेक्टर या व्यतिरिक्त प्रचलित दरानुसार रु.९,०००/- प्रतिहेक्टर अशी एकूण रुपये १५,०००/- इतकी मदत.
- ❒ फळपिकांकरिता अधिकची रक्कम रु.१३,०००/- प्रती हेक्टर याव्यतिरिक्त प्रचलित दरानुसार रु.१२,०००/- प्रतिहेक्टर अशी एकूण रुपये २५,०००/- इतकी मदत.
- ❒ पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेत जास्तीत जास्त २ हेक्टर मर्यादेपर्यंत अनुज्ञेय.
- ❒ गारपीटग्रस्त शेतकऱ्यांची जानेवारी ते जून २०१४ या कालावधीची वीज देयके शासन भरणार.
- ❒ आपद्‌ग्रस्त शेतकऱ्यांची संबंधित बँकांकडून डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत कर्जवसुली नाही. डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत शेतपिकाच्या कर्जाच्या परतफेडीस मुदतवाढ.
- ❒ २०१३-१४ या कालावधीकरिता गारपीटग्रस्त शेतकऱ्यांचे कर्जाचे व्याज राज्य शासन भरणार.



- ❒ आपद्‌ग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्जाचे सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षांकरिता पुनर्गठन.
- ❒ गारपिटीमुळे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींचे वारस तसेच घरांचे नुकसान झालेल्यांना तातडीने मदत.

## दुष्काळावर मात

- ❒ २०११ आणि २०१२ साली आणि २०१३ च्या प्रारंभी पडलेल्या दुष्काळावर यशस्वी मात. ५० टक्केपेक्षा कमी पर्जन्यमान झालेल्या भागात दुष्काळ घोषित.
- ❒ या परिस्थितीवर मात करण्यासाठी मे-जून २०१३ मध्ये १५ हजार वस्त्यांमध्ये ५५०० खाजगी आणि शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा. यामुळे दुष्काळी परिस्थितीत लोकांचे स्थलांतर थांबले.
- ❒ १३१७ चारा छावण्या सुरू. त्यांचा सुमारे १० लाख जनावरांना लाभ. दुग्धोत्पादनात वाढ.
- ❒ गेल्या ५ वर्षात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ५०० कोटी रुपये खर्च करून कायमस्वरूपी उपाययोजना. एक लाख शेततळ्यांचे बांधकाम.
- ❒ या वर्षी दुष्काळग्रस्त भागात १० हजार सिमेंट बंधारे बांधले.
- ❒ दुष्काळग्रस्त भागातील खेड्यांना विजेच्या बिलात ६७ टक्के सूट.
- ❒ दुष्काळी कामांच्या साहाय्यासाठी केंद्र सरकारची २५५९ कोटी रुपयांची मदत.



## प्रेरणादायी यश



# जगण्याची नवी उमेद

बीड शहरापासून ३१ किलोमीटर अंतरावर असलेल्या अंबिलवडगाव या गावातील अंकुश रावसाहेब दराडे यांची जिवापाड जपलेली दोन एकरमधील डाळिंबाची बाग गेल्या दोन वर्षातील दुष्काळामुळे एकच एकर शिल्लक राहिली होती. पाणी उपलब्ध नसल्याने डोक्यावरून पाणी आणून, कधी पाण्याचा टँकर विकत घेऊन डाळिंबाच्या झाडांना पाणी देऊन त्यांनी ही बाग जिवंत ठेवली. या वर्षी उरलेल्या एका एकर डाळिंबाच्या बागेमधून एक ते दीड लाख रुपये उत्पन्न मिळेल अशी त्यांना आशा होती. पण फेब्रुवारी आणि मार्च महिन्यातील अवकाळी पाऊस आणि गारपिटीने डाळिंबाच्या झाडाच्या फांद्या तुटल्याने जवळपास संपूर्ण बाग नष्ट झाली. डाळिंबाच्या झाडांच्या बाजूला ज्वारी काढून ठेवली होती. ती ज्वारीही पाण्याने काळी पडली. शेतातील बाकीच्या भागात कांदा लावला होता. त्याचेही नुकसान झाले.

डाळिंब, ज्वारी आणि कांदा या पिकांपासून अंदाजे दोन ते अडीच लाख रुपयांचे उत्पन्न अपेक्षित होते. परंतु अवकाळी पाऊस आणि गारपिटीने क्षणात होत्याचे नव्हते झाले. डाळिंबाच्या बागेसाठी ठिबक करण्यासाठी बँकेकडून घेतलेले २ लाख ५० हजार रुपयांचे कर्ज कसे फेडणार याची चिंता दराडे यांना लागली आहे. मात्र शासनाने युद्धपातळीवर नुकसानीचे पंचनामे केले. मदत जाहीर करून तातडीने जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा केली. दराडे यांना दहा हजार रुपये अनुदान मिळाल्याने त्यांची चिंता काही प्रमाणात दूर झाली आहे. जिल्ह्यातील ११ तालुक्यांमधील ४५८ गावातील ६६ हजार ८९९ बाधित शेतकऱ्यांना ५१ कोटी ५ लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आल्याने गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**- राजू धोत्रे**

प्रतिहेक्टर या प्रमाणे २५ हजार रुपये प्रतिहेक्टर इतके अर्थसाहाय्य देण्यात येईल.

**दुष्काळग्रस्त परिस्थितीशी मुकाबला**

केंद्र सरकारकडून दुष्काळ निवारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून घेण्यात राज्य शासनास यश आले. खरीप २०११, रब्बी २०११-१२ व खरीप २०१२ हंगामातील बाधित शेतकऱ्यांना २१८३ कोटी रुपये निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आला.

टंचाई निवारण्यासाठी उपयुक्त ठरेल असा २१० सिमेंट बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले. राज्यात १० हजार अतिरिक्त, शेततळी निर्माण करणे व त्यांची देखभाल करणे ही कामे रोजगार हमी माध्यमातून करण्यात येत आहेत. जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे रूपांतरण, वीज बिलात ३३.५ टक्के इतकी सूट, परीक्षा शुल्कात माफी, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांच्या वीज देयकांच्या ६७ टक्के रक्कमेची अदायगी, स्थलांतरित कुटुंबाला शिधापत्रिका अशा उपाययोजनांमधून शासनाला दुष्काळी परिस्थितीवर मात

## अतिवृष्टीशी मुकाबला

- पूरपरिस्थिती उद्‌भवताच बचाव व मदतकार्य तत्काळ सुरू.
- सर्वसमावेशक आर्थिक मदतीचे पॅकेज जाहीर
- केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून ९२२ कोटी रुपये निधी प्राप्त.
- रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी सुमारे ९०० कोटी रुपयांचा निधी.
- ग्रामीण रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी सुमारे ४४८ कोटी रुपयांचा निधी.



- शेतपिकांच्या नुकसानीसाठी १०४१ कोटी रुपयांचे वाटप.
- पूर्णत: व अंशत: पडझड झालेल्या घरांच्या मालकांना सुमारे ३० कोटी रुपयांचे वाटप.
- मत्स्यव्यावसायिकांना बोट, जाळी दुरुस्तीसाठी सुमारे १२ कोटी रुपयांची मदत.
- मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी अडीच लाख रुपयांप्रमाणे सुमारे ७ कोटी रुपयांचे वाटप.
- मृत जनावरांच्या मालकांना सुमारे २ कोटी रुपये इतकी मदत.
- सर्व आर्थिक मदत संबंधितांच्या बँक खात्यात थेट जमा.
- विशेष बाब म्हणून प्रतिकुटुंब २० किलो धान्य व १० लीटर केरोसिन मोफत.
- दुष्काळ व अतिवृष्टीसंबंधी करण्यात आलेल्या सर्व उपाययोजनांवर ८००० कोटींपेक्षा जास्त रक्कम खर्च

शेततळी निर्माण करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येऊन कोरेगाव, मान, खटाव, खंडाळा तालुक्यांमध्ये ३३०० शेततळी निर्माण करण्यात आली.

टंचाईग्रस्त जनतेस टँकरद्वारे पिण्याचे पाणी, ९ लाख जनावरांसाठी १०२२ चारा छावण्या, साडे सात हजार हेक्टर चारा उत्पादन कार्यक्रम व नरेगातून (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ) ५० कोटींची कामे घेऊन नागरिकांना दिलासा देण्यात आला.

भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी जलमुक्त गाव अभियानांतर्गत करण्यात यश आले.

**अतिवृष्टीच्या संकटावर मात**

जून, जुलै २०१३ मध्ये राज्यात झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीत जीवित व वित्तहानीसाठी आपद्‌ग्रस्तांना मदत व पुनर्वसन विभागातर्फे तातडीने मदत उपलब्ध करून देण्यात आली. ही मदत संबंधित खातेदारांच्या बँकेत थेट जमा करण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी २८ ऑगस्ट २०१३ पर्यंत पुणे, कोकण, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद या सहा विभागांना ४५ कोटी ५८ लक्ष रुपये निधी वितरित करण्यात आला. या निधीमधून मृत व्यक्तींच्या कुटुंबांना १० कोटी ७१ लक्ष रुपये अनुदान वितरित करण्यात आले. ११३ घरांची दुरुस्ती व पुनर्बांधणी यासाठी ३१ कोटी ४७ लक्ष रुपये तर पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना साहाय्य व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना साहाय्य करण्यासाठी आणि राहत केंद्रात निवारा, अन्न, वस्त्र, औषधे इत्यादींच्या पुरवठ्यासाठी सहा विभागांना निधी उपलब्ध करून देण्यात आला. मदतीच्या रकमेतून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसुली करू नये यासाठी सहकार विभागाने आदेश दिले. विदर्भातील सर्व जिल्ह्यात जुलै २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूर यामुळे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत निराधार झालेल्या कुटुंबांना विशेष बाब म्हणून प्रतिकुटुंब २० किलो अन्नधान्य (१० किलो गहू अथवा ज्वारी व १० किलो तांदूळ) तसेच १० लीटर केरोसीन मोफत देण्यात आले.

**मदत व पुनर्वसन विभागाचे अर्थसाहाय्य**

- २०१३ च्या अतिवृष्टी / पुरामुळे बाधित शेतकऱ्यांना १०४१.७३ कोटी रुपये अर्थसाहाय्य.
- खरीप २०११ -१२ व रब्बी २०११-१२ तसेच खरीप २०१२-१३ व रब्बी २०१२-१३ मधील बाधित शेतकऱ्यांना केलेले अर्थसाहाय्य २७८३.०४ कोटी रुपये.
- कापूस, सोयाबीन, धान उत्पादन शेतकऱ्यांना २०११-२०१२ व २०१२-१३ मध्ये २००० कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य.
- २०१३-१४ मध्ये चारा छावण्यांकरिता ६७६.९७ कोटी रुपये निधी वितरित .
- २०१४ (फेब्रुवारी- मार्च) गारपीट व अवकाळी पाऊस यामुळे बाधित झालेल्या व्यक्तींना ५४० कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य .
- टंचाईग्रस्त जिल्ह्यांना पेयजल पुरवठा करण्यासाठी आवश्यक व निकडीच्या पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्तीकरिता ४१८ कोटी रुपये .
- गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांसाठी १ हजार १९९ कोटी ६० लाख रुपयांचे आर्थिक पॅकेज
- भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित १५ हजार १५५ कुटुंबांना पुनर्वसनापोटी १ हजार १९९ कोटी ६० लाख रुपये इतके आर्थिक पॅकेज देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**- सुबोधिनी घरत**

प्रेरणादायी यश

# जलक्रांतीचा सातारा पॅटर्न

**न भूतो न भविष्यती अशा गेल्या वर्षीच्या दुष्काळावर, शासकीय योजना आणि लोकसहभागातून मात करण्यासाठी सातारा जिल्ह्यात नवीन साखळी सिमेंट बंधाऱ्यांच्या कार्यक्रमाबरोबर जुने पाझर तलाव आणि नालाबांधातील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यात जलक्रांती घडून आली आहे. जिल्ह्यात झालेल्या परतीच्या पावसामुळे दुष्काळी भागातील साखळी सिमेंट बधारे तसेच गाळ काढण्यात आलेले बंधारे आणि पाझर तलावांमध्ये चांगला पाणीसाठा झाला. त्यामुळे लगतच्या विहिरी तुडुंब भरल्या.**

सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागातील दुष्काळग्रस्त तालुक्यातील दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शासनाने जलसिंचन योजनांना गती दिली आहे, त्याबरोबरच जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यासाठी जलसंधारणातर्गंत उपाययोजना राबविल्या आहेत. पाणलोट विकासाच्या कार्यक्रमाबरोबरच दुष्काळी भागात नवीन साखळी सिमेंट बंधारे बांधले आहेत. शासनाच्या विविध विभागांकडून बंधाऱ्याच्या कामावर यंदा विशेष लक्ष केंद्रित केले गेले. जुने पाझर तलाव तसेच जुने सिमेंट व माती नालाबांधाची आणि कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली. या बंधाऱ्यांतील गाळही लोकसहभागातून काढून त्यांचे पुनरुज्जीवन करण्यात आले.

जिल्ह्यातील दुष्काळावर मात करण्यासाठी गेल्यावर्षी माण-खटाव तालुक्यात साखळी सिमेंट बंधाऱ्यांच्या पथदर्शी प्रकल्प राबविण्यात आला. त्यामुळे या दोन तालुक्यात सिमेंट बंधाऱ्यांची मोठी साखळी निर्माण झाली आहे. या कार्यक्रमाची यशस्विता पाहून जिल्ह्यातील दुष्काळी भागासाठी साखळी सिमेंट बंधाऱ्यांची अनेक कामे हाती घेतली. त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला.

### सातारा पॅटर्न

जिल्ह्यात गेल्या २० वर्षांत जेवढे बंधारे घातले गेले, त्याहूनही अधिक बंधारे यंदाच्या दुष्काळात बांधण्यात आले. यासाठी गेल्या दीड वर्षात ७७ कोटीचे नवीन साखळी सिमेंट बंधारे, तसेच जुने सिमेंट व माती नालाबांध आणि ओढयांचे पुनरुज्जीवन करणारी ४०० हून अधिक कामे पूर्ण करून लोकसहभागाचा सातारा पॅटर्न निर्माण करण्यात आला.

१९७२ च्या दुष्काळात जिल्ह्यातील



**करंजकोप, ता. कोरेगाव, जि. सातारा येथील साखळी सिमेंट बंधारा**

दुष्काळी माण, खटाव, कोरेगाव तालुक्यात लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी पाझर तलाव बांधण्यात आले. या तलावांमध्ये शाश्वत पाणीसाठा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने त्यांची जलभेदी चर (सीओटी) तंत्राद्वारे दुरुस्ती करण्याचे अभिनव अभियान जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आले. झालेल्या पावसामुळे या तलावामध्ये चांगला पाणीसाठा झाल्याने दुष्काळग्रस्त आनंदले आहेत. याबरोबरच माण, खटाव, फलटण, खंडाळा, कोरेगाव या तालुक्यामध्ये वेगवगळ्या योजनांमधून ७० सिमेंट काँक्रीटची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

जिल्ह्यातील दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी २ हजार ६६५ नवीन साखळी सिमेंट बंधारे घेण्याबरोबरच जुन्या सिमेंट व माती नालाबांधांची दुरुस्ती आणि तलावातील गाळ काढण्याच्या कामास लोकसहभागातून गती देण्यात आली.

मागील वर्षी झालेल्या पावसामुळे हे पाणी ओढ्या-नाल्यातून वाहत दुष्काळग्रस्त भागातील बांधलेल्या बंधाऱ्यांमध्ये साठलेले आहे. या बंधाऱ्यांमुळे लगतच्या विहिरींना पाणी वाढले आहे.

**शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया**

**हणमंत यादव (निढळ ता. खटाव)** - सध्या निढळ गाव टँकरमुक्त झाले आहे. मे २०१३ मध्ये केवळ १५ दिवस टँकरचा वापर करण्यात आला. बंधाऱ्यामुळे पाण्याचा चांगला साठा झाल्याने टँकर बंद झाले आहेत. उन्हाळ्यात पाणी फक्त ४ दिवस पुरायचे पण सध्या शासनाने बांधलेल्या बंधाऱ्यांमुळे विहिरींना पाणी वाढले आहे. त्यामुळे खरिपाबरोबरच रब्बीचे पीकही जोमाने घेता येईल.

**संभाजी धुमाळ (सरपंच सोनके ता. कोरेगाव)**- तीन साखळी सिमेंट बंधारे बांधल्याने अत्यल्प प्रमाणात पाऊस पडूनही बंधाऱ्यात भरलेल्या पाण्यामुळे विहिरी भरल्या.

**दत्तात्रय धुमाळ (सोनके ता. कोरेगाव)** - साखळी सिमेंट बंधाऱ्यांमुळे विहिरींमध्ये पाण्याचा वेग वाढला आहे. या योजनेमुळे निश्चितच दुष्काळ निर्मूलन होईल.

**संभाजी नानासो धुमाळ (सोनके ता. कोरेगाव)** - नदी-नाल्यातून वाहत जाणारे पाणी समुद्राला मिळून वाया जात होते. साखळी पद्धतीच्या बंधाऱ्यांमुळे आजूबाजूच्या विहिरी तुडुंब भरल्या.

**धनंजय धुमाळ** - पाणी अडवा पाणी जिरवा यातून बंधारा योजनेला खूप फायदा झाला. आजूबाजूच्या विहिरी काठोकाठ भरल्या आहेत.



**माण तालुक्यात १०७ आणि खटाव तालुक्यात १०६ साखळी सिमेंट बंधारे गेल्यावर्षी बांधण्यात आले. पावसाळ्याच्या सुरुवातीला म्हणावा तसा पाऊस न झाल्याने पाणीसाठा झाला नव्हता. मात्र सप्टेंबर महिन्यात १५ दिवसात परतीचा पाऊस पडल्याने, पाणीच पाणी चोहीकडे गेला दुष्काळ कुणीकडे, अशी परिस्थिती दिसून येत होती. साखळी बंधारे नसते तर हेच पाणी वाहून गेले असते. जानेवारीच्या सुरुवातीलाच पाणी टंचाईला सुरुवात झाली असती.**

मोगराळे येथील ओढ्यावर ३ साखळी सिमेंट बंधारे बांधण्यात आले आहेत. त्यामध्ये एका बंधाऱ्यात मागील वर्षी जूनच्या सुरुवातीस पाऊस झाल्याने पाणी साठले होते. त्यावेळी कृषी विभागाने पायोनियर कंपनीशी सहकार्य करून १० हेक्टर क्षेत्रावर पी ३५०२ या अधिक उत्पन्नाच्या संकरित मक्याचे बियाणे शेतकऱ्यांना दिले. सोबतच डी. ए. पी. ५० किलो, झिंक सल्फेट, बियाणे प्रक्रियेसाठी ॲझेटोबॅक्टर, पी.एस. बी. अशा निविष्ठांचे कीट शेतकऱ्यांना वाटले. यापूर्वी या भागात मक्याचे उत्पन्न सरासरी २० ते २५ क्विंटल प्रती एकर असे निघत असे. मात्र यंदा सरासरी ३० ते ३५ क्विंटल प्रति एकरी उत्पन्न मिळेल, अशी आशा मलवडीचे मंडल कृषी अधिकारी आर. के. घोरपडे यांनी व्यक्त केली.

पांढरवाडीतील बंधाऱ्यांत २ कोटी ३ लाख लीटर पाणीसाठा असून आजूबाजूच्या १५ विहिरींना पाणी मिळू शकते.

**विष्णुपंत कट्टे (सरपंच गोंदवले)** - यापूर्वी जेमतेम पडणाऱ्या पावसाचे पाणी वाहून पुढे जायचे आता आमच्या गावचे पाणी गावातच राहणार आहे.

**बाबासाहेब हुलगे, पंचायत समिती सदस्य** - साखळी सिमेंट बंधाऱ्यामुळे बंधाऱ्यालगतच्या ३०-४० विहिरींची पाणी पातळी वाढणार आहे. बंधाऱ्यातील पाणी जानेवारीपर्यंत निश्चितच टिकणार आहे. हा भाग रब्बीचा नव्हता. मात्र, आता बंधाऱ्यातील पाण्यामुळे रब्बीची पिके घेणे शक्य होणार आहे.

**शंकर बाबू जगदाळे, (मोगराळे)** - जूनमध्ये हा नवीन बंधारा भरल्याने लगेच पाइपलाइन केली. हा बंधारा नसता तर ऊस तोडीवर जाण्यावाचून पर्याय राहिला नसता.

**बंधाऱ्यांने गुळणी टाकली अन् विहीर भरली...!**

**जगन्नाथ सूर्यवंशी (पांढरवाडी)** - ज्या जमिनीवर कुसळे उगवायची तिथे आता ऊस उगवला आहे. भरलेल्या बंधाऱ्याने गुळणी टाकली अन् विहीर भरली.

गोंदवले बु. येथे ६ बंधाऱ्यांची कामे एकाच ओढ्यावर ४ किलोमीटरच्या अंतरात झाली आहेत. त्यामुळे समोरच्या टेकडीवरून पाहिले असता सलग साठलेले पाणी आणि भोवतालच्या शेतांमधील साचलेले पाणी आणि भाताची खाचरे बघून कोकणात आल्यासारखे वाटत होते.

**- प्रशांत सातपुते**

# सामूहिक शक्तीचा आविष्कार

**राज्यातील गरीब जनतेला नियमित स्वरूपाचा रोजगार मिळवून देण्यात रोजगार हमी योजना यशस्वी झाली आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्रामपातळीवर विविध पायाभूत सुविधांची निर्मिती झाली आहे. या योजनेमधून जलसंधारण, जलसंवर्धन , जलसिंचन, रस्ते, दुष्काळ प्रतिबंधक कामे, वनीकरण व वृक्ष लागवडीबरोबरच वैयक्तिक लाभाची कामे करण्यात येत आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीत अधिकाधिक पारदर्शकता आणण्यात आली आहे. या योजनेमुळे विकास प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा सामूहिक सहभाग मिळत आहे. नियमित स्वरूपाचा रोजगार प्राप्त झाल्याने गरिबांना सन्मानाने जगता येत आहे.**


रोजगार हमी योजना विभागामार्फत २ हजार पाचशे कोटी रुपयांची कामे २०१२-१३ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात आली आहेत. गोरगरिबांच्या सर्वांगीण विकासास संजीवनी देणारा विभाग अशी या विभागाची नवी ओळख निर्माण झाली आहे. या योजनेंतर्गत शासनाने ३६५ दिवस म्हणजे वर्षभर कामाची हमी दिली आहे.

**खर्चात आठपट वाढ**

या योजनेसाठी पूर्वी केवळ ३०० कोटी रुपये खर्च होत होते. २०१२-१३ या आर्थिक वर्षात २,५०० कोटी रुपये खर्च करण्यात आलेत. अशाप्रकारे या योजनेचा आवाका आठपटीने वाढला आहे. या योजनेंतर्गत जलसंधारण, जलसंवर्धन , जलसिंचन, रस्ते, दुष्काळ प्रतिबंधक कामे, वनीकरण व वृक्ष लागवडीबरोबरच वैयक्तिक लाभाची कामे करण्यात येत आहेत. राजीव गांधी सेवा केंद्रदेखील चालवली जात आहेत. गावपातळीवर खेळाची मैदाने तयार करण्याचे काम या योजनेतून करण्यात येत आहे. गावांचा सर्वांगीण भौतिक विकास या योजनेच्या माध्यमांतून केला जात आहे.

**नवीन कामे**

पारंपरिक कामांसोबत या योजनेत विविध भागांचा भौगोलिक, सामाजिक विचार करून नवीन कामे समाविष्ट करण्यात आली आहेत. मुख्यत: कृषी संदर्भातील नाडेप कंपोस्टिंग, गांडूळखत आणि जैविक खत निर्मिती करणे अशी कामे करण्यात येतात. कुक्कुटपालन आणि शेळ्याबकऱ्यांसाठी शेड, कोबा करणे, जनावरांकरिता



युरीन टँक, चारा साठवण व्यवस्था, पूरक पशुखाद्य देण्याची व्यवस्था, मासे सुकवण्यासाठी क्षेत्र आणि बेल्ट व्हेजिटेशन ही कामे करण्यात येतात.

पिण्याच्या पाण्यासाठी साठवण खड्डे, पुनर्भरण खड्डे, वैयक्तिक घरगुती शौचालय, अंगणवाडी व शाळेतील शौचालय व घनकचरा व्यवस्थापन या कामांचा समावेश या योजनेच्या नवीन कामांमध्ये मे २०१२ पासून करण्यात आला आहे. खेळाची मैदाने तयार करण्याचे काम यात आहे. त्यामुळे राज्यात पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे कार्य या योजनेतून झाले आहे.

**गोरगरिबांना नवजीवन**

मध्यंतरी राज्यावर दुष्काळाचे मोठे सावट आले होते. शासनाने विविध माध्यमांद्वारे दुष्काळाचा मुकाबला करण्याचा प्रयत्न केला. त्यात प्रामुख्याने रोजगार हमी योजनेचे महत्त्वाचे योगदान आहे. दुष्काळग्रस्त भागात या योजनेने गरीब लोकांना नवजीवन दिले दुष्काळामुळे जगणे कठीण झालेल्या ठिकाणी ही योजना उपयुक्त ठरली.

**सकारात्मक बदल**

या योजनेमुळे (नरेगा) विविध भागात सकारात्मक बदल घडले आहेत. तेथील गोरगरीबांचे सामाजिक जीवन, आर्थिक स्थैर्य, आरोग्य उंचावले असून मेळघाटसारख्या भागातील स्थलांतर रोखण्यात यश मिळाले आहे. पुढील वर्षी ३ हजार कोटी रुपयांची कामे करण्याची विभागाची तयारी झाली आहे.

**पारदर्शकता व अचूकता**

या योजनेला गती देण्यासाठी पारदर्शकता व अचूकता महत्त्वाची वाटल्याने विभागाने तशी घोषणा केली. त्यानुसार रोजगार हमीवरील मजुरांची नोंदणी आणि जॉब कार्ड, त्यांना दिले जाणारे वेतन हे बँक अथवा पोस्टाद्वारे देणे, साप्ताहिक वेतन देणे, मशिनरी व कॉन्ट्रक्टरला बंदी, हजेरी पटांची पडताळणी आणि सामाजिक अंकेक्षण आदी बाबी विभागाने सुरू केल्या.

**सामाजिक अंकेक्षण**

या योजनेतील प्रत्यक्ष काम करणारे मजूर तसेच गावातील इतर नागरिक हे शासकीय यंत्रणेच्या सहभागाशिवाय स्वतंत्रीत्या गावात झालेल्या कामांची तपासणी करतात. योजनेतील लाभार्थीच स्वत: योजनेचे मूल्यमापन करतात.

गावपातळीवर झालेल्या कामांचे प्रत्येक सहा महिन्यातून एक वेळा सामजिक अंकेक्षण करणे केंद्र शासनाने अनिवार्य केले आहे. ही नवीन संकल्पना असल्यामुळे यासाठी केंद्र शासनाने हैद्राबाद येथे कार्यशाळा आयोजित केली होती. त्या कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींच्या मदतीने महाराष्ट्रात सामाजिक अंकेक्षणाचा पथदर्शी प्रकल्प सहा महसूल विभागात राबविण्यात आला.

सामाजिक अंकेक्षणाची प्रक्रिया सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यासाठी स्वतंत्र सामाजिक अंकेक्षण संचालनालय स्थापन करण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे.

**– राजू पाटोदकर**

## रोजगाराची हमी

- १९ जिल्ह्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक फंड मॅनेजमेंट सिस्टिम लागू करून मनरेगाच्या वेतनाचे थेट लाभ हस्तांतरण (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर).
- सर्व मनरेगा प्रकल्पांमध्ये ई–हजेरीपत्रकांचा १०० टक्के उपयोग.
- प्रत्येक पंधरवड्यात ग्राम रोजगार दिवसाचे आयोजन.
- १५ जिल्ह्यांमध्ये सूक्ष्म पाणलोट कार्यक्रम राबविला जात असून १० ते १५ गावांमधील ५,००० ते ७,००० हेक्टर पाणलोट गटाचा विकास.
- ३१ मार्च २०१४ अखेर रोजगार हमी योजनेंतर्गत एकूण २२०२०४ कामे चालू. त्यावर २,९०,००० मजुरांना रोजगार.
- मनरेगामधून जवाहर विहिरींचे काम पूर्ण करण्याचा निर्णय.
- रोजगार हमी योजनेच्या भत्त्यात २५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ.
- १४२ 'क' वर्गीय नगरपालिका आणि पंचायतीमध्ये महाराष्ट्र रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी.

## प्रेरणादायी यश



## मळगावचा आदर्श

रोजगार हमी योजनेमधून सामुहिक स्वरूपाची जशी कामे घेतली जातात तसेच व्यक्तिगत लाभाचीही कामे घेतली जातात. या योजनेच्या माध्यमातून बांधलेल्या वनराई बंधाऱ्याच्या पाण्याचा वापर यशवंत उघडा व हिरा यशवंत उघडा हे आदिवासी कुटुंब भाजीपाला पिकवण्यासाठी करत आहेत. या भाजीपाला विक्रीतून त्यांना मालवाहू रिक्षा खरेदी करता आली. या रिक्षामधून ते पेण बाजारपेठेत भाजीपाला विक्रीसाठी नेतात. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

धामणगांव पाट (जि. अहमदनगर, ता. अकोले) येथील श्रीमती विठाबाई दशरथ भोर यांच्या शेतात रोहयोच्या माध्यमातून विहिर बांधण्यात आली. या विहिरीमुळे विठाबाइ कांदा, सोयाबिन यासारखी नगदी पिके घेत आहेत. त्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली आहे. महिला सक्षमीकरणाचे हे उत्तम उदाहरण आहे.

सुधाकर वानखेडे आणि त्यांच्या पत्नी हे दोघेही शेतमजूर. रोजगार हमी योजनेच्या कामावर जाण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नव्हता. या कामासाठी मिळणाऱ्या मजुरीचा काही भाग वेगळा काढून त्यांनी मुलीला डी.एड पर्यंत शिक्षण दिले. आज त्यांची मुलगी शिक्षिका म्हणून कार्यरत आहे.

राज्यातील ३३ जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येत असून त्यामुळे ३७५ लाख मनुष्य रोजगार दिवस निर्माण झाले आहेत.

रोहयोची राज्यात उत्कृष्ठ अंमलबजावणी होत असल्याने नुकतेच नवी दिल्ली येथे झालेल्या नरेगा संमेलनात महाराष्ट्राचा गौरव करण्यात आला. उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्याला विशेष प्रशस्तीपत्रकाने सन्मानित करण्यात आले.

# हरितक्रांतीचा नवा अध्याय

**महाराष्ट्रात कृषी क्षेत्राला नेहमीच प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे कृषी उत्पादनात मोठी वाढ झाली. फळांची निर्यात वाढली. दहा वर्षांत फलोत्पादनात चार पटीने वाढ झाली. पीक पद्धतीतील बदलाच्या मार्गदर्शनासाठी २०६१ महसूल मंडलात स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येत आहेत. प्रयोगिक तत्त्वावर १ लाख हेक्टर क्षेत्रावर फळपिकांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. कोरडवाहू शेतीच्या विकासासाठी कोरडवाहू शेती अभियान राबविण्यात येणार असून त्या अनुषंगाने पाच वर्षांसाठी रु. १०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल.**

महाराष्ट्रातील शेती ही मुख्यत: कोरडवाहू शेती असल्याने या शेतीच्या विकासासाठी कोरडवाहू शेती अभियान राबविण्यात येणार आहे. राज्यातील ८३ टक्के कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी अभ्यास व विशेष उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी हे अभियान उपयुक्त ठरेल. त्या अनुषंगाने पाच वर्षांसाठी रु. १०,००० कोटी गुंतवणूक केली जाईल.

**उत्पादनात वाढ**

शासनाने गेल्या दहा वर्षांत कृषी क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडवून आणले. शेतकऱ्यांना खत, बियाणे, सिंचन सुविधा यांचा वेळेवर व मुबलक प्रमाणात पुरवठा केल्याने अन्नधान्य उत्पादन, प्रमुख फळ पिके उत्पादन यात भरघोस वाढ झाली. २००४-०५ साली १०.५३ दशलक्ष टन असलेले अन्नधान्याचे उत्पादन २००८-०९

२००४-०५ साली १०.५३ दशलक्ष टन असलेले अन्नधान्याचे उत्पादन २०१३-१४ साली सुमारे १५.४६ दशलक्ष टन इतके वाढले.



साली ११.३६ दशलक्ष टन झाले. २०१३-१४ साली सुमारे १५.४६ दशलक्ष टन इतके उत्पादन वाढले. प्रमुख फळपिकांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. २००४-०५ साली ३६.०८ लाख टन, २००८-०९ साली ५१.७७ लाख टन तर २०१२-१३ साली ६५.८३ लाख टन एवढे उत्पादन झाले.

**निर्यातीत वाढ**

राज्याच्या निर्यात धोरणात सुटसुटीतपणा आल्याने २००४-०५ साली १०८७ कोटी रुपये, २००८-०९ साली २९०२ कोटी रुपये तर २०१२-१३ साली ४०८२ कोटी रुपये एवढ्या फलोत्पादनाची निर्यात झाली. दहा वर्षात सुमारे चौपट वाढ झाली.

राज्यात ९ कृषी हवामान विभाग असून प्रत्येक विभागातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करून त्या ठिकाणची पीकरचना निश्चित करण्यात आली.

**स्वयंचलित हवामान केंद्र**

जागतिक हवामान बदल व त्या अनुषंगाने शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी, पीक पद्धतीत करावयाचा बदल यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी व पीक विमा योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी २०६१ महसूल मंडलात स्वयंचलित हवामान केंद्र उभारणीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यामुळे हवामान बदलास अनुसरुन पीक उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येते.

**हवामान आधारित पीक विमा योजना**

२०११-१२ पासून राज्यात प्रयोगिक तत्त्वावर साधारण १ लाख हेक्टर क्षेत्रावर फळपिकांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना द्राक्ष, केळी, संत्रा, मोसंबी, डाळिंब,



## सारे काही बळीराजासाठी

❐ रब्बी पिकांच्या नुकसानभरपाईची पातळी ६० टक्क्यांवरून ८० टक्क्यांपर्यंत. १० लाख शेतकऱ्यांना लाभ. २०११-१२ मधील नुकसानभरपाई रु. १३५ कोटी. २०१२-१३ मधील नुकसानभरपाई ५०० कोटी रुपये. ❐ फलोद्यान पिकांसाठी हवामानावर आधारित पीकविमा योजना पहिल्यांदाच राबविली. यात आठ फळपिकांचा समावेश. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना रु. ४८ कोटींची नुकसान भरपाई. ❐ कोरडवाहू शेती अभियानास मंजुरी. पुढील ५ वर्षे ते राबविण्यात येईल. या अभियानामार्फत शेतीची सुधारणा, पीक उत्पादकतेत वाढ, उत्पादन खर्चात घट आदी बाबींवर भर. ❐ या अभियानाची सुरुवात म्हणून २००० कोटी रुपये मंजूर. ❐ पीक टेहळणी आणि सल्ला कार्यक्रमांतर्गत १०० लाख शेतकऱ्यांना ३ कोटी एसएमएस संदेश पाठवले. यामुळे पिके रोगांपासून वाचली. १०० लाख हेक्टर क्षेत्राला या कार्यक्रमाचा फायदा. ❐ दुष्काळी परिस्थितीत ३ लाख शेतकऱ्यांना प्रति हेक्टर रु. ३०,०००/ अनुदान. त्यामुळे २.५ लाख हेक्टर क्षेत्रातील फलोद्यानास साहाय्य. या योजनेंतर्गत ६५० कोटींचे साहाय्य. ❐ ६० लाख दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना रु.२,५०० कोटींची मदत.



## पणन

❐ ३० लाख क्विंटल डाळी आणि कडधान्याची खरेदी. हा आतापर्यंतचा विक्रम. त्यासाठी ५०० कोटी रुपये खर्च. ❐ दर्जानिश्चिती, पॅकिंग, प्र-शीतन आणि शीत साठवण निर्मितीसाठी ४४ ठिकाणी रु. २५० कोटींची गुंतवणूक. ग्राहकांना थेट विक्री ❐ शेतकऱ्यांच्या गटाकडून ग्राहकांना भाज्यांची थेट विक्री करण्यासाठी २०० केंद्रे कार्यान्वित. आतापावेतो १ लाख ग्राहकांना फायदा. ❐ १४ लाख मेट्रिक टन कांदा साठवण क्षमतेची निर्मिती. त्यामुळे १ लाख शेतकऱ्यांना फायदा. ❐ द्राक्षांची आजवरची सर्वाधिक निर्यात - १८०००० टन, लाभार्थींची संख्या ५०,०००. ❐ निर्यात सुविधा आणि सार्वजनिक खाजगी भागीदारीमुळे केळी आणि डाळिंब यांच्या निर्यातीत वाढ.

## प्रेरणादायी यश



## थेट बांधावर खत

जसापूर हे कारंजा तालुक्यातील (जिल्हा वर्धा) एक हजार लोकवस्तीचे गाव. गावात शेतीशिवाय कुठलाही दुसरा उद्योग नाही. त्यामुळे अख्खे गाव शेतीवरच विसंबून. जून महिन्यात खरिपाच्या पेरणीला सुरुवात झाली. परंतु तालुक्याच्या ठिकाणी कुठेही रासायनिक खतांची उपलब्धता नव्हती. गावातील सर्वच शेतकरी रासायनिक खतासाठी सर्वत्र भटकत असतांना बांधावर खत या कार्यक्रमामुळे ४३ क्विंटल रासायनिक खत उपलब्ध झाला.

या योजनेमुळे शेतकऱ्यांना रासायनिक खताच्या खरेदीसाठी होणारा मनस्ताप संपला आहे. शेतकऱ्यांना बांधापर्यंत खत उपलब्ध करून देण्याचा उपक्रम या गावचा कृषिमित्र महिला बचतगट दोन वर्षांपासून यशस्वीपणे राबवित आहेत. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या श्रीमती दुर्गा रमेश भुसारी या महिला बचतगटाच्या अध्यक्षा आहेत. गावातील प्रत्येक शेतकरी कुटुंबाला शेतीसाठी साहाय्य व्हावे यासाठी या बचतगटाची त्यांनी सुरुवात केली. बांधावर खत या उपक्रमात हा बचत गट सहभागी झाला. जिल्ह्यात सर्वप्रथम रासायनिक खताची मागणी नोंदवून शेतकऱ्यांना गावातच खत उपलब्ध करून दिले.

तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे ४३ शेतकऱ्यांच्या मागणीनुसार बांधावर खत या योजनेत नोंदणी केली. त्यानुसार विदर्भ को-ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन येथे ४३ हजार रुपये रोख रक्कम जमा केल्यानंतर गावापर्यंत ट्रकद्वारे खताचा पुरवठा करण्यात आला. गावात पहिल्यांदाच रासायनिक खताचा ट्रक आल्याबरोबर शेतकरी आनंदून गेला. खरिपाच्या पेरणीसाठी रासायनिक खत गावातच मिळत असल्यामुळे इतर शेतकऱ्यांमध्येही विश्वासाचे वातावरण तयार झाले.

**- अनिल गडेकर**

आंबा, काजू या फळपिकांसाठी कार्यान्वित केली आहे. २०११-१२ मध्ये ४५,०५५ शेतकऱ्यांनी यात सहभाग घेतला. या योजनेत १०१३३ शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळाली. खरीप २०१२ मध्ये यात पेरू पिकाचाही समावेश करण्यात आला.

**नुकसानभरपाई मिळण्याची अधिक संधी**

राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत रब्बी हंगाम २०१२-१३ मध्ये गहू, ज्वारी, हरभरा, सूर्यफूल व करडई या पिकांसाठी जोखीम स्तरात ६० टक्क्यांहून ८० टक्के वाढ करण्यात आली. पिकांच्या विमा संरक्षित रकमेत ३३ ते ३५ टक्के वाढ करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याची जास्त संधी उपलब्ध झाली आहे.

**चाचणीनंतरच वाणांच्या विक्रीस परवानगी**

बियाणे गुणनियंत्रणाबाबतच्या समस्यांना आळा घालण्यासाठी खाजगी कंपन्यांकडून घेण्यात येणाऱ्या जिल्हानिहाय बीजोत्पादन कार्यक्रमाची माहिती, बीजोत्पादन शेतकऱ्यांच्या याद्या कृषी विभागाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. कृषी विद्यापीठांकडे किमान २ वर्षे चाचणीनंतर आणि त्यांची शिफारस प्राप्त झाल्यावर या वाणांच्या विक्रीस परवानगी देण्यात येते.

पीक उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा जवळपास ७३ लाख मे.टन प्रतिवर्ष वापर होतो. शेतकऱ्यांचे खतांचे लिंकिंग करणे, अधिक दराने विक्री करणे यापासून संरक्षण करण्यासाठी खरीप २०१२ च्या हंगामापासून शेतकऱ्यांच्या गटाला आवश्यक खते सरळ कृषी उद्योग, मार्केटिंग फेडरेशन किंवा कंपनीकडून थेट त्यांच्या शेतावर पोहोचवण्यात येत आहेत.

गुणनियंत्रणासाठी टोल फ्री क्रमांक १८०० - २३३ - ४००० सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कृषी विभागाच्या महाकृषी संचार या सुविधेंतर्गत १२.५० लाख भागधारक सहभागी झाले.

**कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्प**

कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्प २००८-०९ पासून राबविण्यात येत आहे. कीड रोग सर्व्हे प्रत्येक आठवडयातील ठरावीक दिवशी निवडलेल्या शेतात केला जातो. शेतातील कीड व रोगाची तीव्रता शास्त्रीय पद्धतीने मोजली जाते. ऑनलाइन पद्धतीने ही माहिती कृषी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ व इतर संबंधितांपर्यंत पोहोचवतात. कृषी शास्त्रज्ञांकडून करावयाच्या उपाययोजनेची माहिती शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे तसेच ग्रामपंचायतीच्या माहिती फलकावर लावून देण्यात येते.

**कृषी उत्पादन वाढीसाठी**

अधिकाधिक उत्पादन सेंद्रीय पद्धतीने घेण्यासाठी राज्याचे सेंद्रीय शेती धोरण ८ जानेवारी २०१३ रोजी घोषित करण्यात आले. यामुळे सेंद्रीय शेती उत्पादनास मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळणार आहे.

**वैशिष्ट्यपूर्ण पणन विभाग**

बाजार समित्यांची संख्या २९५ वरून ३०२ झाली असून बाजार समित्यांची वार्षिक उलाढाल रु. ३८,७४३ कोटीवरून रु. ४६,२८७ कोटीपर्यंत वाढली. उत्पन्न रु. ४३९.४७ कोटीवरून रु. ५४२.८५ कोटीपर्यंत वाढले. शासनाच्या पाठपुराव्यामुळे केंद्राने कांदा निर्यात बंदी मागे घेतली. २०१० पूर्वी राज्यात १३ निर्यात सुविधा केंद्रे होती. त्यात आता आणखी सहा केंद्रांची भर पडली आहे.

आंबा व काजू बोर्ड स्थापन करण्यासंदर्भात माजी कृषीआयुक्त डॉ. कृष्णा लव्हेकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे. शेतमाल तारण योजनेंतर्गत रु. २० कोटींचे अर्थसाहाय्य, पहिल्या टप्प्यात ४० वखार केंद्र विकसित व पणन मंडळास ॲक्रेडिशन एजन्सी म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

**- अर्चना शंभरकर**



## फलोत्पादनात आघाडी

- पीक कीड नियंत्रण, सल्लागार व व्यवस्थापन प्रकल्पाचा आंबा, डाळिंब, केळी पिकांना फायदा. २०१२-१३ मध्ये कीड आणि रोगविषयक २६१० संदेश एसएमएसच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्यामुळे कीड नियंत्रण शक्य. त्यामुळे उत्पादन खर्चात घट. नुकसान वाचले.
- युरोपात द्राक्षांची निर्यात वाढविण्यासाठी कीडनाशक देखरेख योजना. दरवर्षी १९ हजार द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची ग्रेप-नेट ऑनलाइन सिस्टीम मध्ये नोंदणी. द्राक्षावरील फवारणी आणि इतर बाबतीत या आधुनिक व्यवस्थेतून देखरेख.२०१२-१३ साली १ लाख ७२ हजार ७६५ टन द्राक्षे निर्यात.
- ग्रेप-नेटच्या धर्तीवर डाळिंबासाठी अनार-नेट आणि वाइन द्राक्षांसाठी वाइन - नेट सुरू.
- फळे आणि भाजीपाला पिकांचा एकात्मिक कृषी विकास. त्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी सुरू करणारे महाराष्ट्र देशातले पहिले राज्य.
- द्राक्षे, डाळिंब, केळी, बटाटा, टोमॅटो ही पिके अधिक तंत्रशुद्ध पद्धतीने वाढवून त्यांची निर्यात करण्यासाठी शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानामार्फत मार्गदर्शन.
- आयात करण्यात येणाऱ्या रोपविषयक साहित्यासाठी स्वतंत्र व्यवस्था.
- नाशिकची द्राक्षे आणि महाबळेश्वरच्या स्ट्रॉबेरीजसाठी बौद्धिक संपत्ती हक्क मिळविण्यासाठी नोंदणी.
- आंबा, कांदा, डाळिंब, द्राक्षे, केळी, संत्री आणि फुलशेतीसाठी ८ कृषी निर्यात विभाग. निर्यात वाढविण्यासाठी पीक काढणीनंतरच्या सुविधा.
- हापूस आंब्यासाठी कोकण कृषी विद्यापीठ, केशरसाठी औरंगाबाद येथे डाळिंबासाठी राहुरी आणि संत्र्यासाठी नागपूर येथे उत्कृष्टता केंद्र सुरू.



# जलसमृद्धीचे पाझर

**भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे व शेतीसाठी संरक्षित सिंचनाची सोय याद्वारे दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी साखळी सिमेंट काँक्रिट बंधारे बांधण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात १४८७ सिमेंट काँक्रिट बंधाऱ्यांची कामे ३ ते ६ महिन्यांच्या अल्प कालावधीत पूर्ण करून १०,००० हेक्टर संरक्षित सिंचनाची निर्मिती झाली आहे. शासनाने या कामासाठी २०१३-१४ मध्ये ६६५ कोटी रुपये एवढ्या रकमेची भरीव तरतूद केली आहे.**

शेतीसाठी संरक्षित जलसिंचनाची साधने निर्माण करणे, जमिनीची प्रचंड प्रमाणात होणारी धूप थांबवणे, पडीक जमिनीचा विकास करून ग्रामीण भागातील उत्पन्न व उत्पादनाची साधने वाढविणे याकरिता जलसंधारणाचा कार्यक्रम राज्यात प्रभावीपणे विविध योजनांद्वारे राबविण्यात येत आहे.

**साखळी पद्धतीचे सिमेंट नालाबांध**

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळी परिस्थितीत पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या, पाण्याची पातळी २ मीटरपेक्षा खाली गेलेल्या तालुक्यांमध्ये साखळी पद्धतीने सिमेंट नालाबंधारे बांधण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. पुणे जिल्ह्यातील पुरंदर; सातारा जिल्ह्यातील माण, खटाव; सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा; अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, संगमनेर; सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ, खानापूर, कडेगाव, मिरज, तासगांव, आटपाडी आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम या १५ तालुक्यांची या योजनेकरिता निवड करण्यात आली होती. भूजलाची पातळी वाढवून त्याद्वारे पिकांना संरक्षित सिंचनाची सुविधा आणि त्याचबरोबर पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत १४४ कोटी रुपये खर्च करुन एकूण १४८७ सिमेंट नाला बंधारे बांधण्यात आले आहेत. या सर्व सिमेंट बंधाऱ्याचे लोकार्पण ९ जून २०१३ रोजी एकाच वेळी करण्यात आले.

**फलनिष्पती**

या सिमेंट बंधाऱ्यामध्ये २२६४४ स.घ.मी. एकूण पाणी साठा झाला असून १०३०३ हेक्टर एवढी संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यानुसार २०१३–१४ मध्ये साखळी सिमेंट काँक्रिट बंधारे बांधण्यासाठी ८२ तालुक्यांना निधी वितरित करण्यात आला आहे. या निधीतून खोलीकरणासह १५६० सिमेंट काँक्रिट बंधारे बांधण्यात येतील. त्यातून १०९२० हेक्टर क्षेत्रावर संरक्षित सिंचन निर्माण होईल. योजनेच्या तिसऱ्या टप्प्यासाठी ३६५ कोटी रुपये एवढा निधी जानेवारी २०१४ मध्ये १७५ तालुक्यांना वितरित करण्यात आला असून त्यातून २४३८ सिमेंट नालाबांध बांधण्यात येणार आहे. त्याद्वारे १७०६६ हेक्टर क्षेत्रावर संरक्षित सिंचन होईल.

**लघुसिंचन कार्यक्रम**

ग्रामीण भागात लघुसिंचन विभागामार्फत पूर्ण झालेल्या सुमारे ६२,२२९ योजनांमधून सुमारे १५०२१८२ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे. सद्य:स्थितीत सुमारे ६९६२ योजना प्रगतिपथावर असून त्यातून सुमारे १७८८५१ हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

**शेतकऱ्यांना दिलासा**

राज्याला गेल्यावर्षी दुष्काळ आणि अतिवृष्टी या दोन्ही नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. जलसंधारण विभागाने केलेल्या कामांमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी आणि शाश्वत सिंचन क्षेत्र निर्माण करण्यासाठी लघुसिंचन प्रकल्प फायदेशीर ठरत आहेत. या प्रकल्पांमुळे राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी २८ टक्के क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकणार आहे. उर्वरित ७२ टक्के कोरडवाहू क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी लघुसिंचन प्रकल्प किफायतशीर




अग्रणधुळगाव बंधारा क्र. १, जिल्हा सांगली

ठरणार आहेत.

**१० हजार हेक्टर सिंचन क्षमतेची निर्मिती**

जलसंधारण विभागाकडील ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या पूर्ण झालेल्या २७२ लघुसिंचन प्रकल्पांचे लोकार्पण १३ जानेवारी २०१४ रोजी एकाच वेळी करण्यात आले. पूर्ण झालेल्या या प्रकल्पांतून १० हजार ३६६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. या योजनांमध्ये ५ लघुपाटबंधारे तलाव असून १४ साठवण तलाव, २८ पाझर तलाव, १०४ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, १० साठवण बंधारे, १०८ सिमेंट काँक्रिट बंधारे आणि ३ गाव तलाव आहेत.

**विदर्भ सघन सिंचन विकास**

विदर्भातील ८ कापूस उत्पादक जिल्ह्यासाठी २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी विदर्भ सघन सिंचन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या योजनेसाठी ३२५० कोटी रुपये इतकी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी मृद्‌संधारणासाठी १२४१.५० कोटी रुपये, कृषीसाठी ५४९.५० कोटी रुपये आणि लघुसिचंनासाठी (जलसंधारण) १४५९ कोटी रुपये तरतूद आहे. या तरतुदीपैकी ३२४.१२ कोटी रुपये फेब्रुवारी २०१४ अखेर पर्यंत खर्च करण्यात आले आहेत.

**उद्देश**

संरक्षित सिंचन व्यवस्थेची निर्मिती, भूगर्भातील पाणी पातळीत वाढ, जलसंधारणाच्या विविध उपायांद्वारे जमिनीच्या पोतात सुधारणा, अस्तित्वातील जलस्रोतांचे बळकटीकरण, दुरुस्ती, प्रभावी सिंचन व पीक व्यवस्थापन व्यवस्थेची निर्मिती, ठिबक व तुषार सिंचनाचा प्रभावी वापर करणे या बाबी या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

**प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सिंचन सुविधा**

सर्वसाधारण ७.६६ हेक्टर क्षेत्रावर हा कार्यक्रम राबविण्यात येणार असून यातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सिंचन सुविधा उपलब्ध होईल व भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ होईल. शेततळ्याच्या कामामधून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या प्रतिशेततळे ०.८० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल.

या कार्यक्रमांतर्गत अंदाजे ५७६५० शेततळी बांधण्यात येतील. यामधून ४६०४८ हेक्टर क्षेत्रात अप्रत्यक्षरीत्या सिंचन सुविधा उपलब्ध होईल. सिमेंट नालाबांध व नाला खोलीकरण या उपचारामधून भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ होऊन विहिरीतील पाण्याची पातळी वाढेल. यातून अंदाजे ७६९७० हेक्टर क्षेत्रात अप्रत्यक्ष संरक्षित सिंचन सुविधा निर्माण होईल.

**राजीव गांधी सिंचन व कृषी कार्यक्रम**

हा कार्यक्रम राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत राबविण्यात येत आहे. यापूर्वी पूर्णत्वास आलेल्या २५ लघुसिंचन योजनांमध्ये गुणवत्तावृद्धी करून पिकांची

## सिमेंट बंधाऱ्यांचे यश

- दुष्काळी भागातील सिमेंट बंधाऱ्यांचे यश लक्षात घेऊन हा कार्यक्रम युद्धपातळीवर राबविणार. पाणी समस्या सोडवण्यासाठी ६० हजार कोटींची योजना.
- तात्पुरत्या उपाययोजनांबरोबरच कायमस्वरूपी उपाययोजनांवर लक्ष केंद्रित.
- पाण्याची तीव्र टंचाई जाणवणाऱ्या ४७४ गावांची पहिल्या टप्प्यात सिमेंट बंधारे बांधण्यासाठी निवड.
- पहिल्या टप्प्यात १ हजार ४८७ सिमेंट बंधारे बांधण्यात आले. या कामांवर १४३ कोटी ४४ लाख रुपये खर्च. आठशे दक्षलक्ष घनफूट पाणीसाठा साध्य. यामुळे १० हजार ३०३ हेक्टर क्षेत्र संरक्षित.
- १४ जिल्ह्यातील ८४ तालुक्यांत हा कार्यक्रम राबविणार. ६६५ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत.
- एका सिमेंट नाल्यामुळे सुमारे ४ हेक्टर जमीन ओलिताखाली येते.



**सांगली जिल्ह्यात सिमेंट नालाबांध बांधण्याच्या कार्यक्रमांतर्गत ९०६ नवीन सिमेंट नालाबांध बांधण्यात आले.**

## जलस्रोतांचे व्यवस्थापन

- गेल्या ५ वर्षात ५.९५ लाख हेक्टर अतिरिक्त जलसिंचन क्षमता निर्माण. गेल्या ३ वर्षात ५०० हून अधिक प्रकल्प पूर्ण.
- जल व्यवस्थापनाच्या उपक्रमांमुळे जलसिंचन क्षमतेच्या उपयोगाच्या प्रमाणात ६७ टक्क्यांपर्यंत वाढ.
- राज्यातील विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी २०७.१५ मेगावॅट क्षमतेचे एकूण ७९ प्रकल्प प्रगतिपथावर.
- महाराष्ट्र जलक्षेत्र सुधारणा प्रकल्प कार्यान्वित. २८६ प्रकल्पामधील धरण सुरक्षितता कामांसोबतच २३५ प्रकल्पांमधील ६.४५ लाख हेक्टर लाभक्षेत्र पुनर्स्थापित करण्यासाठी याचा उपयोग. १७६ प्रकल्पांमधील कालवा पुनर्वसन कामे आणि २३७ प्रकल्पांमधील धरण सुरक्षितता कामे पूर्ण.
- विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत विदर्भातील आठ कापूस उत्पादक जिल्ह्यांसाठी केंद्र शासनातर्फे रु. ३,२५० कोटी मंजूर. यामध्ये प्रामुख्याने कृषी आणि मृद्‌संधारण (रु. १,७९१ कोटी) आणि लघुसिंचन (जलसंधारण) (रु. १,४५९ कोटी) अशा क्षेत्रांचा समावेश.
- या कार्यक्रमामध्ये सिंचन सुविधा, पाणी वापरातील कार्यक्षमतेत वाढ, जमिनीचा अधिक चांगला उपयोग आणि कृषी उत्पादन वृद्धीसाठी पीक व्यवस्थापन पद्धती यांचा समावेश.
- राजीव गांधी सिंचन आणि कृषी विकास कार्यक्रमाद्वारे मूल्यवृद्धी आणि अधिक पीक उत्पादन साध्य करणार. ४,००० शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळेल. प्रकल्पाचा खर्च अंदाजे रु. २५ कोटी, कालावधी ३ वर्षे (२०११-१४).
- एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ४० लाख हेक्टर क्षेत्र व्यापणाऱ्या आणि रु. ५,००० कोटींच्या खर्चाच्या ९४८ प्रकल्पांना केंद्राची मंजुरी. आतापावेतो रु. १,२८४ कोटींचा निधी प्राप्त. त्यातून ८.२८ लाख हेक्टरवरील उपाययोजनांसाठी रु. ८८३ कोटींचा खर्च.
- लघुसिंचन कार्यक्रमाद्वारे २९ लघुसिंचन योजनांपैकी १५ योजनांचे काम पूर्ण. प्रत्यक्ष सिंचन निर्मिती क्षेत्र २,११४ हेक्टर.
- महात्मा जोतिबा फुले जलभूमी संधारण अभियानाच्या अंमलबजावणीमुळे २०,१७५ कामांमधून ७५१ लाख घनमीटर्स गाळ काढला. यामुळे २,६२९ दशलक्ष घनफूट पाण्याची साठवण क्षमता निर्माण. ७,४०८ केटीवेअर दरवाजे बांधले. २,९९२ अस्तित्वातील जलसंवर्धन बंधाऱ्यांची दुरुस्ती.
- नदी जल प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी व नदीच्या पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी राज्य नदी संवर्धन योजना हाती घेण्यात आली आहे.

उत्पादकता वाढविणे व याद्वारे अंदाजे ४००० शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत बदल घडवून आणणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम**

ही योजना राज्यात २००९ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने एकूण ५८२१ कोटी रुपयांचे १०६४ प्रकल्प मंजूर केले असून त्याद्वारे ४६ लाख हेक्टर क्षेत्रावर उपचार करण्यात येणार आहेत.

**जल व भूमी संधारण अभियान**

पर्जन्याधारित कोरडवाहू शेतीसाठी लोकसहभागाद्वारे पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचन उपलब्धता वाढविणे, पाणी व माती यांचे संवर्धन करणे, याकरिता महात्मा जोतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान राज्यात सुरू करण्यात आले असून ते ग्रामीण भागातील जनतेच्या लोकसहभागातून राबविण्यात येत आहे.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी २०१३-१४ मध्ये या अभियानासाठी मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून दुष्काळग्रस्त १३ जिल्ह्यांसाठी प्रतिजिल्हा २ कोटी रुपये याप्रमाणे २६ कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून दिले. जलस्रोतातील गाळ लोकसहभागातूनच काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. उपलब्ध झालेला निधी जलस्रोतांचे बळकटीकरण करण्यावरच खर्च करण्यात येणार आहे.

**अभियानातून काय मिळाले?**

- विविध २०१७५ उपचारांमधून ७५१



## ई-जलसेवा

महाराष्ट्र शासन, ई-प्रशासन धोरणाच्या अनुषंगाने 'ई-जलसेवा' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पातील सर्व ३४ मोड्युल्स कार्यान्वित झाली आहेत. ई-जलसेवा पोर्टलमार्फत विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामुळे नागरिकांना आता, प्रकल्पनिहाय आवर्तन कार्यक्रम, शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली पाण्याची हक्कदारी, धरणातून सोडलेला विसर्ग, पुराच्या संबंधातील इशारे, मोक्याच्या ठिकाणी पाण्याची पातळी व संनियंत्रण कक्षाबाबतची माहिती सहजपणे मिळू शकेल.



**सांगली जिल्ह्यात सिमेंट नालाबांध निर्मितीचा कार्यक्रम यशस्वी झाला. पाण्याने भरलेल्या सिमेंट नालाबांधातील पाण्याचे पूजन उत्साहाने करण्यात आले.**

## पाणीपट्टी माफ

■ सिंचन लाभधारकांच्या १ एप्रिल २०१० रोजी प्रलंबित असलेल्या सिंचन पाणीपट्टी थकबाकीपैकी पोकळ पाणीपट्टी व पोकळ पाणीपट्टीवरील विलंब आकारणी रक्कम माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. ■ महानगरपालिका, नगरपालिका व इतर पिण्याच्या पाण्याच्या योजनांची पिण्याच्या पाण्यासंबंधी ३१ मार्च २०१० रोजी प्रलंबित असलेल्या पाणीपट्टी थकबाकीपैकी अशी पाणीपट्टी व या पाणीपट्टीवरील विलंब आकारणी रक्कम माफ करण्यात येईल. ■ बिगरसिंचन लाभधारकांची औद्योगिक पाणीवापरासंबंधी १ एप्रिल २०१० रोजी प्रलंबित असलेल्या अशा पाणीपट्टीची रक्कम ही त्यांच्या ३१ मार्च २०१० पर्यंतच्या बिगरसिंचन पाणीपट्टी थकबाकीपैकी पोकळ पाणीपट्टी व पोकळ पाणीपट्टीवरील विलंब आकारणी वगळता उर्वरित रक्कम भरण्याच्या अटीच्या अधीन राहून माफ करण्यात येईल.

शेतकऱ्यांच्या घरगुती अडचणींमुळे किंवा पिकांवर रोगराई पडते तेव्हा नदीकाठची पिके पुरात वाहून जातात अशा कारणांमुळे त्यांना मंजूर असलेल्या पाणीसाठ्याइतके पाणी ते वापरतातच असे नाही. तथापि, नियमानुसार त्यांना पाणी मंजूर केले असल्याने सिंचनाची पाणीपट्टी आकारली जाते. अशा शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात न वापरलेल्या पाण्यावर आकारली गेलेली पाणीपट्टी ही पोकळ पाणीपट्टी ठरते.

लाख घनमीटर गाळ काढण्यात आला. त्यामुळे २६२९ दशलक्ष घनफूट पाणीसाठ्यात वाढ झाली.

■ कोल्हापूर पद्धतीच्या ७४०८ बंधाऱ्यांना दरवाजे बसवण्यात आले.

■ कोल्हापूर पद्धतीच्या जलसंधारणाच्या विविध २९९२ उपचारांची दुरुस्ती करण्यात आली.

**- सुधा महाजन**

## प्रेरणादायी यश



## हरितक्रांतीची ऊर्जा

अकोला जिल्ह्याचा मोठा भाग खारपानाखाली येत असल्यामुळे बारमाही शेती करण्यासाठी अनुकूल नाही. सिंचनासाठी प्रकल्प उभे करताना इथला खारपानपट्टा मोठी अडचण आहे. त्यामुळे अकोल्यापासून १० किलोमीटरवर असलेल्या घुसर या गावाने शासनाच्या मदतीने शेततळ्याची चळवळ उभी करून पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपेक्षा कमी नाही हे दाखवून दिले आहे. या गावात १४२ शेततळी बांधण्यात आली आहेत. या शेततळ्यांना प्रत्येकी ८२ हजारांवर अनुदान शासनाकडून दिले गेले. शेततळ्यामुळे हरभरा, गहू, मोहरी, कांदा, मिरची या नगदी पिकांची शेती बहरली. हरितक्रांतीचा हा प्रयोग विदर्भातील निसर्गाच्या पुढे हतबल झालेल्या शेतकऱ्यांसाठी नवी ऊर्जा देणारा ठरला. या शेततळ्यांच्या पाण्यामुळे तीनपट उत्पादन वाढले. शेततळे झाल्यापासून जवळपास ३ कोटी रुपयांपेक्षा अधिकचे उत्पादन वाढले. ४४ हेक्टर क्षेत्रावर हरभरा ग्राम बीजोत्पादन प्रकल्प सुरू आहे. त्यातून ८१४ क्विंटल हरभरा बियाण्यांची निर्मिती केली जाते, शेततळ्यांत मत्स्यशेतीचीही जोड देण्यात आली. हिरव्या चाऱ्यामुळे दूध उत्पादनात वाढ झाली. प्रक्रिया उद्योगास चालना मिळाली. शेतीत आधुनिक साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. सध्या या गावात मशागतीसाठी फक्त ट्रॅक्टरचाच उपयोग केला जात असून हे प्रगतीचे वारे आर्थिक बदलातून आले आहेत. जीवनमान, शिक्षण यातही आमूलाग्र बदल झाला आहे. सामूहिक विकासाला शासनाचा हातभार लागला की, त्याला योग्य दिशा मिळते व ती दिशा परिवर्तनाची नांदी ठरते.

**- युवराज पाटील**

# पशुधन आणि समृद्धी

**राज्याच्या शेती विकासात जनावरांना महत्त्वाचे स्थान आहे. या जनावरांमुळे शेतकऱ्यांना पर्यायी रोजगार-स्वयंरोजगार सुरू करता येतो. त्यातून त्यांना उत्पन्नाचा आणखी एक स्रोत उपलब्ध होतो. त्यामुळेच राज्य शासन पशुसंवर्धन, दुग्धविकास, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय यावर लक्ष केंद्रित करत असते. त्यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येतात. पशुधनाचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी प्रत्येक तालुक्यात, गावागावांमध्ये पशुवैद्यकीय दवाखान्यांची निर्मिती करण्यात आली आहे.**

सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, महिला, दारिद्र्य रेषेखालील व अनुसूचित जाती जमातीचे घटक, महिला बचतगट यांना आधार देणाऱ्या पशूसंवर्धन, दुग्धविकास आणि कुक्कुटपालनाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. २०११-२०१२ पासून सहा दुधाळ जनावरांचे वाटप हा कार्यक्रम राबविण्यास शासनाने सुरुवात केली.

राज्यातील ज्या भागात मानवविकास निर्देशांक कमी आहे अशा जिल्ह्यात कुक्कुटपालन ही योजना राबवून तेथील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सुशिक्षित बेरोजगार, शेतकऱ्यांना, उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने १० + १ शेळी व मेंढी गटवाटपाचा कार्यक्रम सुरू करण्याचा उपक्रम हाती घेतला. यासाठी लाभार्थ्यांना शेळी गटांसाठी रु. ८७.८५७ व मेंढी गट वाटपासाठी रु. ८३,६०७ अर्थसाहाय्य दिले जाते.

पशुसंवर्धनासाठी शासनाने कामधेनू दत्तक ग्राम योजना, वैरण विकास कार्यक्रम, वैरणीचे बियाणे, वैरण, मुरघास उत्पादन, कडबाकुट्टी संयंत्र असे उपक्रम हाती घेतले आहेत. ज्या गावात ३०० पर्यंत पशू आहेत त्या गावात कामधेनू योजना राबविण्यात येते. पशुरोग निदान, लसीकरण, औषधोपचार, गोचीड निमूर्लन, वैरण विकास, जनावरांची निगा, दूध स्पर्धा यासाठी प्रशिक्षण व प्रात्यक्षिक या योजनेद्वारे मोहिम राबवून दिले जाते. २०१३ पर्यंत या योजनेचा लाभ सुमारे साडेतीन हजार गावांना झाला आहे.

गायी-म्हशींची उत्पादकता वाढवण्यासाठी अनुवांशिकता सुधारणा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पशुधन सेवकांमार्फत



३०० पर्यंत जनावरे असलेल्या गावांसाठी कामधेनू योजना-२०१३ पर्यंत या योजनेचा लाभ सुमारे साडेतीन हजार गावांना.

शेतकऱ्यांच्या दारात कृत्रिम रेतन सेवा पुरवण्यात येत आहे.

**दुग्ध भुकटी प्रकल्प**

दुग्ध भुकटी प्रकल्पधारकांना रु. २९ कोटी अनुदान दिल्याने ते मोठ्या संकटातून सावरले. दुग्ध व्यवसायाच्या भरभराटीसाठी वेगवर्धक दुग्धविकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

सहकारी दूध संघाच्या महाराष्ट्र सहकारी दूध महासंघ (महानंद) या शिखर संस्थेच्या स्तरावर प्राप्त होणाऱ्या दुधावर योग्य प्रक्रिया करून साठवणूक क्षमता वाढवण्यासाठी गोरेगाव, मुंबई येथे १.०४ लाख लीटर्स प्रतिदिन क्षमतेचा ट्रेटाफिनो व ट्रेटा ब्रिक पॅकिंग प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पापैकी ट्रेटाफिनोचा प्रकल्प २०१३ मध्ये कार्यान्वित झाला.

कोकण, मराठवाडा व विदर्भ भागात दुग्ध व्यवसायाला गती देण्यासाठी एकात्मिक दुग्धशाळा प्रक्षेत्र उपवन प्रकल्प (इंटिग्रेटेड डेअरी फॉर्म) उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

सप्टेंबर २०१३ मध्ये शासनाने विदर्भ व मराठवाडा विभागात दूध उत्पादन वाढीसाठी व उत्पादित दूध संकलित करण्यासाठी न्यू जनरेशन को. ऑपरेटिव्ह चा अवलंब करण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. त्यामुळे विदर्भ व मराठवाडा विभागात दूध संकलन व्यवस्था निर्माण होणार आहे.

**मत्स्यव्यवसाय**

मत्स्यव्यवसायातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. या व्यवसायात रोजगाराच्या प्रचंड क्षमता आहेत, हे लक्षात घेऊन शासनाने बंदर व जेटी उभारण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. मच्छीमारांना मुलभूत सुविधा पुरविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. अशा वेगवेगळ्या योजनांमधून ७४ ठिकाणी जेटी उभारण्यात येतील. वरळी व माहुल येथील जेटीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ठिकाणची जेटीची कामे अंतिम टप्प्यावर आहेत.

**– आकाश जगधने**

❖ ❖

- विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्ह्यांसाठी कुक्कुट वितरण योजना.
- कुक्कुटपालन विकास योजनेंतर्गत सर्वसाधारण लाभार्थींसाठी रु. १,१२,५०० ची मदत तर अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी रु. १,६८,७५० ची मदत. या योजनेचा लाभ ३५०० कुटुंबांना.
- महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी स्वयंसाहाय्यता गटांना अंडी उबविणारी २७४ संयंत्रे.
- गेल्या दोन वर्षात २८०० अनुसूचित जाती आणि जमातीच्या कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वितरण.
- शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार आणि अनुसूचित जाती जमातीचे लाभार्थी इत्यादींसाठी पूरक उत्पन्न साधन म्हणून १० अधिक १ मेंढी पालन एकक वितरणाची योजना. या योजनेमध्ये गेल्या दोन वर्षात ६३०० लाभार्थ्यांना लाभ.
- २०१३-१४ मध्ये ४० अधिक २ मेंढी पालन एककाची एक नवी योजना. या योजनेचा १,४९० लाभार्थ्यांना लाभ.
- चारा विकास योजनेंतर्गत १०० टक्के अनुदानावर बियाणांसाठी प्रति हेक्टरी १५०० रुपये.
- मासेमारांसाठी ३९ ठिकाणी मासे उतरवून घेण्यासाठी धक्के बांधणार. त्यासाठी रु. १७२ कोटी मंजूर.
- मासळी उत्पादन वाढविण्यासाठी बोरे (जिल्हा-वर्धा), मुळा (जिल्हा-अहमदनगर) आणि त्राली-पाटण (जिल्हा-सातारा) येथे केज कल्चर हा विशेष प्रकल्प
- विविध महानगरपालिका आणि परिषदांमध्ये ३४ मासळी बाजार सुरू करणार.



## प्रेरणादायी यश



# दूरदृष्टीतून प्रगती

माहुल, कोळीवाडा येथील श्री. वसंत चंद्रकांत कोळी यांना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत बालपण घालवावे लागले. ८ वी नंतर त्यांना शिक्षण सोडावे लागले. या परिस्थितीवर मात करून त्यांनी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या मदतीने स्वत:ची आर्थिक उन्नती करून घेतली. या संस्थेच्या कारभारात ते संधी मिळताच सक्रिय झाले. दूरदृष्टीच्या विविध उपाययोजना राबवून त्यांनी संस्थेला सक्षम केले.

१९९७ पर्यंत संस्थेच्या एकूण ८ नौका मासेमारीसाठी कार्यरत होत्या. त्यातून ५० मच्छीमारांना रोजगार उपलब्ध झाला. १९९७ मध्ये कोळी, यांची संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. गेली १७ वर्षे ते संस्थेचे बिनविरोध अध्यक्ष म्हणून निवडून येत आहेत. या काळामध्ये शासनाच्या साहाय्याने १३४ नौका बांधण्यात आल्या. सुमारे २०० खाजगी नौका संस्थेच्या सभासद झाल्या. सद्य:स्थितीत संस्थेच्या एकूण ३३४ नौका कार्यरत असून या नौकांवर सुमारे ३५०० मच्छीमार लोकांना रोजगार मिळाला आहे.

या नौकांना बर्फाची कमतरता भासत होती. श्री. कोळी यांच्या प्रयत्नाने २००५ मध्ये शासनाच्या अर्थसाहाय्यामधून संस्थेच्या मच्छिमार नौकांसाठी प्रति दिन ४० टन क्षमतेचा बर्फ कारखाना व शीतगृह तळोजा, नवी मुंबई येथे बांधण्यात आले. या बर्फकारखान्यातून संस्थेच्या सभासद नौकांना २ टेम्पोद्वारे बर्फ पुरवठा चालू आहे.

संस्थेचा स्वत:चा डिझेल पंप नसल्यामुळे सभासदांना मासेमारीसाठी लागणारे डिझेल इतर संस्थांच्या डिझेल पंपावरून घ्यावे लागत असे. यामध्ये वेळेचा अपव्यय होत होता. श्री. कोळी यांच्या प्रयत्नाने २००६ मध्ये संस्थेचा स्वत:चा डिझेल पंप नवीन भाऊचा धक्का येथे कार्यरत झाला.

# सहकारातून समृद्धीकडे

**महाराष्ट्र शासनाने सहकार चळवळ अधिक बळकट कशी होईल व ती निकोप राहील यादृष्टीने सातत्याने पावले उचलली आहेत. त्या अनुषंगाने सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानूनच शासनाने सहकार क्षेत्रात बदल घडविले अथवा नवीन कायदे आणले. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने, पतसंस्था, ग्राहकसंस्था, सूत गिरण्या, बँका इत्यादी स्वरूपात सहकारी चळवळ समर्थपणे उभी आहे. मुंबईसारख्या महानगरात गृहनिर्माण संस्था, सहकारी बँका या क्षेत्रात समाविष्ट आहेत.**

महाराष्ट्राच्या विकासात सहकाराचे मोठे योगदान आहे. इतर राज्यांच्या तुलनेत राज्यात सहकाराची चळवळ अत्यंत ताकदीने उभी असल्याचे दिसते. आजही सहकार क्षेत्रावर लोकांचा विश्वास आहे. ग्रामीण भागात प्रामुख्याने सहकाराची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे.

सहकार ही महाराष्ट्राची शक्ती आहे. राज्यात आज २ लाख २७ हजार सहकारी संस्था विविध रूपात कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये सुमारे चार लाख कोटींच्या ठेवी आहेत. राज्याच्या ११ कोटी लोकसंख्येपैकी सुमारे साडे पाच कोटी लोक विविध सहकार संस्थांचे सभासद आहेत.

केंद्र शासनाने भारतीय संविधानात ९७ वी घटनादुरुस्ती केली. सहकार क्षेत्रासाठी हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. ९७ व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने सहकार कायद्यात सुधारणा करण्यात आल्या. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये सुधारणा करण्यासाठी संयुक्त समितीच्या शिफारशी विचारात घेण्यात आल्या. त्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम २०१३ संमत

गेल्या ३ वर्षात राज्यात २९ साखर कारखाने उभे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक साखर कारखाने असणारे राज्य.



## विकास आणि समृध्दी

- ❒ आर्थिक संकटात असणाऱ्या पतपेढ्यांना मदत करण्यासाठी रु. २०० कोटींचे पॅकेज.
- ❒ शेतकऱ्यांना ६ टक्के वार्षिक व्याजदराने पीककर्ज देण्याचे धोरण. तथापी डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेमुळे रु. १ लाखापर्यंत पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना मूळ कर्ज रकमेवर ३ टक्के सवलत आणि १ लाखाहून अधिक आणि ३ लाखांपर्यंत कर्ज रकमेवर २ टक्के सवलत.
- ❒ ज्या शेतकऱ्यांनी कर्जरक्कम वेळेवर परत केली, अशांना शून्य टक्के व्याजदराने पीककर्ज. गेल्या वर्षात या योजनेखाली रु. १४५ कोटींची रक्कम वितरित.
- ❒ राज्यातील १६ दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमधील एकूण रु. ७,५८८ कोटींच्या पीक कर्जाचे (खरीप ७,१४५ कोटी आणि रब्बी ४४३ कोटी) मध्यम कालावधीच्या कर्जामध्ये रूपांतर. यामुळे या जिल्ह्यांमधील शेतकरी २०१३-१४ मध्ये पीककर्ज मिळविण्यासाठी पात्र.



- ❒ विविध बँकांकडून पीककर्ज मिळविणाऱ्या राज्यातील ३४,०२,५८१ शेतकऱ्यांना शेती कर्जमाफी आणि कर्ज मदत योजना २००९ या योजनेचा लाभ. कर्जमाफीची रक्कम रु. ४,००८ कोटी रुपये.
- ❒ सहकारी संजीवन योजनेंतर्गत वाढीव पीक कर्ज पुरवठा रकमेवर २ टक्के सवलत किंवा रु. ५०,०००. याशिवाय गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढीव पीककर्ज परतीच्या रकमेवर २ टक्के सवलत किंवा रु. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते दिले जाईल.
- ❒ संकटात सापडलेल्या सहकारी पतपेढींना २०० कोटी रुपयांचे साहाय्य. ४६९ पतपेढींमधील १,१९,२५५ गुंतवणूकदारांना १६१.५२ कोटी रुपये प्रदान.
- ❒ गेल्या ३ वर्षात राज्यात २९ साखर कारखाने उभे. महाराष्ट्र हे देशातील सर्वात अधिक साखर कारखाने असणारे राज्य.
- ❒ शुगरकेन हार्वेस्टरच्या खरेदीसाठी २५ टक्के सबसिडी. २०११-१२ पासून १३१ लाभार्थ्यांना रु. ३२.४८कोटींची सबसिडी दिली गेली.
- ❒ दोन साखर उद्योगांमधील हवाई अंतर १५ किलोमीटर्सवरून २५ किलोमीटर्सपर्यंत वाढवणार. त्यामुळे राज्यात किमान ३९२ साखर कारखाने उभारले जाऊ शकतील. त्यांच्या गळीत क्षमतेनुसार २० लाख हेक्टर क्षेत्र ऊस लागवडीखाली आणणे शक्य होईल.

करण्यात आला. या अधिनियमाच्या अनुषंगाने सहकारी संस्थेची निवडणूक घेण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येणार आहेत. या कायद्यातील सुधारणांमुळे सहकारी संस्थांच्या ठेवीदारांचे हित जपण्यास मोठे साहाय्य होणार आहे.

**सावकारी नियमन कायदा**

सावकारी पाशाला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा कायदा राज्यात लागू करण्यात आला आहे. या कायद्यामुळे अवैध सावकारीला आळा घालण्याबरोबरच मुद्दलापेक्षा अधिक व्याज घेणे,चक्रवाढ पद्धतीने जास्त व्याजदर आकारणे इत्यादींना प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच दोषी व्यक्तीला या कायद्यांतर्गत पाच वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे.

**- शांताराम शेरवाडे**

## प्रेरणादायी यश



## नवा मापदंड

कोल्हापूर जिल्ह्यात कागल येथे असलेल्या छत्रपती शाहू सहकारी साखर कारखान्याने सर्वोत्कृष्ट तांत्रिक क्षमता, सर्वोत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन, अशा विविध गटातील राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील ५० च्या आसपास पुरस्कार पटकावले आहेत. या कारखान्याला स्टार एक्स्पोर्ट हाऊस म्हणूनही मानांकन मिळाले आहे.

शेतकऱ्यांच्या उसाला सर्वाधिक दर, सभासदांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी उशिरा गाळपास आलेल्या उसास अनुदान, उत्पादित ऊस १०० टक्के कारखान्यास पाठवणाऱ्या सभासदास अतिरिक्त अनुदान, ऊस उत्पादकांना सर्व माहिती बांधावर मिळण्यासाठी स्मार्ट कार्ड योजना, आदी उपक्रम या कारखान्यात राबविले जातात. कारखान्याने दैनंदिन कामकाज पूर्णपणे संगणकीकृत केले असून त्यासाठी लागणारे सॉफ्टवेअर स्वत: विकसित केले आहे.

या कारखान्याची ४५००० लीटर प्रतिदिन क्षमतेची २७५ लिटर्स स्पिरीट प्रति एक टन मळीपासून तयार करणारी आसवणी आहे. कारखान्याने बगॅसवर आधारित ९ मेगावॅट क्षमतेचा अतिरिक्त सहवीज प्रकल्प कार्यान्वित केला. कारखान्यासाठी आवश्यक वीज वापरल्यानंतर उर्वरित वीज विक्री केली जाते. कारखान्याने २००४ पासून गांडूळ खत प्रकल्प सुरू केला आहे.

समर्पित विपणन खाते असलेल्या निवडक साखर कारखान्यांपैकी हा कारखाना पहिला साखर कारखाना आहे. कारखान्याच्या विपणन खात्यामार्फत स्थानिक घरगुती ग्राहकांचे जाळे तयार केले जाते.

येत्या काही दिवसात कारखान्याची साखर शाहू ब्रँडच्या माध्यमातून ग्राहकांना पॅकिंगमध्ये मिळणार आहे.

**- संप्रदा बीडकर**

# अन्नसुरक्षेकडे...

**देशातील प्रत्येक नागरिकाला पोटभर अन्न मिळावे, कोणीही उपाशी राहू नये या भूमिकेतून केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा संमत केला आहे. राज्यात १ फेब्रुवारी, २०१४ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्याची अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्र अग्रेसर ठरले आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीमुळे राज्यातील जवळपास ७ कोटी १७ लाख जनतेला सवलतीच्या दराने हक्काचे धान्य मिळू लागले आहे.**

गरीब व गरजू लोकांना सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळावे यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा केंद्र शासनाने ५ जुलै २०१३ रोजी संमत केला. देशातील ८१ कोटी जनतेस या कायद्यामुळे सवलतीच्या दरात अन्नधान्य मिळणार आहे.

देशपातळीवर ग्रामीण भागातील ७५ टक्के व शहरी भागातील ५०टक्के नागरिकांना प्रत्येक महिन्यास अनुदानित दराने धान्य मिळेल. महाराष्ट्रासाठी हे प्रमाण ग्रामीण भागातील ५५ टक्के तर शहरी भागातील ४५ टक्के असे आहे.

या कायद्यामुळे अंत्योदय (प्राधान्य) शिधापत्रिका धारकांना प्रति कुटुंब प्रति महिना ३५ किलो धान्य वितरित करण्यात येत आहे. तर इतर (प्राधान्य) शिधापत्रिका धारकाला ५ किलो धान्य प्रत्येक महिन्याला कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीनुसार देण्यात येत आहे. या दोन्ही प्रकारात देण्यात येणाऱ्या धान्याचा दर हा गहू रुपये २/- प्रतिकिलो, तांदूळ रुपये ३/- प्रतिकिलो तर भरडधान्य रुपये १/- प्रतिकिलो असा आहे. जर अपरिहार्य कारणामुळे या लाभधारकांपैकी काही जनतेस धान्य वितरण झाले नाही तर त्यांना अन्नसुरक्षा भत्ता मिळेल.

**अन्नसुरक्षेसाठी निकष**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी निकष ठरविण्यात आले आहेत. यानुसार शहरी भागातील लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १५००१ ते ५९००० इतके तर रुपये १५००१ ते ४४००० पर्यंत इतके वार्षिक उत्पन्न ग्रामीण लाभार्थ्यांसाठी असणे आवश्यक आहे. दारिद्र्यरेषेवरील (एपीएल)चे जे लाभार्थी या योजनेत येत नाहीत अशा १ कोटी ७७ लाख लाभार्थ्यांना सध्याच्या प्रचलित दराने धान्य देण्यात येत आहे.



नवी मुंबई येथे अन्नसुरक्षा योजनेचा शुभारंभ.

अन्नसुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीमुळे राज्यातील ७ कोटी १७ लाख जनतेला लाभ.

या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सध्या नागरिकांना सार्वजनिक वितरण व्यवस्था अंतर्गत अंत्योदय/ बीपीएल/ केशरी/अन्नपूर्णा व श्वेत अशा वेगवेगळ्या शिधापत्रिका अस्तित्वात आहेत. या कायद्याची अंमलबजावणी करताना विविध शिधापत्रिका रद्द करून प्राधान्य (अंत्योदय) आणि प्राधान्य (इतर) अशा दोनच शिधापत्रिका राहतील. त्यानुसार धान्याचे वितरण करण्यात येत आहे.

अधिकारी म्हणून काम करतील. लाभार्थींना धान्य मिळाले नसल्यास तक्रारीची सुनावणी घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार त्यांना देण्यात आले आहे.

राज्यस्तरावर ५ सदस्यीय राज्य अन्न आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे. अन्नसुरक्षा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजना करणे, जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्यांच्या विरुद्ध अपिलांची सुनावणी घेऊन योग्य निर्णय घेणे इत्यादी कामे या आयोगामार्फत

## सर्वांना अन्नधान्य





❒ राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याच्या अंतर्गत साठवण क्षमतेची वाढीव गरज लक्षात घेऊन ५८४ नवीन भांडारगृहांचे बांधकाम सुरू. यासाठी संबंधित यंत्रणेकडे रुपये १११ कोटींची रक्कम सुपुर्द. त्यापैकी रु.५३ कोटी १९,४४० टन क्षमतेच्या ३१ गोदामांच्या बांधकामावर खर्च. इतर गोदामांची बांधकामे सुरू.

❒ विभागाचे स्वतंत्र पोर्टल (www.mahafood.gov.in) आणि हेल्पलाइन (क्रमांक १८००-२२-४९५० आणि १९६७) कार्यान्वित.

❒ ग्राहकांना सल्ला आणि माहिती देण्यासाठी एक टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक १८००-२२-२२६२ कार्यान्वित.

नवीन शिधापत्रिका देताना त्यामध्ये महत्त्वाचा बदल करण्यात आला असून या नवीन शिधापत्रिकेत आता कुटुंबातील महिलेला कुटुंबप्रमुख म्हणून गणण्यात येईल. या महिलेच्या नावाने तिचे छायाचित्र असलेली बारकोड असलेली शिधापत्रिका वितरित करण्यात येईल.

**नवीन गोदामे बांधण्याचा धडक कार्यक्रम**

अन्नसुरक्षा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी अन्नधान्याची साठवणूक करणे त्याचे वितरण करणे महत्त्वाचे असल्याने राज्यात २००० कोटी रुपये खर्च करून १३.५ लाख मे. टन साठवणूक क्षमतेची ६११ नवीन गोदामे बांधण्यात येणार आहेत. काही गोदामांचे काम पूर्ण झाले आहे. सर्व नवीन गोदामांचे काम पूर्ण झाल्यानंतर राज्यातील धान्य साठवणूक क्षमता १९ लाख मे. टन इतकी होणार आहे.

**कायद्याची अंमलबजावणी**

या कायद्याची अंमलबजावणी करताना जिल्हाधिकारी जिल्हा तक्रार निवारण

करण्यात येतील.

या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अन्न व नागरीपुरवठा या खात्याच्या बरोबरीने महिला व बाल विकास (एकात्मिक बाल विकास) व शालेय शिक्षण विभाग (शालेय पोषण आहार) यांचा सहभाग राहील. हा कायदा अस्तित्वात आल्याने अंगणवाडी केंद्रामार्फत एकात्मिक बाल विकास योजनेत गरोदर महिलांना प्रसूती लाभ रुपये ६,०००/- महिला गरोदर असल्यापासून ते मूल ६ महिन्याचे होईपर्यंत तसेच ६ महिने ते ६ वर्षे पर्यंतच्या बालकांना मोफत आहार
देण्यात येईल.

**दोषी अधिकाऱ्याला दंड**

या कायद्याची अंमलबजावणी करताना कोणी अधिकारी दोषी आढळल्यास त्या अधिकाऱ्याला रुपये ५००० दंड आकारण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

**- विष्णू काकडे**

❖ ❖

## प्रेरणादायी यश



## पूर्णब्रह्माचे समाधान

अन्न सुरक्षा योजनेमुळे गोरगरीबांना जीवनावश्यक अन्नधान्य खात्रीशीररीत्या मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात वेगळ्या प्रकारचे समाधान निर्माण झाले आहे. अशा काही लाभार्थींनी आपले मनोगत लोकराज्यसाठी व्यक्त करून ही योजना सुरू केल्याबद्दल सरकारचे आभार मानले आहेत.

**दिलीप चंद्रकांत ठाकरे :** (शहापूर येथील काटेकुईपाडा (चांदरोटी) येथील राहिवासी) ''माझे कुटुंब प्राधान्य शिधापत्रिका धारक आहोत. शासनाने अन्न सुरक्षा योजनेची अंमलबजावणी सुरू केल्यामुळे माझ्या कुटुंबाला नियमानुसार तांदूळ रुपये ३ /- प्रति किलो, गहू प्रति किलो रुपये २ /- इतर भरडधान्य रुपये १ प्रतिकिलो मिळत आहे. माझ्या कुटुंबाच्या संख्येनुसार मला १६ किलो नियमित चांगले धान्य मिळत आहे. यामुळे धान्याची आणि भुकेची चिंता राहिली नाही. या योजनेमुळे माझ्या कुटुंबाचे आरोग्य व जीवनमान्य सुधारण्यास मदत झाली आहे.'

**संगीता संतोष वाजे :** (जव्हार येथील मांगेलवाडा), 'माझे कुटुंब एपीएल प्राधान्य कुटुंब घटकात येते. माझ्या कुटुंबात चार व्यक्ती असून मला पूर्वी १० किलो तांदूळ व ५ किलो गहू मिळत होते. या योजनेमुळे मला १२ किलो तांदूळ व ८ किलो गहू मिळतात. धान्याची प्रतसुद्धा चांगली आहे.'

**काळूराम मंगल आमले :** (ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील मढवीपाडा, बिरवाडी) 'माझे कुटुंब प्राधान्य कुटुंब घटकात येते. या योजनेमुळे मला स्वस्त परवडणाऱ्या दरात गहू , तांदूळ व भरडधान्य मिळत आहे. ही योजना गरजू कुटुंबाची भुकेची चिंता मिटविणारी आहे.'

# सर्वसमावेशक विकास

**सामाजिक न्याय विभागामार्फत समाजातील दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. जादूटोणा प्रतिबंध कायदा मंजूर करून सामाजिक सुधारणेच्या दिशेने राज्याने ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. व्यसनमुक्ती धोरण जाहीर करून समाज व्यसनमुक्त होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. ज्येष्ठ नागरिक धोरणाद्वारे ६५ वर्षांवरील सर्व नागरिकांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. परदेशातील उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. देशातील महत्त्वाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जातीच्या १०० उमेदवारांना शिष्यवृत्ती देण्यात येते. जवळपास १७ लाख ५० हजार मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ऑनलाइन पद्धतीने थेट जमा झाली आहे.**

महाराष्ट्र शासनाने नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करून त्याचे समूळ उच्चाटन करता यावे यासाठी कायदा मंजूर केला आहे. त्याकडे देशातील ऐतिहासिक घटना म्हणून पाहिले जात आहे.

**शैक्षणिक प्रगती**

दुर्बल घटकांतील मुला-मुलींना चांगले शिक्षण घेता यावे यासाठी तालुका आणि जिल्हास्तरावर वसतिगृहे सुरू केली आहेत. जिल्हास्तरावर २७१ शासकीय वसतिगृहे होती. त्यामध्ये १०० नवीन वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. याशिवाय प्रत्येक महसूल विभागात मुला-मुलींसाठी नवीन वसतिगृहे बांधण्यात येतील. वसतिगृहात राहणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या परिपोषण आहारात वाढ करण्यात आली आहे. मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत मिळावी, यामध्ये पारदर्शकता यावी याकरिता ही शिष्यवृत्ती ऑनलाइन देण्यात येत आहे.

**व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण**

अनुसूचित जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी ५० विद्यार्थ्यांना नामांकित संस्थेत प्रशिक्षण देण्यात येते. आयआयटी परीक्षेसाठी पेस संस्थेमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. मातंग समाजातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी विभागीयस्तरावर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र निवास व्यवस्थेसह सुरू करण्यात आले आहे.

**परदेश शिष्यवृत्ती**

अनुसूचित जातींच्या ज्या विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन उच्च शिक्षण घ्यायचे आहे त्यांच्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना सुरू केली. यामध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च आणि राहण्याचा खर्च दिला जातो. या

## रमाई आवास योजना

या योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबाला हक्काचे घर मिळेल. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबाला २६९ चौ. फुटाचे घर स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या जागेवर बांधून देण्यात येते. मागील दोन वर्षात १ लाख ५० हजार घरे बांधून पूर्ण झाली असून ६९ हजार घरकुले प्रगतिपथावर आहेत.



योजनेचा लाभ ५० विद्यार्थ्यांना दिला जातो. आतापर्यंत जवळपास १५० विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची वयोमर्यादा आता ३५ वर्षावरुन ४० वर्षे करण्यात आली आहे. तसेच देशांतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रत्येक वर्षी १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

**व्यसनमुक्त समाज**

व्यसनामुळे माणसाची व्यक्तिगत आणि सामाजिक हानी रोखण्यासाठी शासनाने व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले. त्यानुसार व्यसनमुक्तीसाठी सल्ला, समुपदेशन, उपचार व पुनर्वसन यासारखे कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देण्यात येईल.

**दलित वस्ती सुधारणा**

दलित वस्ती सुधारणा योजनेच्या नावात बदल करण्यात आला असून आता ही योजना अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास या नावाने ओळखली जाईल. पूर्वी ५० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या वस्तींसाठी या योजनेत निधीची तरतूद करण्यात येत नव्हती. आता १० ते २५ इतकी

## सामाजिक न्याय

- विद्यार्थ्यांच्या खात्यात त्यांची शिष्यवृत्ती आणि महाविद्यालयाच्या खात्यात फी थेट भरली जाते. या योजनेचा फायदा १७ लाख ५० हजार विद्यार्थी आणि १४३०२ महाविद्यालयांना.
- जादुटोणा व अनिष्ट प्रथा विरोधी कायदा २०१३ संमत करून सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात क्रांतिकारी पाऊल.
- ग्रामीण आणि नागरी भागातील दलितवस्त्यांना पाणीपुरवठा, जोडरस्ते, पथदिवे, समाज मंदिर आदी सुविधा.



- दलितांवरील अन्याय-अत्याचाराचे प्रलंबित खटले गतीने निकालात काढण्यासाठी सर्व महसुली विभागात विशेष न्यायालये.
- अनुसूचित जाती आणि नवबौद्ध संवर्गातील किमान ८० टक्के सदस्य असणाऱ्या स्वयंसाहाय्यता गटांना मिनी ट्रॅक्टर्सचा पुरवठा. याचा खर्च ३.५ लाख रुपये. या मिनी ट्रॅक्टर्सच्या किमतीपैकी केवळ १० टक्के रक्कमच स्वयंसाहाय्यता गटाला द्यावी लागते.
- ग्रामीण भागातील १८ ते ५९ वर्षे वयोगटातील ३९ लाख भूमिहीन शेतमजुरांची आमआदमी विमा योजनेंतर्गत नाव नोंदणी. त्यापैकी ५५०० मृत्यू प्रकरणात साहाय्य. भूमिहीन शेतकऱ्यांच्या १ लाख मुलांना शिष्यवृत्ती.
- परदेश शिष्यवृत्ती योजनेचा अनुसूचित जातीच्या १५० विद्यार्थ्यांना लाभ.
- ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्य सुसह्य व्हावे यासाठी ज्येष्ठ नागरिक धोरण.
- रमाई आवास योजनेंतर्गत मागील दोन वर्षात १ लाख ५० हजार घरे बांधून पूर्ण. ६९ हजार घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर.
- स्वाभिमान व सबळीकरण या योजनेंतर्गत ४८७२ भूमिहीनांना जमीन.
- शासकीय नोकरीमधील अपंगांचा अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष मोहीम. जवळपास १० हजार पदे भरली.

### प्रेरणादायी यश



## झोपडीतून घरात

चंद्रपूर शहरात राहणाऱ्या रमेश चांदेकर यांना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने रमाई घरकूल बांधण्यासाठी २ लाखाचे अनुदान देण्यात आले. या अनुदानातून त्यांच्या घराचे बांधकाम पूर्ण झाले असून चांदेकर कुटुंब या घरात राहायला गेले आहेत. रमाई घरकुलाच्या रूपाने हक्काचा निवारा मिळाल्याने हे कुटुंब आनंदी झाले आहे.

या घरकुलामुळे कुटुंबाच्या निवाऱ्यासोबत १०वीत असलेल्या चांदेकर यांच्या मुलीच्या अभ्यासाची सोय झाली. पूर्वी ८x१०च्या झोपडीत या कटुंबातील ५ व्यक्ती राहायच्या. त्यामुळे मुलीला अभ्यासासाठी निवांतपणा मिळत नसे. याचा परिणाम अभ्यासावर व्हायचा. या योजनेत घर मिळाल्यामुळे मुलांना अभ्यासासाठी स्वतंत्र खोली उपलब्ध झाली. त्यामुळे मुलगी चांगल्या गुणांनी १० वी उत्तीर्ण झाली. घरकूल मिळालेले रमेश सोनबाजी चांदेकर हे अपंग आहेत. कष्टकरी असलेले हे कुटुंब इतरांनाही या योजनेविषयी माहिती देत असतात.

झोपडीतून पक्क्या घरात वास्तव्यास आल्याने समाजात प्रतिष्ठा मिळाली. या घरकुलामुळे चांदेकर कुटुंबीयांच्या जीवनात मोठा गुणात्मक बदल घडून आला आहे.

या योजनेंतर्गत चंद्रपूर शहरात गेल्या तीन वर्षात ६६७ लाभार्थ्यांना घरे मंजूर झाली असून यापैकी ३२५ घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. ग्रामीण भागात ही योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. गेल्या तीन वर्षात ११९०० रमाई घरकुले बांधण्यात आली. सामान्य माणसाच्या जीवनात घराइतके महत्त्व दुसऱ्या कुठल्या बाबीला नसते. शासनाने दिलेला हक्काचा निवारा त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेत भर घालणारा आहे.

**– रवी गिते**

लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी २ लाख, २६ ते ५० लोकसंख्येसाठी ५ लाख, ५१ ते १०० लोकसंख्येसाठी ८ लाख, १०१ ते १५० लोकसंख्येला १२ लाख, १५१ ते ३०० पर्यंतच्या लोकसंख्येसाठी १५ लाख आणि ३०१ च्या पुढे लोकसंख्या असलेल्या वस्तीच्या विकासासाठी २० लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना**

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती क्षेत्रातील विमुक्त जाती व भटक्या जमाती या घटकास २६९ चौ.फू. क्षेत्रफळाची पक्की घरे बांधून देण्यात येतील. तसेच या वस्त्यांमधील लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील. या योजनेंतर्गत लातूर व यवतमाळ जिल्हयात प्रत्येकी दोन या प्रमाणे चार वसाहती निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**महामंडळांमार्फत कर्ज**

महामंडळामार्फत स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. या महामंडळाचे भागभांडवल वाढविण्यासाठी मागच्या वर्षी ३३० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. ही महामंडळे सक्षम व्हावी या करिता ४२१ कोटी रुपयांचे थकीत कर्ज व्याजासह माफ करण्यात आले. महामंडळाच्या कर्जवाटपात पारदर्शकता आणण्यात आली आहे.

**भूमिहीनांना जमीन**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण या योजनेंतर्गत ४८७२ भूमिहीनांना जमीन देण्यात आली आहे. परंतु अलीकडे जमीन मिळण्यास अडचण येत असल्याने या योजनेत पात्र व्यक्तींना त्यांच्या पसंतीनुसार खाजगी जमीन रेडीरेकनर दरानुसार रुपये ३ लाख प्रति एकर विकत घेऊन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**अपंगाचा सर्वांगीण विकास**

अपंगांसाठी सुरू करण्यात आलेल्या शाळांना १०० टक्के अनुदान देण्यात येते. ६३७ विशेष शाळा सुरू आहेत. शासकीय वसतिगृहात सामाजिक न्यायमंत्र्यांच्या १५ टक्के कोट्यापैकी ५ टक्के जागा अपंगासाठी राखीव ठेवण्यात येतात. अपंग युवकांना स्वयंरोजगार करता यावा यासाठी अपंग कल्याण विकास महामंडळामार्फत १ लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्यात येते. यामध्ये ३० टक्के सबसिडी देण्यात येते. शासकीय नोकरीमधील अपंगांचा अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष मोहीम राबवून जवळपास १० हजार पदे भरण्यात आली.

**सामाजिक न्यायभवन**

सामाजिक न्याय विभागांतर्गत जिल्हा स्तरावर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेली विविध घटकांची कार्यालये एका छताखाली येऊन कार्यपद्धती सोपी व्हावी, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक न्यायभवन बांधण्यात येत आहे. यातील काही जिल्ह्यातील सामाजिक न्यायभवनाचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

**जातप्रमाणपत्र पडताळणी समितीत वाढ**

अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटले लवकर निकाली लागावे यासाठी प्रत्येक विभागीय स्तरावर स्वतंत्र न्यायालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. जातप्रमाणपत्राची पडताळणी गतीने व्हावी यासाठी जातपडताळणी समित्या वाढवण्यात आल्या. राज्यात सध्या १५ जातप्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत आहेत. मागच्या वर्षी विशेष मोहीम राबवून ७ लाख ४१ हजार जात प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली. यावर्षी प्रत्येक जिल्ह्यात जातप्रमाणपत्र पडताळणी समिती स्थापन करण्यात येईल. जातप्रमाणपत्राची पडताळणी ऑन लाईन करण्यात येईल.

आमआदमी विमा योजनेमधील लाभार्थ्यांची नोंदणी, शिष्यवृत्तीची नोंदणी व दावे तयार करणे इ. कामे राज्यातील महिला स्वबचत गट/महा ई सेवा केंद्र यांच्यामार्फत करण्याचा निर्णय.

राज्य मागासवर्ग आयोगाकडून प्राप्त झालेल्या ३१ जातींच्या शिफारशींपैकी १८ शिफारशी शासनाने मान्य केल्या आहेत.

**– विष्णू काकडे**

## ज्येष्ठ नागरिक धोरण

ज्येष्ठ नागरिक धोरणानुसार ६५ वर्षावरील नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळेल. आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांची नावे प्रसिद्ध करण्यात येतील. ज्येष्ठांसाठी समुपदेशन केंद्र सुरू करण्यात येईल. वृद्धाश्रमांना सवलती व अनुदान देण्यात येईल. दर ५ वर्षांनी ज्येष्ठ नागरिक धोरणाचे पुनर्विलोकन करण्यात येईल.





**शेतकामासाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने देण्यात येत आहेत. व्यक्तीऐवजी महिला स्वयंसाहाय्यता बचत गटाला हे मिनी ट्रॅक्टर देण्यात येतात. नुकतेच यवतमाळ येथे ५०० मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले.**

# विकासाचे नवे आत्मभान

**अदिवासींचा सर्वांगीण विकास करण्याकरिता शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा याप्रमुख बाबींवर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. विविध पायाभूत सुविधांच्या निर्मितीतून त्यांना मुख्य प्रवाहात आणले जात आहे. आर्थिक, भौतिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकस्तरावर वेगवेगळ्या उपाययोजना केल्या आहेत. स्वंतत्र आदिवासी विभागाची निर्मिती आणि माडा, मिनीमाडा अशी विभागणी करून आदिवासी उपयोजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू आहे.**

राज्याच्या स्थापनेपासूनच आदिवासी विकासाला शासनाने प्राधान्य दिले आहे. आदिवासींचा विकास सूत्रबद्धपद्धतीने व्हावा यासाठी १९९२ मध्ये 'कृती कार्यक्रम' आखून विभागाची पुनर्रचना करण्यात आली. सुकथनकर समितीच्या शिफारशींनुसार नियोजन विभाग आता आदिवासी विकास विभागाला आदिवासी उपयोजनेसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देतो. त्याचबरोबर आदिवासींच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीला वेग यावा यासाठी राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ आणि शबरी आदिवासी वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ हे बहुउद्देशीय आदिवासी सहकारी संस्थाची शिखर संस्था म्हणून काम करते.

स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे योजना कार्यान्वित करून गरजू अदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी केंद्रावर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) राबविण्यात येतो. केंद्रवर्ती अर्थसंकल्प या योजनेची प्रति लाभार्थी अनुदान मर्यादा रुपये १५,०००/- वरून रुपये ५०,०००/- करण्यात आली आहे. हा एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शिक्षण संस्थांचे जाळे**

आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यभरात शिक्षण संस्थांचे जाळे विणण्यात आले आहे.

आदिवासी मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची संधी मिळावी यासाठी राज्यात




कौशल्य विकास योजनेंतर्गत १ लाख आदिवासी तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण.

## आदिवासी विकास

- आदिवासी उपयोजनेंतर्गत ५५२ आश्रमशाळा आणि ४८४ शासकीय वसतिगृहे सुरू. त्यासाठी २०१३-१४ वर्षात रु. ४०० कोटींची तरतूद.
- भारत सरकारमार्फत आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीची रक्कम बँक खात्यात थेट जमा.
- आदिवासी विद्यार्थ्यांमधील शाळा सोडण्याचे प्रमाण कमी व्हावे या हेतूने सुवर्ण जयंती आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना. या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ अंदाजे १२ लाख विद्यार्थ्यांना.
- ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारित कार्यक्रमाची आर्थिक मर्यादा रु. २५ लाखांवरून रु. ३१.२५ लाखांपर्यंत.
- इंदिरा आवास योजनेंतर्गत २०१३-१४ साठी रु.२४८ कोटींची तरतूद. आजवर २.४५ लाख घरकुले बांधली.



- कौशल्य विकास योजनेंतर्गत १ लाख आदिवासी तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण. स्पर्धापरीक्षांसाठी विद्यापीठांमार्फत अनुसूचित जमाती सवर्गातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण. आदिवासी आश्रमशाळांमध्ये औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणार.

सी.बी. एस.सी च्या धर्तीवर ठाणे, अमरावती, नाशिक व नागपूर या प्रादेशिक कार्यक्षेत्रात एकलव्य रेसिडेन्शियल पब्लिक स्कूलची स्थापना करण्यात आली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजनाही सुरू आहेत.

**'नवसंजीवन' योजना**

आदिवासींसाठी असलेल्या पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा आदींसारख्या निरनिराळ्या योजनांची एकात्मिकपणे व समन्वयाने अंमलबजावणी करण्यासाठी 'नवसंजीवन' योजना राबविली जाते. या योजनेत रोजगार कार्यक्रम, आरोग्यसेवा, पोषण कार्यक्रम, अन्नधान्य पुरवठा, खावटी कर्ज, धान्यकोष आदी घटकांचा समावेश करण्यात आला आहे. कुपोषणग्रस्त बालकांना रुग्णालयात अथवा प्राथमिक आरोग्य केंद्रात तत्काळ नेण्याची व्यवस्था केली जाते. पावसाळ्यात आवश्यक औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रात व उपकेंद्रात उपलब्ध ठेवण्यात येतो.

**शबरी आदिवासी घरकूल योजना**

आदिवासींना कायमस्वरूपी हक्काच घर मिळावे यासाठी शबरी आदिवासी घरकूल योजना राबविण्यात येणार आहे.

**खावटी कर्जाचे वाटप**

पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत आदिवासींना रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी अल्पभूधारक, भूधारक, भूमिहीन व शेतमजूर यांना आर्थिक अडचण निर्माण होऊ नये म्हणून खावटी कर्ज देण्यात येते. आदिवासींना खावटी कर्जाचे वाटप १०० टक्के रोखीने करण्यात येणार आहे.

**कौशल्य विकास**

अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने मोटारवाहन चालक प्रशिक्षण देण्यासाठी पांढरकवडा व गडचिरोली येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. आदिवासी तरुण, तरुणींना सैन्यदल किंवा पोलीसदलात भरती होण्यासाठी भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येते.

**कृषी विकासाच्या योजनांना प्राधान्य**

महाराष्ट्रातील सुमारे ८५ टक्के आदिवासी लोकसंख्या शेती व्यवसायात गुंतलेली आहे. ४० टक्के आदिवासी शेतकरी आहेत तर ४५ टक्के आदिवासी शेतमजूर आहेत. त्यामुळे आदिवासींच्या कृषी विकासविषयक योजनांना सरकारने प्राधान्य दिले आहे.

**- अर्चना शंभरकर**

## प्रेरणादायी यश



## हक्काचा आधार

वर्धा शहरापासून १०० कि.मी. अंतरावर समुद्रपूर तालुक्यातले गिरगाव, मूळ कोरा वनक्षेत्रात येते. गिरगावातल्या रामकृष्ण आणि रतन जीवतोडे या बंधूंना या वनक्षेत्रातील जवळपास पाच एकर जमीन कसण्याचा हक्क शासनाने दिला. त्यामुळे आत्मविश्वासाने हे कुटुंब ताठमानेने जगत आहेत. रामकृष्ण यांना एक मुलगी अन् दोन मुले आहेत. दोघांची लग्न झाली आहेत. मुलीचे लग्न त्यांनी शेती उत्पन्नातूनच केले. रामकृष्ण यांचा शेतीबरोबर शेळीपालनाचा व्यवसाय आहे. या जोडधंद्यातून त्यांना बराच आधार होतो.

वर्धा जिल्ह्याच्या सीमेवरील या गावात रामकृष्ण आणि रतन यांचे वडील अतिक्रमण केलेली जमीन कसत. परंतु या जमिनीवर त्यांची मालकी नव्हती. त्यामुळे मनात धाकधूक असायची. मात्र त्यांना या जमिनीचा हक्क शासनाकडून देण्यात आल्याने त्यांच्या घरी चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. कापूस, तूर, हरभरा आणि सोयाबीन ही पारंपरिक पिके ते या शेतात घेतात. जमीन कसदार असल्याने भरघोस उत्पन्न त्यांना मिळते. दोघेही भाऊ अडीच-अडीच एकर शेतीत प्रत्येकी पंधरा ते सतरा क्विंटल कापूस, पाच ते सात क्विंटल तूर, सोयाबीन पाच क्विंटल एवढे उत्पन्न दरवर्षी काढतात.

पूर्वी याच जमिनीवर मिरचीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाई. मात्र, वन्यप्राण्यांच्या हैदोसामुळे पिकांची नासाडी होत आहे. उत्पन्न वाढल्यानंतर यावर उपाययोजना करून मिरचीचे पीक घेण्याचा रामकृष्ण यांचा मानस आहे. पाण्याची व्यवस्था झाल्यास या कोरडवाहू वनशेतीतून भाजीपाला, ऊस, केळीसारखे उत्पादन ते घेणार आहेत. त्याकरीता शेतात विहीर बांधण्याचा संकल्प त्यांनी केला आहे.

**- श्याम टरके**

# नव्या संधी... नवा विश्वास

अल्पसंख्याक समाजाला शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यातील अल्पसंख्याकबहुल शाळांमध्ये मूलभूत सुविधांसाठी २ लाख रुपये निधीची योजना राबविली जात आहे. या योजनेतून मागील चार वर्षात राज्यातील ८ हजार १८५ शाळांना एकंदर १६० कोटी ५० रुपयांच्या निधीचे वितरण करण्यात आले आहे.

अल्पसंख्याक समूहांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना राबविल्या जात आहेत. मागील ४ वर्षात सुमारे २२ लाख ३७ हजार विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीचे, १ लाख ५१ हजार विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीचे, १३ हजार ६३१ विद्यार्थ्यांना मेरीट कम मिन्स शिष्यवृत्तीचे तर सुमारे १ लाख विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्तींचे वितरण करण्यात आले. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कर्ज योजनेसाठी शासनाने ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल उपलब्ध करून दिले. या महामंडळामार्फत आतापर्यंत ८ हजार ७७० विद्यार्थ्यांना सुमारे ५३ कोटी १५ लाख रुपयांचे शैक्षणिक कर्ज वितरित करण्यात आले.

**अल्पसंख्याक विकास विभागाच्या विविध योजना राज्यात अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या विभागाने अल्पसंख्याकांच्या हितासाठी अनेक नवीन योजना आणल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.**

**विद्यार्थ्यांचा शाळेकडे वाढता ओढा**

प्राथमिक शाळेत राबविल्या जात असलेल्या मोफत गणवेश वाटपसारख्या योजनांमुळे विद्यार्थ्यांचा शाळेकडे ओढा वाढत आहे. अल्पसंख्याक समाजामधील तरुणांना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने राज्यातील आयटीआय तसेच अल्पसंख्याकबहुल क्षेत्रातील तंत्रनिकेतनमध्ये दुसऱ्या पाळीतील विशेष वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

अल्पसंख्याक मुलींसाठी जिल्हा पातळीवर प्रत्येकी १०० प्रवेश क्षमतेची वसतिगृहे बांधण्यात येणार आहेत. राज्यातील १७



मागील ४ वर्षात सुमारे २५ लाख अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रिक आणि पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती, मेरीट कम मिन्स शिष्यवृत्ती आणि उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात आली.

जिल्ह्यांमध्ये या वसतिगृहांचे बांधकाम सुरू आहे.

**मदरशांतील मुलांसाठी योजना**

मदरशांमधील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने डॉ. जाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना कार्यान्वित केली आहे. त्याअंतर्गत २०० मदरशांना १० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यावर आहे.

मौलाना आझाद मोफत शिकवणी व हजार ४७१ इतक्या अल्पसंख्याक समुदायातील नागरिकांना इंदिरा आवास घरकुलाचा लाभ मिळाला आहे. अल्पसंख्याकबहुल भागात ४१८ अंगणवाडी केंद्रांची उभारणी पूर्ण झाली असून ६ ठिकाणी मुलींसाठी वसतिगृहे बांधली जात आहेत.

नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांमधील अल्पसंख्याकबहुल भागांमध्ये पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी

## अल्पसंख्याक मुख्य प्रवाहात



❒ १२ तंत्रनिकेतने आणि ४२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विशेष दुसरी पाळी. दोन नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन. यामुळे दरवर्षी ६,००० विद्यार्थ्यांना लाभ.

❒ अल्पसंख्याकांच्या विकासासाठी स्वतंत्र प्रशासकीय विभाग.

❒ २०१२-१३ या वर्षात राज्य आणि केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ ३३,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना. यासाठी ७५.८३ कोटींचा खर्च.

❒ मदरसा आधुनिकीकरण योजनेमध्ये गणित आणि विज्ञान यासारख्या आधुनिक विषयांचा समावेश. प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती.

❒ स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण योजनेंतर्गत १,००० उमेदवारांना राज्यसेवा आणि लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी प्रशिक्षित करण्याचा निर्णय. पोलीस दलातील अल्पसंख्याक उमेदवारांची संख्या वाढावी यासाठी ही योजना. या योजनेंतर्गत बँकिंग, अभियांत्रिकी आणि वैद्यकशास्त्र यासारख्या स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण. दरवर्षी ३,५०० हून अधिक उमेदवारांना पोलीस कॉन्स्टेबल भरती परीक्षेसाठी प्रशिक्षण.

❒ अल्पसंख्याक आयोगाला दिवाणी न्यायालयांचे अधिकार.



❒ विदर्भ आणि मध्य भारतातून हज यात्रेसाठी प्रवास करणाऱ्या हाजींना सुविधा पुरवण्यासाठी नागपूरमध्ये हज हाऊस. औरंगाबाद येथेही हज हाऊस बांधणार.

❒ २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीसाठी प्रस्तावित अल्पसंख्याक विकासाची योजना रु. १६८५ कोटींची. २०१३ - १४ या वर्षासाठी रु. ३६२ कोटी उपलब्ध. ११ व्या योजनेतील तरतुदीपेक्षा ही रक्कम दुप्पट.

संबद्ध योजनेंतर्गत दरवर्षी राज्यातील ४ हजार अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना उच्च शासकीय पदांच्या नियुक्तीसाठी मोफत प्रशिक्षण दिले जाते.

**अल्पसंख्याकांना हक्काचे घर**

९ अल्पसंख्याकबहुल जिल्ह्यात १० ते २० लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. दरवर्षी सरासरी १६६ शहरांना या योजनेतून अनुदान वितरित केले जाते.

**- इर्शाद ल. बागवान**

❖ ❖

## प्रेरणादायी यश



### उत्तुंग भरारी

पुण्यातील यशदा येथील आयएएस प्रशिक्षण केंद्रात १० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड केली जाते. या योजनेतून प्रशिक्षण घेतलेल्या सातारा येथील परवेज नाईकवडी यांनी २०१२ मध्ये यूपीएससी परिक्षेत यश मिळविले असून त्यांची इंडीयन कॉर्पोरेट लॉ सर्व्हिसेससाठी निवड झाली आहे. सध्या ते मानेसर (हरियाणा) येथे प्रशिक्षण घेत आहेत.

केंद्रीय तसेच राज्य शासकीय सेवांमध्ये अल्पसंख्याकांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे सच्चर समितीच्या अहवालातून पुढे आले होते. हे प्रमाण वाढावे यासाठी पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाद्वारे विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यानुसार राज्य अल्पसंख्याक विकास विभागाने प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमध्ये (एसआयएसी) तसेच पुण्यातील यशदा येथील आयएएस प्रशिक्षण केंद्रात अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची योजना सुरू केली.

परवेज यांचे १० वी पर्यंतचे शिक्षण साताऱ्यातील महाराजा सयाजीराजे विद्यालयात झाले असून महाविद्यालयीन शिक्षण साताऱ्यातील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून झाले आहे. त्यानंतर त्यांनी पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातून बीटेक पदवी प्राप्त केली. यशदा येथे शासनामार्फत युपीएससीच्या परिक्षांसाठी प्रशिक्षण केंद्र चालविले जात असल्याची माहिती त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी अर्ज केला. प्रशिक्षणासाठी त्यांची निवड झाली. या प्रशिक्षणामुळेच ते यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले.

मुंबई हज समिती येथील आयएएस प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेतलेल्या शकील मेहमूद अन्सारी (शहादा. जि. नंदूरबार) या विद्यार्थ्यानेही यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

# सुकन्येचे मनोधैर्य

**कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये महिलांचा सहभाग फार मोठा असतो. तथापि महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक देण्याची समाजाची मनोभूमिका असते. ही परिस्थिती बदलण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. त्या अनुषंगाने शासनाने सर्वसमावेशक असे महिला धोरण जाहीर केले. त्यामुळे महिला सक्षमीकरणाला मोठी चालना मिळून महाराष्ट्रात अनेक क्षेत्रात महिलांनी नेत्रदीपक यश मिळवले आहे. 'मनोधैर्य' आणि 'सुकन्या' योजना या महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने पुढचा टप्पा ठरणार आहेत.**

महिलांसाठी म्हणून विशेष धोरण राबवावे असा निर्णय शासनाने प्रथम १९९४ साली पहिले महिला धोरण जाहीर करून घेतला. दुसरे महिला धोरण २००१ मध्ये जाहीर झाले. या धोरणांमुळे महिलांवरील अत्याचार, हिंसा आणि महिलाविषयक कायदे यात सुधारणा झाल्या. त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा झाली. स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढला. महिलांना केंद्रस्थानी मानून नियोजन होऊ लागले आहे. स्वयंसहायता बचत गटांचा विकास झाला.

या दोन्ही धोरणांमध्ये महिला हक्क व कायदे याबाबत जनजागृतीवर भर देण्यात आला होता. त्यामुळे महिलांची शिक्षणातील प्रगती, आरोग्यात सुधारणा, महिलांचा मालमत्तेत हक्क, महिला विकास कायद्याबाबत जनजागृती त्याचबरोबर शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये नोकरीच्या तसेच उच्च शिक्षण यात ३० टक्के महिला आरक्षण व राजकीय क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण ठेवण्यात आले. महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना , महिला बचत गटांना आर्थिक पाठबळ यामुळे महिलांच्या सर्वंकष सक्षमीकरणासाठी दोन्ही धोरणे उपयुक्त ठरली.

गेल्या १२ वर्षांत बदलेल्या परिस्थितीशी सुसंगत व महिलांना एक व्यक्ती म्हणून घटनेने दिलेले अधिकार सक्षमपणे वापरता यावे यासाठी, पोषक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने तिसरे महिला धोरण शासनाने जाहीर केले.

**धोरणाची उद्दिष्टे**

■ महिलांच्या सक्षमीकरणासाठी समाजात प्रागतिक दृष्टिकोन रुजवणे. ■ सर्व क्षेत्रांमध्ये समान संधी व विकासासाठी पोषक वातावरण व साधने उपलब्ध करून देणे. ■ धर्म, वंश, जात, सत्ता, प्रदेश या



महिला आणि बालकांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करून त्यांना संरक्षण आणि मदत देण्यासाठी ३५ जिल्ह्यांमध्ये १०५ समुपदेशन केंद्रे.

## सुकन्या योजना

❐ बालिका भ्रूणहत्या, बाल विवाह थांबविणे, मुलींचा जन्मदर मुलांइतकाच वाढविणे आणि मुलींच्या जन्माबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन रुजवण्यासाठी या योजनेद्वारे विशेष प्रयत्न. ❐जन्मानंतर प्रत्येक मुलीच्या नावे एका वर्षाच्या आत शासन गुंतवणार २१००० रुपये. ❐ १८ वर्ष पूर्ण झाल्यावर तिला मिळणार १ लाख रुपये. ❐ दारिद्रय रेषेखालील प्रत्येक कुटुंबातील दोन मुलींना मिळणार या योजनेचा लाभ. ❐आमआदमी योजनेंतर्गत मुलीच्या नावे जमा केलेल्या रकमेतून रु. १०० प्रतिवर्ष इतका हप्ता जमा करून मुलीच्या पालकांचा विमा उतरवणार. मुलीच्या पालकाचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रु. ३०,०००, अपघाती मृत्यू झाल्यास रु. ७५,०००, दोन डोळे अथवा दोन अवयव अपघातात निकामी झाल्यास रु. ७५,००० आणि एक डोळा व एक अवयव अपघातात निकामी झाल्यास रु. ३७,५०० इतकी रक्कम मिळणार. ❐ पहिली ते बारावीपर्यंतच्या मोफत शिक्षणाबरोबरच या मुलींना आमआदमी विमा योजनेंतर्गत अंतर्भूत शिक्षा सहयोग योजनेमधून रुपये ६०० इतकी शिष्यवृत्ती दरमहा ६ महिने इयत्ता ९ वी, १० वी, ११ वी आणि १२ वीमध्ये मिळणार.



## मनोधैर्य योजना

❐ बलात्कार, लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्लापीडित महिलांना आर्थिक साहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी २ ऑक्टोबर २०१३ पासून मनोधैर्य योजना सुरू. बालकांनाही लाभ. पीडितांना रु. २,००,००० ते रु. ३,००,००० पर्यंत मदत. वैद्यकीय उपचार, प्रवास आणि इतर आनुषंगिक खर्चासाठी मदत. ❐ महिला आणि बालकांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करून त्यांना संरक्षण आणि मदत देण्यासाठी ३५ जिल्ह्यांमध्ये १०५ समुपदेशन केंद्र स्थापण्याचा निर्णय. ❐ महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी जलदगती न्यायालयांची स्थापना ❐ समुपदेशन, निवारा, वैद्यकीय व कायदेशीर मदत, प्रशिक्षण या आधारसेवा तातडीने पुरवणार. ❐ महिलांना तत्काळ मदत मिळावी यासाठी जिल्हा क्षती साहाय्य व पुनर्वसन मंडळाची स्थापना.

## इतर

❐ अंगणवाडी सेविकांच्या मानधनात दरमहा ९५० रुपयांची वाढ. त्यामुळे २ लाख अंगणवाडी सेविकांना लाभ. ❐ महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ६८,००० बचत गटांचे सदस्य ९,००,०००. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या २ लाख ७० हजार बचत गटांचे सदस्य २७ लाख. ❐ विद्यार्थिनी, गृहिणी आणि नोकरदार महिलांना स्वसंरक्षण देण्यासाठी स्वयंसिद्धा प्रशिक्षण कार्यक्रम

कारणांमुळे होणाऱ्या हिंसा होऊ नये यासाठी स्त्रियांना पाठबळ देण्याबरोबर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे. ■ स्त्री-पुरुष जन्मदर समान ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना. ■ महिलांची आधुनिक व स्वबळावर उभी राहणारी नवी प्रतिमा तयार करणे व गृहिणीच्या कामाला प्रतिष्ठा मिळवून देणे. ■ महिलांच्या हिताचे व हक्कांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न. ■ अनिष्ट प्रथांपासून मुक्तता करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना. ■ तृतीयपंथी, लोककलावंत व महिलांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न. ■ अनुसूचित जाती -जमाती, भटक्या विमुक्त जाती जमाती तसेच अल्पसंख्याक समुदायातील महिलांवर होणाऱ्या अन्याय निवारणासाठी प्रयत्न. ■ असंघटित क्षेत्रातील महिलांच्या हक्कासाठी प्रयत्न आणि घरात तसेच कामाच्या ठिकाणी हिंसाचारविरहित व सुरक्षित वातावरणाची निर्मिती.

**- आकाश जगधने**

❖❖

## प्रेरणादायी यश



## कामधेनू

भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यात घनदाट जंगलात वसलेल्या झाडगाव या आदिवासी गावाची ६० टक्के लोकसंख्या दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहे. १२०० लोकवस्तीच्या गावात पाच बचतगट महिला विकास महामंडळातर्फे स्थापन करण्यात आले. त्यात ६४ महिलांचा सहभाग आहे. त्यापैकी ४५ महिलांकडे गायी- म्हशी आहेत. मात्र गावात दूध डेअरी नव्हती. पाच कि.मी. अंतरावर असणाऱ्या सानगडी गावात दूध न्यावे लागत असे. दुधाला योग्य भाव मिळत नव्हता. त्यामुळे बचत गटाच्या माध्यमातून गंगोत्री महिला उत्पादक गटाने गावातच डेअरी सुरू करण्याचा निर्णय घेतला. या बचत गटातील ३२ महिलांकडे दुभती जनावरे होती. या बचत गटातील ९ महिलांनी बँकेत खाते उघडले. प्रत्येक महिलेच्या खात्यावर दोन हजार रुपये भाग भांडवल जमा करण्यात आले. दूध संकलन केंद्र चालवण्यासाठी सप्टेंबर २०१३ मध्ये या महिलांना पाच दिवसाचे प्रशिक्षण भंडारा येथील किसान संघातर्फे देण्यात आले.

आत्मा प्रकल्पांतर्गत एका वर्षासाठी सीड मनी म्हणून रु.४० हजार उत्पादक केंद्राला बिनव्याजी मिळाले. त्यामुळे दूध संकलन केंद्राची उभारणी झाली. १ ऑक्टोबर २०१३ पासून या कामाला सुरुवात झाली. आधी २२ लीटर दूध नियमित घेतले गेले. हळूहळू प्रमाण वाढवत १२५ लीटर दूध संकलित होऊ लागले. प्रतिलीटर प्रतिदिन एक रुपयाप्रमाणे किसान संघाकडून दूध संकलन केल्याचे पैसे मिळू लागले. महिन्याला ३ हजार रुपयांचे उत्पन्न मिळू लागले. केंद्राला १८०० रुपये निव्वळ नफा मिळत आहे. गंगोत्रीच्या महिला सदस्यांना या उद्योगातून लिटरमागे ४ ते १० रुपयांचा नफा होतो.

# गावांचा ग्लोबल चेहरा

ग्रामविकास विभागाने माहिती तंत्रज्ञानाचा लाभ घेत गावांच्या पर्यावरणस्नेही आणि शाश्वत विकासाला गती दिली. त्यामुळे महाराष्ट्राच्या गावागावांनी कात टाकली असून त्यांना ग्लोबल चेहरा प्राप्त झाला आहे.

**पंचायतराज संस्थांच्या चांगल्या कामामुळे गावकऱ्यांना अनेक सुविधा उपलब्ध झाल्या. त्यामुळे 'आपले गाव- आपले सरकार' अशी शासनाविषयीची आपलेपणाची भावना त्यांच्या मनात निर्माण होण्यास मदत होऊन शासनाच्या योजना यशस्वीरीत्या राबविता आल्या. पंचायतराज व्यवस्थेने गाव प्रशासनाला वेगळी शिस्त दिली. महाराष्ट्राच्या समतोल विकासाची यातून पायाभरणी झाली. ग्रामीण प्रश्नांची जाण असणारे नेतृत्व पंचायतराज व्यवस्थेने महाराष्ट्राला दिले. देशाला रोहयो, माहितीचा कायदा, पंचायतराज व्यवस्था दिली. ग्रामीण भागातील लोकांना शहरी भागाप्रमाणे किमान सुविधा आणि रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध करून दिल्यास गावातून शहराकडे होणारे स्थलांतर कमी होऊ शकेल. याच हेतूने ग्रामविकास विभाग अनेक योजना राबवीत आहे.**

गावांचा पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकास करण्यासाठी २०१० पासून 'पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना' सुरू करण्यात आली. त्याद्वारे नैसर्गिक संसाधनांचे जतन आणि संवर्धन करीत लोकसहभागातून गाव विकासाला गती देण्यात आली. विविध विभागांच्या गाव विकासाच्या योजनांची सांगड घालताना मोठ्या गावांचा विकास केंद्र म्हणून करण्याचे निश्चित करण्यात आले. गावांचे सूक्ष्म तसेच पर्यावरणपूरक विकास आराखडे बनवण्याचे आणि गावांची पुढील २० वर्षातील वाढ लक्षात घेऊन गाव विकासाचे परिपूर्ण नियोजन करण्याचे निश्चित करण्यात आले.

या योजनेत पहिल्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी ज्या ग्रामपंचायती निकषांना पात्र ठरल्या. त्यांना ९२४ कोटी रुपयांचा प्रोत्साहनात्मक निधी वितरित करण्यात आला.

या योजनेमध्ये १५.१० कोटी वृक्षांची लागवड करण्यात आली. योजनेतील करवसुलीच्या निकषामुळे मार्च २०१३ अखेर ग्रामपंचायतीच्या करवसुलीत वाढ झाली असून पाणीपट्टीची वसुली ८१ टक्के तर घरपट्टीची वसुली ८५ टक्क्यांपर्यंत वाढली.

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या वतीने मोबाइल व्हॅनच्या माध्यमातून ग्रामीण महिलांसाठी संगणक प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात येतो.**




२५,००० ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा उपलब्ध. त्यामुळे ग्रामपंचायतींचे काम गतिमान आणि पारदर्शक.

योजनेमुळे गावागावात वैयक्तिक शौचालयाचा वापर, अपारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर, बायोगॅसचा वापर वाढला. सांडपाणी आणि घनकचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करण्याला वेग आला. अनेक गावांनी सांडपाण्याचा पुनर्वापर करीत या योजनेंतर्गत लावलेली झाडे मोठ्या प्रमाणावर जगवली आहेत.

**सूक्ष्म आणि पर्यावरण विकास आराखडे**

५ हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या १,२८० च्या आसपास आहे. या गावांची लोकसंख्या जास्त असूनही अकृषिक रोजगार आणि वाणिज्यिक व्यवहारांची टक्केवारी कमी असल्याने त्या ग्रामपंचायतीच आहेत. या गावांचा विकास करताना त्यांना शहराप्रमाणे किमान नागरी सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने नगररचनेच्या धर्तीवर या गावांचा सूक्ष्म तसेच पर्यावरण विकास आराखडा तयार करण्यात येत आहे.

**संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र**

ग्रामविकास विभागाचे आय. टी. ग्रामविकास विभागात रूपांतर झाले आहे. ई-पंचायत कार्यक्रमांतर्गत संग्राम अर्थात 'संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र' या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. यांअंतर्गत सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि साधारणतः २८ हजार ग्रामपंचायती इंटरनेटने ऑनलाइन जोडल्या आहेत.

**'प्लॅन प्लस'**

'प्लॅन प्लस' या संगणकीय प्रणालीत प्रशासकीय विभागांकडून पंचायतराज स्तरावर प्राप्त होणाऱ्या निधीचे एकत्रीकरण, हाती घ्यावयाच्या कामाचे नियोजन, निधीचा विनियोग आणि विकासकामांवरची देखरेख व नियंत्रण केले जाते. 'प्रिया सॉफ्ट' नावाच्या संगणकीय प्रणालीत पंचायतराज स्तरावरील योजनांचे जमा-खर्च, लेखे आणि आनुषंगिक अहवाल यांची माहिती असते.

'ॲसेट डिरेक्टरी'मध्ये पंचायतराज संस्थांच्या मालकीच्या तसेच आधिपत्याखालील स्थावर व जंगम मालमत्तांचे व्यवस्थापन केले जाते. 'सर्विस प्लस' नावाच्या संगणकीय प्रणालीतून लोकांना विविध प्रकारचे दाखले दिले जातात.

याशिवाय ॲक्शन सॉफ्ट, ट्रेनिंग मॅनेजमेंट, सोशल ऑडिट, मिटिंग मॅनेजमेंट, बेसिक जीआयएस प्रणाली, डिजी ग्राम, ग्राम मार्ट, प्लॅन ग्राम या संगणकीय प्रणाल्या विभाग उपयोगात आणत आहे.

**'मॉडेल स्टेट'**

ई-पंचायत कार्यक्रमात राज्य देशात पहिले आहे. लवकरच एकसमान माहिती

## ग्रामविकासात आघाडी

- इंदिरा आवास योजनेंतर्गत निवारा नसलेल्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना रु. ३,२२७ कोटींच्या खर्चातून ४,५६,९७६ घरांचे बांधकाम.
- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत ३४,५५७ बचत गटांना रु. ९८१ कोटींच्या पत रकमेसह रु. ३९८ कोटींची सबसिडी.
- १६,४४३ ग्रामपंचायतींना पर्यावरण समृद्ध ग्राम योजनेंतर्गत स्वच्छ, हरित गावाच्या शाश्वत विकासासाठी ६९० कोटी रुपयांचे अनुदान.
- पर्यावरण समृद्ध ग्राम योजनेला मुदतवाढ. त्यासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद.
- पंचायत राज संस्थांमधील तिन्ही स्तरांवर महिलांसाठी ५० टक्के आरक्षण.
- २८,००० ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा उपलब्ध. त्यामुळे ग्रामपंचायतींचे काम गतिमान आणि पारदर्शक.
- ग्रामविकासाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविल्याबद्दल व ई-पंचायत योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्राला देश पातळीवर विविध पुरस्कार.
- पंचायतराज संस्थांच्या तिन्ही स्तरांवर निवडून आलेल्या महिलांची पंचायत महिलाशक्ती अभियान संघटनेची स्थापना. यामध्ये ९९ महिलांचा समावेश. ही संघटना महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार. देशातील हा पहिलाच उपक्रम.
- राज्यातील २०,००० ग्रामपंचायतींमध्ये ई-बँकिंग सेवा उपलब्ध करून देणार.

## प्रेरणादायी यश



## यशाची हॅट्रिक

पंचायतराज व्यवस्थेत आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीत उत्कृष्ट कामगिरी करत ग्रामविकास विभागाने २०१३-१४ यावर्षी पुन्हा एकदा राष्ट्रीयस्तरावरचा पहिल्या क्रमांकाचा ३ कोटी रुपयांचा पुरस्कार मिळवला. सलग तीन वर्षांपासून विभागाने राष्ट्रीयस्तरावर प्रथम येण्याची परंपरा कायम राखून या क्षेत्रातील कामगिरीचा आलेख सतत चढता ठेवला आहे. राज्यातील इतर १८ पंचायतराज संस्थांनाही २ कोटी २० लाख रुपयांचे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाले आहेत.

महाराष्ट्राच्या ग्रामविकास विभागाचे हे पहिले यश नाही. गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्र देशात पहिला आहे. ग्रामविकास विभागाने २०११-१२ मध्ये वाढीव प्रदानीकरणात देशात प्रथम क्रमांकाचा दोन कोटी रुपयांचा पुरस्कार पटकावला. त्यानंतर २०१२-१३ मध्ये पंचायत सक्षमीकरण आणि संचयी प्रदानीकरणात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आल्याने २.५ कोटी रुपयांच्या प्रथम पुरस्कार प्राप्त झाला.

पंचायतराज उत्तरदायित्व आणि प्रोत्साहन योजनेंतर्गत केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडून देशभरातील विविध राज्यांनी ग्रामविकासाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची पाहणी झाल्यानंतर निकषांना पात्र ठरणाऱ्या राज्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. केंद्र शासनाची समिती यासाठी राज्यांचा पाहणी दौरा करते. त्यांनी ठरवून दिलेल्या निकषांवर कोणती राज्ये खरी ठरली, याचा अभ्यास करून उत्कृष्ट काम करणाऱ्या राज्यांना राष्ट्रीय पंचायतराज दिनी म्हणजे २४ एप्रिल रोजी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

तंत्रज्ञान सेवा वापराबद्दल देशात महाराष्ट्राचा 'मॉडेल स्टेट' म्हणून गौरव होत आहे.

**ग्रामपंचायतीत बँकिंग सेवा**

राज्यातील जवळपास २८ हजार ग्रामपंचायतींपैकी ५५०० गावांमध्येच बँकेची सेवा उपलब्ध आहे. ग्रामपंचायतीत संग्राम कक्षाच्या माध्यमातून बँक सेवा देण्यास सुरुवात केली. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकाच्या सेवा गावातच उपलब्ध होण्यास सुरुवात झाली आहे.

१० फेब्रुवारी २०१४ रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या परसोडी ग्रामपंचायतीत बँक सेवेचा शुभारंभ करण्यात आला. आतापर्यंत १४१२ ग्रामपंचायतीत ही सुविधा सुरू झाली आहे.

**महिलांसाठी ५० टक्के आरक्षण**

महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण देण्याचा आणि सामाजिक विकासाची समतोल धुरा पुढे नेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय याच काळात झाला.आज जिल्हा परिषदस्तरावर ९७३, पंचायत समितीस्तरावर १९२७ आणि ग्रामपंचायतस्तरावर ९८६६९ महिला कार्यरत आहेत.

**इंदिरा आवासच्या हिश्श्यात वाढ**

इंदिरा आवास योजनेतील प्रतिघरकुलाची किंमत राज्याने १ लाख रुपये इतकी निश्चित केली आहे. याशिवाय ज्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींकडे घर बांधण्यासाठी स्वत:ची जागा नाही अशा लोकांसाठीही वेगळी योजना सुरू केली आहे. यावर्षी योजनेंतर्गत राज्याला १ लाख ३७ हजार ३१४ घरकुलांचे उद्दिष्ट मिळाले आहे. या योजनेत आतापर्यंत १ लाख १४ हजार घरे महिलांच्या नावावर करण्यात आली आहेत. ५ लाख ८१ हजार ३०८ घरे ही पती-पत्नीच्या नावावर आहेत.

**महिला किसान सशक्तीकरण परियोजना**

महिला शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता 'महिला किसान सशक्तीकरण परियोजने'ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आजीविका कौशल्यवृद्धी प्रकल्पांतर्गत सुमारे १८५६ ग्रामीण सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास**

२०१३-१४ मध्ये ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेसाठी २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**मागास क्षेत्र अनुदान**

ग्रामीण भागातील मागास जिल्ह्यांचा प्रादेशिक असमतोल दूर करणे आणि स्थानिक पायाभूत सुविधांमधील कच्चे दुवे जोडणे या उद्देशाने केंद्रीय पंचायतराज मंत्रालयाने 'मागास क्षेत्र अनुदान निधी योजना' सुरू केली. यामध्ये मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्ह्यांची निवड करण्यात आली. या निकषावर महाराष्ट्रातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नांदेड, हिंगोली, धुळे, नंदूरबार, अहमदनगर, यवतमाळ, औरंगाबाद आणि अमरावती या १२ जिल्ह्यांचा समावेश आहे.

**- डॉ. सुरेखा मुळे**

❖❖

## ग्रामसभेचे बळकटीकरण



ग्रामसभांच्या बळकटीकरणासाठी ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणा करण्यात आली. त्यानुसार 'ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी आणि ग्रामसभेच्या महिला सभेपूर्वी वॉर्डसभेची' (प्रभाग सभा) तरतूद करण्यात आली आहे.

या सभेला राज्याच्या किंवा केंद्र सरकारच्या व्यक्तिगत लाभाच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड करण्याचे आणि संबंधित वॉर्डाशी सामूहिक विकास कामांच्या योजनांची शिफारस करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

याच दुरुस्तीन्वये प्रत्येक आम ग्रामसभेपूर्वी महिला सभा घेणे आणि महिला सभेत घेतलेल्या निर्णयांची आणि चर्चेची माहिती आम ग्रामसभेला देऊन त्यावर चर्चा करणे, त्यांनी घेतलेले निर्णय विचारात घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

एक वर्षात घ्यावयाच्या ग्रामसभांची संख्या ६ वरून ४ इतकी कमी करतांना ग्रामसभांचे आयोजन अधिक चांगले आणि फलितदर्शी व्हावे या दृष्टीने अधिनियमात हे बदल करण्यात आले आहेत.

हिंगोली जिल्हा परिषद आणि पंचायत समितीने मागील वर्षी १११ ग्रामपंचायतींमध्ये 'जल ग्रामसभा' घेतल्या आणि लोकसहभागातून २०० बंधारे बांधून पाणी समस्येवर उपाय शोधला.




## जीवनोन्नती अभियान

दारिद्र्य निर्मूलनाच्या कामाला गती देण्यासाठी ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात 'उमेद'ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. हे अभियान राबविण्याकरिता गेल्या दोन वर्षात ग्रामीण भागात सुमारे ७० हजार बचतगटांची क्षमता आणि संस्था बांधणी करण्यात आली. १ लाख ७० हजारांहून अधिक महिला बचतगटांची माहिती 'ऑनलाइन' संकलित करण्यात आली. अभियानातून सुमारे ३५५ ग्रामसंघ स्थापन करण्यात आले. या संघातील महिला बचतगटांना विविध प्रकारचे अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. आतापर्यंत १५ कोटी रुपयांचे फिरते भांडवल आणि ७.५ कोटी रुपयांची इतर मदत उपलब्ध करून दिली आहे. महिला बचतगटांना ३ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर व्याज सवलत देण्यात येते.

**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना**

या योजनेंतर्गत जवळपास २ लाख ७० हजार बचतगट स्थापन झाले आहेत. त्यापैकी २ लाख बचतगट महिलांचे आहेत. महिला बचतगटांना ४ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देतांना उर्वरित ७ टक्क्यांपर्यंतचे व्याज शासनामार्फत बँकांना दिले जाते. योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत १३३९ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले. विविध बँकामार्फत बचतगटांना २७८७ कोटी रुपयांचा अर्थपुरवठा झाला.

# गुणवत्तेत वाढ ; दर्जात सुधार

**प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण घेत असलेल्या २ कोटी विद्यार्थ्यांच्या हिताचे अनेक निर्णय राज्य शासनाने घेतले. यामुळे देशातील शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राने अग्रक्रम राखला. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी, कॉपीमुक्त अभियान, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी बृहत आराखडा, शिक्षकांना इंग्रजीचे प्रशिक्षण, सहायक शिक्षकांच्या मानधनात वाढ, ई- लर्निंग सुविधा, शाळांचे मूल्यमापन, शाळाबाह्य मुलांचा शोध, पटपडताळणी विशेष मोहीम अशा निर्णयामुळे शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा वाढण्यास मदत झाली.**

केंद्र शासनाने २००९ च्या सप्टेंबरमध्ये 'बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क अधिकार' कायदा लागू केला. त्याची अमंलबजावणी राज्यात १ एप्रिल २०१० पासून सुरू करण्यात आली. या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना शाळेत दाखल करून घेणे, त्यांना शाळांमध्ये टिकवून ठेवणे व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे या उद्दिष्टांवर भर देण्यात आला.

या कायद्यांतर्गत बालकांना पाठ्यक्रमावर अधारित पुस्तके, शालेय गणवेश तसेच शालेय साहित्य शासनाकडून मोफत दिले जाते. पहिली ते पाचवीपर्यंतची शाळा विद्यार्थ्यांच्या घरापासून १ किलोमीटर अंतराच्या आत तर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा ३ किलोमीटर अंतरावराच्या आत असावी अशी अट या कायद्यात आहे. त्यामुळे तशा सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. अपंग, कर्णबधिर मुलांनाही गावातल्या किंवा परिसरातल्या शाळेत जाण्याचा अधिकार आहे. मूल १४ वर्षाचे असेल आणि त्याचे शिक्षण अपूर्ण राहिले असेल तर त्याला आठवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्याचा अधिकार या कायद्याने प्राप्त करून दिला आहे. मुलाचे वय जर १० वर्ष असेल तर त्याला इयत्ता चौथीच्या वर्गात प्रवेश घेण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. या कायद्याची वेगाने अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने 'शिक्षण हक्क अभियान' प्रभावीपणे राबविले.

केंद्र शासनाच्या मदतीने राज्यामध्ये



**शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीचा फायदा १ कोटी ६२ लाख विद्यार्थ्यांना.**

## सर्वांना शिक्षण

- ❒ शाळांमधील बनावट प्रवेश शोधण्याची विशेष मोहीम. १ लाख २ हजार शाळांची तपासणी. शाळेची मान्यता काढून घेणे, शिक्षकांच्या सेवा खंडित करणे अशा प्रकारची कारवाई. हजारो बनावट विद्यार्थ्यांची नावे पटावरून काढून टाकल्याने शासनाचे कोट्यवधी रुपये वाचले.
- ❒ शिक्षण अधिकार अधिनियम,२०१० पासून लागू. हा कायदा परिणामकारक आणि कालबद्धरीतीने राबविण्यासाठी प्रयत्न.
- ❒ दुर्बल घटक आणि दुर्लक्षित घटकांच्या २५ टक्के प्रवेशाचा निर्णय.
- ❒ सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, सुविधांची खात्री करून घेण्यासाठी ११०० डी. एड्. महाविद्यालयांची खास तपासणी.
- ❒ महाराष्ट्र स्वयंअर्थसाहाय्यित शाळा अधिनियम २०१३ नुसार २०१३-१४ मध्ये ३,२४५ नव्या शाळा मंजूर.



- ❒ केंद्र शासन प्रायोजित सर्व योजनांचे आराखडे संबंधित अधिकारी आणि हितधारकांशी चर्चा करून तयार. त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेत वृद्धी, १०० टक्के प्रवेश आणि किमान गळती या बाबी साध्य.

**नवे उपक्रम**

- ❒ प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी बृहत् आराखडा तयार. २,३७९ नव्या शाळा मंजूर.
- ❒ शिक्षण क्षेत्रातील व्यापारीकरणास प्रतिबंध आणि विद्यार्थी तसेच पालक यांच्या हितसंरक्षणासाठी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शैक्षणिक शुल्क वसूल करण्यासंबंधी विनिमयन) अधिनियम २०११ संमत.
- ❒ सीमा भागात मराठी माध्यमाच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी १०१ प्राथमिक आणि १७ माध्यमिक शाळा मंजूर.
- ❒ १० वी आणि १२ वीच्या परीक्षांचे वेळापत्रक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जाहीर करण्याची पद्धत सुरू.
- ❒ ब्रिटिश कौन्सिलच्या मदतीने इंग्रजी भाषा सुधारण्यासाठी विशेष कार्यक्रम. या कार्यक्रमांतर्गत ६७,००० प्राथमिक आणि २०,००० माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण.
- ❒ सुधारित राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान योजनेखाली अपघातात मृत तसेच जखमी (पहिली ते बारावीतील) विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक मदत.
- ❒ उच्च माध्यमिक शाळांमध्ये व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम सुरू.

माहिती तंत्रज्ञानासंबंधीचे प्रशिक्षण कार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यात आले आहे. त्या अंतर्गत पहिल्या टप्प्यात ५०० शाळांमध्ये तर दुसऱ्या टप्प्यात २ हजार ४०० शाळांमध्ये प्रशिक्षण सुरू करण्यात आले. या व्यतिरिक्त सर्व शिक्षा अभियानामधून ४ हजार ४४६ संगणक प्रयोगशाळा उच्च प्राथमिक शाळांमध्ये स्थापन करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीयस्तरावरील अभ्यासक्रमाशी समकक्ष असा अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांवरील ताणतणाव कमी करणे आणि समानीकरणाच्या हेतूने २०१० पासून इयत्ता दहावी परीक्षेसाठी सर्वोत्तम पाच (बेस्ट फाईव्ह) हा निकष लागू करण्यात आला.

शाळांच्या पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी राज्यात ५४४४ नवीन प्राथमिक शाळांचे तसेच ६३८९७ अतिरिक्त वर्ग खोल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच शालेय शिक्षण विभागाने ६८ कोटी रुपये खर्च करून दर्जेदार इकोफ्रेंडली ड्यूएल डेस्क राज्यातील शाळांना उपलब्ध करून दिली आहेत.

**– काशिबाई थोरात**

❖❖

## प्रेरणादायी यश



### स्वप्न साकार

शेतकरी आणि आर्थिक दुर्बल घटक असलेल्या कुटुंबातील मुलगी मान्यताप्राप्त इंग्रजी शाळेत जाऊन शिकू लागली आणि मुलीचे बोबडे इंग्रजी बोल कानी पडल्याने आई-वडिलांनाही समाधान झाले. शिक्षण हक्क कायद्यातील, वंचित व आर्थिक दुर्बल घटकातील बालकांना अनुदानित किंवा विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के आरक्षण ठेवल्याने ही किमया साध्य झाली आहे.

आपल्या मुलीनेही नामांकित इंग्रजी शाळेतून शिकावं असे स्वप्न लातूर जिल्ह्यातल्या हरंगुळ येथील श्रीराम बरुरे यांनी पाहिले. परंतु संपूर्ण कुटुंब शेतीवर अवलंबून आणि त्यातच आर्थिक दुर्बल घटकात येत असलेल्या बरूरे यांना आपल्या मुलीला इंग्रजी माध्यमातील शिक्षण देता येईल की नाही असा प्रश्न पडला. त्यांच्या स्वप्नपूर्तीला शिक्षण हक्क कायद्याची साथ मिळाली आणि गरीब कुटुंबातल्या भक्ती बरूरेला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळाला.

लातूर येथे बाजारहाट करण्यासाठी गेलेल्या श्री. बरूरे यांनी ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूलच्या प्रवेशद्वारावर 'वंचित आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी २५ टक्के आरक्षण' असा फलक पाहिला. शाळेत जाऊन त्याची पूर्ण माहिती घेतली. या कायद्यामुळे आपल्या मुलीला इंग्रजी माध्यमातील शाळेत शिकविण्याचे स्वप्न पूर्ण होईल याची त्यांना खात्री पटली. त्यांनी प्रवेशाची सर्व प्रक्रिया पूर्ण केली. त्यामुळे भक्तीला पहिल्या वर्गात प्रवेश मिळाला. गेल्या वर्षभरात भक्तीमध्ये गुणात्मक बदल झाला. या कायद्यामुळे मुलीला आठवीपर्यंत मोफत शिक्षण मिळणार असल्याने बरूरे यांनी शासनाचे आभार मानले आहेत. या संस्थेचे संस्थापक रमेश बिरादर यांनी बरुरे कुटुंबाला मोलाची मदत केली आहे.

# जागतिक दर्जाच्या दिशेने

**बदलत्या काळाची पदचिन्हे सर्वच क्षेत्रात उमटू लागली आहेत. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बदल प्रकर्षाने जाणवत आहेत. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद राहिलेले नाही. यापुढील अर्थव्यवस्था ज्ञानाधिष्ठित असणार आहे. बौद्धिक पात्रतेवर जग जिंकण्याची क्षमता राज्यातील तरुणांमध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षण पद्धतीत काळानुरूप सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. माहिती तंत्रज्ञान आणि जागतिकीकरण यामुळे उच्च शिक्षणाच्या कक्षा अमर्यादरीत्या विस्तारल्या आहेत. या बाबी लक्षात घेऊन उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.**

राज्यातील तंत्रशिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता सुधारण्यासाठी जागतिक बँक आणि केंद्र शासनाच्या सहकार्याने तांत्रिक शिक्षण गुणवत्ता कार्यक्रम दोन टप्प्यात राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यासाठी १० अभियांत्रिकी महाविद्यालये आणि दुसऱ्या टप्प्यासाठी ४ अभियांत्रिकी महाविद्यालये आणि ३ तंत्रनिकेतनांची निवड करण्यात आली आहे.

विधीविषयक शिक्षणाचा विकास, पद्धतशीर शिक्षण, प्रशिक्षण देणे व संशोधन करणे आदी बाबींसाठी मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर या तीन राष्ट्रीय विधी विद्यापिठांची (महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी) स्थापना करण्यात येणार आहे.

**व्यवसाय प्रशिक्षण**

औद्योगिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानामुळे होणारे बदल लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार सुरू करता यावा व त्यांचे तांत्रिक कौशल्य विकसित करता यावे यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास मानकांशी सुसंगत नवीन सुधारित रोजगार सक्षम अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत.

**मुलींना प्रोत्साहन**

मुलींची उच्च शिक्षणातील गळती



सार्वजनिक खाजगी भागीदारीतून २५० हुन अधिक आयटीआय स्थापन. ७५ हजार प्रशिक्षणार्थींना फायदा.

## दर्जेदार उच्चशिक्षण

- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धोरणानुसार ७ जिल्ह्यांमध्ये आदर्श महाविद्यालये.
- विद्यार्थ्यांची कौशल्यवृध्दी करण्यासाठी कौशल्य विकास अभियान.
- २८ आदिवासी निवासी शाळांचे निवासी व्यावसायिक प्रशिक्षण आश्रमशाळांमध्ये (मिनी आयटीआय) रूपांतर.
- सार्वजनिक खाजगी भागीदारीतून २५० हुन अधिक आयटीआय स्थापन. ५५०० कामगारांना आणि ७५ हजार प्रशिक्षणार्थींना फायदा.
- पहिले करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशन केंद्र गडचिरोली येथे.



- रायगड जिल्ह्यातील लोणेरे येथे तंत्रज्ञान विद्यापीठ तसेच गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांसाठी गोंडवना विद्यापीठ.
- मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ.
- मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे न्यायवैद्यक विज्ञान संस्था.
- दारिद्र्य अथवा इतर सामाजिक कारणांमुळे शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी पर्यायी शिक्षण व्यवस्था उपलब्ध होण्यासाठी १७ सामुदायिक महाविद्यालये.
- तीन पाळ्यांमध्ये आयटीआय.
- सार्वजनिक खाजगी भागीदारीतून तंत्रनिकेतने स्थापन करण्यासाठी ६ उद्योगांसोबत करार.
- अल्पसंख्याकांसाठी पाच शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये (रत्नागिरी, कराड, ब्रह्मपुरी, जालना आणि अंबड) दुसरी पाळी. सर्व तंत्रशिक्षण संस्थांमध्ये 'कमवा आणि शिका' योजना.
- ४३ अल्पसंख्याकबहुल भागात अल्पसंख्याकांसाठीच्या आयटीआयमध्ये दुसरी पाळी.
- मुलींसाठी १४ वसतिगृहे उभारणार.
- रत्नागिरी, गडचिरोली, नाशिक, नांदेड आणि अमरावती येथे अतिरिक्त ५ आयएएस प्रशिक्षण केंद्रे.
- पुणे आणि नागपूर येथे दोन आयआयआयटी (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी).
- शासकीय महाविद्यालयांमध्ये मानसेवी प्राध्यापक व गुणश्री (इमेरिट्स) प्राध्यापकांच्या नेमणुकीचा निर्णय. त्यामुळे विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी सहभाग वाढेल.

कमी व्हावी तसेच ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी तालुक्यांच्या ठिकाणी किमान ५० मुलींची व्यवस्था असणारी प्रियदर्शिनी वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत.

**व्यवसाय शिक्षणाचा दर्जा**

राज्यातील व्यवसाय शिक्षणाचा दर्जा उंचावून यातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तशा स्वरूपाचे अभ्यासक्रम सुरू करणे यासाठी राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिनियम २०१४ च्या अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली.

**प्री आयएएस ट्रेनिंग सेंटर**

नाशिक येथे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये व अमरावती येथे शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या जागेत प्री आयएएस ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल.

**- सुधा महाजन**

## प्रेरणादायी यश



# शिष्यवृत्तीमुळे डॉक्टर

पुण्यातील पिंपरी-चिंचवड उपनगरामधील आनंदनगर झोपडपट्टीत राहणाऱ्या अश्विनी कांबळे या बुध्दिमान विद्यार्थीनीने सामाजिक न्याय विभागाच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले. अत्यंत बिकट, खरतर परिस्थितीशी दोन हात करून, प्रसंगी दिव्याखाली व उपाशीपोटी अभ्यास करून अश्विनीने बारावी विज्ञान शाखेत ८० टक्के गुण प्राप्त केले. असे घवघवीत यश प्राप्त करूनही महाराष्ट्रातील कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात तिला पैशाअभावी प्रवेश मिळत नव्हता.

रशियातील साऊथ कॅरोलिना विद्यापीठाची मेडिकल प्रवेशाची जाहिरात एके दिवशी अश्विनीच्या वाचनात आली. त्यानंतर तिने या विद्यापीठात मेडिकल प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरला. एक महिन्यानंतर ऑक्टोबर २००७ मध्ये तिला दिगेस्टन स्टेट मेडिकल ॲकडॅमी, मकाजकाला (Dagestan State Medical Academy, Makhuchkala, Russia) मध्ये प्रवेश मिळाला असल्याचा कॉल प्राप्त झाला. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित झाला होता. मात्र तेथील शिक्षणाचा खर्च परवडण्याजोगा नव्हता. त्याच वेळी तिला सामाजिक न्याय विभागाच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेविषयी माहिती मिळाली. या योजनेसाठी तिने अर्ज केला. गुणवत्तेनुसार ती शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली. विभागाने साडेसहा वर्षाच्या शिक्षणासाठी १२ लाख ५० हजार रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर केली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने १ लाख रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर केली. या शिष्यवृत्तीमुळे आश्विनीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार झाले.

**- सुरेश पाटील**

# सुप्त प्रतिभेला चालना

**क्रीडा संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी राज्य शासन जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. त्या अनुषंगाने नवे क्रीडा धोरण जाहीर करण्यात आले. असे धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्यातील विविध भागांतील प्रतिभावंत खेळाडूंना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा, प्रशिक्षण आणि साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यासाठी राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा जिल्हा पातळीवर निर्माण केल्या जात आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्चदर्जाची कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकरीमध्ये थेट नियुक्ती देण्यात येत आहे. क्रीडा धोरणासोबतच युवकांमधील सुप्त प्रतिभेला चालना देण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण असे युवा धोरणही जाहीर करण्यात आले आहे.**

क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन करण्यासाठी राज्याचे नवीन क्रीडा धोरण २०१२ साली जाहीर करण्यात आले. गाव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा, क्रीडापीठ व क्रीडा प्रबोधिनी संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी क्रीडा विकास निधीची स्थापना, विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर क्रीडा संकुल उभारून तेथे क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे. गावपातळीवर खेळाच्या किमान सुविधा उपलब्ध करुन देण्याचे धोरण राबवण्यात येत आहे.

उदयोन्मुख व प्रतिभावान खेळाडू हेरणे, बालवयातच खेळाची आवड निर्माण करणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करणे हे क्रीडा धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. क्रीडा विकासासाठी अद्ययावत तंत्रज्ञान आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची बाब क्रीडा धोरणात अंतर्भूत करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यामध्ये पंचायत युवा, क्रीडा व खेळ अभियान हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या अभियानाद्वारे ग्रामीण भागात क्रीडा विषयक उपक्रम राबवून तसेच खेळाच्या किमान सुविधा विकसित करून क्रीडा जागृती करण्याचे शासनाचे धोरण आहे.

गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच गट अ गट ब या सेवेत खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यात येते. त्यानुसार अनेक खेळाडूंना थेट नियुक्ती मिळाली आहे. इयत्ता



खेळाडूंकरिता ग्रामीण व नागरी भागात राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुले.

१० व १२ वी तील अनुत्तीर्ण खेळाडूंना त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी २५ विशेष गुण देण्यात येतात. त्याचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना झाला आहे.

बांधकाम सुरू असलेल्या तालुका क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल व विभागीय क्रीडा संकुलाची कामे विविध कालमर्यादेत पूर्ण करणे हे आगामी काळातील क्रीडा विभागाचे उद्दिष्ट आहे.

क्रीडा व खेळांच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या खेळाच्या जिल्हा, राज्य संघटना, क्रीडा संस्था, क्रीडा मंडळे तसेच

**क्रीडा प्रबोधिनी**

राज्यातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू तयार व्हावेत यासाठी नेमलेल्या उच्च तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील खेळ, परंपरा, उपलब्ध क्रीडा सुविधा यांचा सारासार विचार करुन क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली आहे. या सर्व प्रबोधिनीवर देखरेख ठेवणारी तसेच उच्चतम दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण देणारी एक मध्यवर्ती क्रीडा संस्था शिवछत्रपती क्रीडानगरी बालेवाडी, पुणे येथे कार्यरत आहे. महाराष्ट्रातील ८ ते

## खेळाडूंना प्रोत्साहन

- ❒ गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण.
- ❒ खेळाडूंकरिता ग्रामीण व नागरी भागात राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुले.
- ❒ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडू घडवण्यासाठी राज्यक्रीडा विकास निधीची स्थापना
- ❒ खेळाडूंची शिष्यवृत्ती, वयोवृद्ध खेळाडू आणि महाराष्ट्र केसरी योजनेच्या मानधनात वाढ.
- ❒ पुणे, कोल्हापूर, नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर, गडचिरोली, अकोला, औरंगाबाद, प्रवरानगर (जि.अहमदनगर) व सांगली या ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी.

इतर कार्यक्रमाबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक साहाय्य देण्यात येते.

**क्रीडापीठ अंमलबजावणी**

क्रीडापीठ संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणी अंतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी साहाय्यक अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल. खेळाडूंच्या कामगिरीत वाढ करण्यासाठी अत्याधुनिक साहित्य, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन मिळविणे यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल.

क्रीडा सुविधा विकसित करणारे महाराष्ट्र देशातील अग्रक्रमावरील राज्य असून विभाग व तालुकास्तरावर खेळाच्या अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. या सुविधांचा जिल्ह्यातील खेळाडूंना फायदा होत आहे. त्यांच्या मार्गदर्शन व प्रशिक्षणाठी राज्यात १५३ क्रीडा मार्गदर्शकांची पदे मंजूर करण्यात आली आहेत.

१४ वर्षे वयोगटातील मुलांमुलींमधून, ज्यांच्या अंगी उपजत क्रीडागुण असतील अशांची निवड भारतीय क्रीडा प्राधिकरणाने तयार केलेल्या निवड चाचण्याद्वारे (बॅटरी ऑफ टेस्ट) करण्यात येते. अशा खेळाडूंना संबंधित खेळाचे विशेष प्रशिक्षण व शालेय शिक्षणाची सुविधा शासनाच्या संपूर्ण खर्चाने उपलब्ध करून देण्यात येते.

**युवा धोरण**

राज्यातील सामाजिक परिस्थिती, भौगोलिक वैविध्य तसेच स्थानिक स्थरावर उपलब्ध व विकसित होऊ शकणाऱ्या संधी व शाश्वत विकास लक्षात घेऊन शासनाने युवा धोरण २०१२ तयार केले आहे. यात प्रामुख्याने युवा प्रशिक्षण केंद्र, जिल्हा व राज्यस्तरावर युवा पुरस्कार, युवा वसतिगृह, युवा आदान-प्रदान कार्यक्रम, सुविधा केंद्र उभारणी अशा प्रकारे अनेक हितावह योजना या धोरणाद्वारे राबविण्यात येणार आहेत.

**- राहूल भालेराव**

❖❖

## प्रेरणादायी यश



### शूटिंग स्टार ते क्रीडा अधिकारी

घरात अठराविश्व दारिद्र्य, उजाड माळरानावर ४ एकर जमीन त्यातील अडीच एकर कसण्याजोगी, त्यामुळे कुटुंबांची गुजराण करण्यासाठी दुसऱ्याच्या शेतीत राबणाऱ्या भानुदास फरताडे व आसराबाई फरताडे या शेतमजुराच्या मुलाने म्हणजेच नवनाथ फडतरेने आपल्या हलाखीच्या परिस्थितीवर मात करून जागतिक पातळीवर स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. २००६ साली जागतिक नेमबाजी स्पर्धेत ज्युनिअर वर्ल्ड कप चॅम्पियन हा किताब मिळवून महाराष्ट्राचा नावलौकिक जागतिक पातळीवर वाढवला आहे. या त्याच्या कार्याची दखल घेऊन शासनाने नवनाथ फरताडेला जिल्हा क्रीडा अधिकारी (अ वर्ग) या पदावर थेट नेमणूक दिली. त्याला ५ लाख रुपयाचे रोख बक्षिस व क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान शिवछत्रपती पुरस्कार (२००६-०७) देऊन गौरविले आहे.

नवनाथ फरताडे मुळचा बीड जिल्ह्यातील चऱ्हाटा या गावातील आहे. बीडपासून त्याचे गाव २० कि.मी. अंतरावर डोंगराळ भागात वसले आहे. नवनाथमध्ये गुणवत्ता मोठ्या प्रमाणात होती. १९९९ मध्ये नेमबाजी, रायफल शूटिंग या खेळासाठी कोल्हापूर क्रीडा प्रबोधिनीमध्ये त्याची निवड झाली. येथील प्रशिक्षणानंतर नवनाथने विविध स्पर्धांमध्ये मोठे यश मिळवले.

२००५ साली एअर गन आशियाई नेमबाजी स्पर्धा, थायलंड येथे त्याने दोन सुवर्णपदके तसेच २००६ साली आशियाई क्रीडा स्पर्धा दोहा (कतार)येथे कास्यपदक मिळविले. तसेच २००६ साली दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धा श्रीलंका येथे दोन सुवर्णपदके मिळविली. यानंतर नवनाथने ज्युनिअर वर्ल्ड चॅम्पियन हा किताब मिळविला. हे त्याचे सर्वोच्च यश.

# आरोग्यम् धनसंपदा...

सामान्य नागरिकाला गंभीर आजारांवर महागडे वैद्यकीय उपचार घेणे सुलभ व्हावे यासाठी जुलै २०१२ मध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना प्रायोगिक तत्त्वावर आठ जिल्ह्यात सुरू करण्यात आली. वर्षभरात या योजनेंतर्गत जवळपास लाखभर विविध शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या योजनेला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन ही योजना राज्यभर लागू करण्यात आली. योजनेच्या माध्यमातून मार्च अखेरपर्यंत सुमारे दोन लाख लोकांवर विविध शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत.

एक लाख रुपये वार्षिक उत्पन्न केशरी आणि पिवळ्या शिधापत्रिकाधारक असलेल्या सुमारे २ कोटी ११ लाख २८ हजार २२७ कुटुंबांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेंतर्गत ३०४ शासकीय व खासगी रुग्णालये सहभागी झाली आहेत.

**राज्यातील नागरिकांचे जीवनमान उंचवावे यासाठी गेल्या काही वर्षात देशात पथदर्शी ठरणाऱ्या आरोग्यविषयक अभिनव योजनांची सुरुवात महाराष्ट्राने केली आहे. सामान्यांना मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया उपलब्ध करून देण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, ब्लड ऑन कॉल, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, मोफत औषधे यासारख्या योजना सुरू करण्यात आल्या. नागरिकांसाठी या योजना जीवनदायी ठरत आहेत.**

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना**

जीवन अमृत सेवा योजना (ब्लड ऑन कॉल) १९ फेब्रुवारी २०१३ पासून सातारा येथे सुरू करण्यात आली. आता सर्वत्र ही योजना लागू करण्यात आली आहे. रुग्णांना सुरक्षित आणि दर्जेदार रक्त आणि रक्तघटकांचा पुरवठा करणारी ही अभिनव योजना आहे. १०४ क्रमांकावर संपर्क साधल्यास रुग्णाला तासाभरात रक्त उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेमुळे अनेक रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध झाल्याने जीवनदान मिळाले आहे.

**आपत्कालीन वैद्यकीय सेवा**

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीमध्ये पहिल्या सुवर्ण तासामध्ये (Golden Hour) तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपत्कालीन वैद्यकीय सेवा ही योजना १ मार्च २०१४ पासून राज्यात लागू करण्यात आली आहे. १०८ क्रमांकावर संपर्क साधल्यावर अत्याधुनिक रुग्णवाहिका आपदग्रस्तांच्या वैद्यकीय उपचारासाठी दाखल होतात.

**मोफत औषधे**

शासकीय रुग्णालयांमध्ये आणि वैद्यकीय केंद्रामध्ये मोफत औषधांचे रुग्णांना वाटप करण्यात येणार आहे.

ग्रामीण भागात आशा स्वयंसेविका, नर्सेस यांच्या माध्यमातून गर्भवती महिला आणि नवजात शिशूंची देखभाल,गर्भवती महिलांना



रुग्णालयात ने-आण करण्यासाठी मोफत दळणवळणाची सुविधा, मोफत औषधे, पोषक आहार, रक्तविघटनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. यामुळे बालमृत्यू आणि मातामृत्यूच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे. २००६ मध्ये असलेले बालमृत्यूचे प्रमाण ३५ वरून (१००० बालकांमागे) २०१२ मध्ये २५ वर आणण्यात यश आले तर २००६ मध्ये असलेले मातामृत्यूचे एका लाखामागे असलेले १३० एवढे प्रमाण २००९ मध्ये १०४ वर आणण्यात आले.

**स्त्रीभ्रूणहत्येला आळा**

स्त्री भ्रूणहत्येच्या प्रकारांना आळा बसावा यासाठी सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्र तपासणीची मोहीम राबविण्यात आली. आतापर्यंत ४०० प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत. एकूण ३३ डॉक्टरांना शिक्षा सुनावण्यात आली असून ४९ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. त्याचबरोबर सोनोग्राफी यंत्र उत्पादक आणि वितरकांना त्यांची सोनोग्राफी यंत्रे सक्षम प्राधिकाऱ्याकडे नोंदणी करण्याचे बंधनकारक केले आहे. नागरिकांना १८००२३३४४७५ या टोल - फ्री क्रमांकावर आणि www.amchimulgi.gov.in या संकेतस्थळावर तक्रारी नोंदवता येतात.

स्त्री-भ्रूणहत्येसंदर्भात माहिती देण्याऱ्यास त्या घटनेची सत्यता स्पष्ट झाल्यानंतर रु. २५,०००/- देण्याचे शासनाने घोषित केले आहे. या प्रयत्नांमुळे २०११ मध्ये असलेला दर हजार पुरुषांमागे ८६१ स्त्रिया हे प्रमाण वाढून २०१२ मध्ये ८९४ इतके झाले आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालयांमध्ये इमेजिंग सेंटर्सचे आधुनिकीकरण सुरू आहे. या सुविधेमुळे सीटी स्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी, एक्सरे या सेवा राज्यातील ३५ रुग्णालयांमध्ये उपलब्ध झाल्या आहेत.

**बालस्वास्थ्य कार्यक्रम**

राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमाच्या माध्यमातून ० ते १८ वर्षातील बालकांना दुर्धर रोग, अपंगत्व, कमतरता या संदर्भात तपासणीची सुविधा उपलब्ध झाली आहे. भावी तरुण पिढी आरोग्यसंपन्न व्हावी आणि राज्याच्या विकासात त्यांचा हातभार लागावा या दृष्टिकोनातून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

अतिदुर्धर रोगाने पीडित रुग्णांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशा व्यक्तींच्या निवासस्थानी प्रशिक्षित नर्सेस जाऊन वेळोवेळी त्यांच्यावर



## प्रेरणादायी यश

# नवे जीवन मिळाले



''वय झाल्यामुळं मला आजारपण मागं लागलं. त्यातच अचानक हार्ट अॅटॅक आला. काय करावं कळत नव्हतं, घरात पैसे नव्हते. पण, हार्ट ऑपरेशनचा संपूर्ण खर्च राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमुळे मोफत झाला. मी आता ठणठणीत आहे. अडचणीत देव मदत करतात, असे लोक म्हणतात, मला तर या योजनेमुळे देव मिळाला,''असे भावोद्‌गार राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे पहिले लाभार्थी दत्तात्रय मोरे यांनी काढले आहेत.

श्री. मोरे मुंबईतील वरळीतल्या सेंच्युरी मिलमध्ये कामगार म्हणून कामाला होते. मिल बंद पडल्यावर त्यांची नोकरी गेली. ते वरळीतीलच जनता कॉलनीतल्या झोपडपट्टीत राहतात. घरात बायको, दोन मुलं, एक सून. मोठा मुलगा सागर प्रिंटिंग प्रेसमध्ये काम करतो. त्याला महिन्याला तीन हजार रुपये पगार मिळतो. लहान मुलगा विशाल ऑफिसबॉय म्हणून काम करतो. त्याला ४ हजार रुपये पगार मिळतो. मोठ्या मुलाचे लग्न कर्ज काढून केले. त्याची देणी अजून भागवायची होती. अशा परिस्थितीत आजारपण आले. मुलांनी त्यांना केईएम हॉस्पिटलला नेलं. तिथे अॅन्जीओग्राफी केली. ऑपरेशनसाठी साडेतीन लाख रुपये खर्च येणार असल्याचे त्यांना सांगण्यात आले. एवढे पैसे कुठून जमविणार? हा प्रश्न निर्माण झाला. मात्र त्याच वेळी वरळीतल्या एका आरोग्य शिबिरात त्यांना या योजनेची माहिती मिळाली. तिथेच त्यांनी तपासणी केली. या योजनेत मोफत ऑपरेशन होणार असल्याचे त्यांना सांगण्यात आले. या योजनेमधून त्यांचे ऑपरेशन उत्तमरीत्या झाले. आता त्यांची प्रकृती चांगली आहे.

## सुदृढ आरोग्य, सुदृढ महाराष्ट्र

- ❒ गुटखा आणि पान मसाल्याचे उत्पादन, साठवणूक आणि विक्रीवर बंदी.
- ❒ चार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालये आणि त्यांच्याशी संलग्न रुग्णालयांमार्फत सुवर्ण प्राशन संस्कार शिबिरे. या उपक्रमांतर्गत वर्षभरात महाराष्ट्रातील ० ते ६ वयोगटातील सुमारे ५ ते ६ लाख बालकांना लाभ.
- ❒ जननी शिशू सुरक्षा योजनेंतर्गत गरोदर महिला आणि नवजात शिशूंना शासकीय रुग्णालयात मोफत उपचार. रुग्णालयात ने-आण करण्यासाठी मोफत सुविधा.
- ❒ अलिबाग (जि. रायगड), नंदुरबार, सातारा आणि मुंबई येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी.
- ❒ आरोग्य संस्थांचे बळकटीकरण आणि नवीन आरोग्य संस्था उभारणीसाठी बृहत् आराखडा. त्यानुसार १२५२ नवीन आरोग्य संस्थांचे जाळे राज्यभर विणण्यात येणार असून ५६ आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन.
- ❒ आरोग्यसुविधांमध्ये गुणवत्तापूर्ण वाढ झाल्याने बालमृत्यू आणि मातामृत्यूच्या प्रमाणात लक्षणीय घट.
- ❒ गर्भपात केंद्रांच्या तपासणीची धडक मोहीम. आतापर्यंत ४०० प्रकरणे न्यायालयात दाखल. या प्रयत्नांमुळे दर हजार पुरुषांमागे ८६१ स्त्रिया हे प्रमाण वाढून ८९४ इतके झाले.
- ❒ विप्रो कंपनीसोबत करार करून शासनामार्फत सीटी स्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी, एक्स रे या सुविधा राज्यातील ३५ रुग्णालयांमध्ये उपलब्ध. यामुळे जनतेस खाजगी सोनोग्राफी केंद्रांकडे या सुविधांसाठी धाव घ्यावी लागणार नाही.
- ❒ रुग्णांना सुरक्षित आणि तत्काळ रक्त मिळावे यासाठी ब्लड ऑन कॉल-जीवन अमृत सेवा योजना.
- ❒ आपत्कालीन सेवा देणाऱ्या ९७६ रुग्णवाहिका.
- ❒ वार्षिक उत्पन्न एक लाख रुपये असणाऱ्या केशरी व पिवळ्या शिधापत्रिकाधारकांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ. प्रतिवर्ष प्रतिकुटुंबास दीड लाख रुपयांचे विमा संरक्षण. २०१४-१५ साठी ६९८ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित.
- ❒ शासकीय, खासगी अशी ३०४ रुग्णालये या योजनेत सहभागी.
- ❒ या योजनेंतर्गत ९७१ प्रोसिजर्स व १२१ पाठपुरावा सेवांचा समावेश.
- ❒ आतापर्यंत दोन लाख रुग्णांवर शस्त्रक्रिया.



माझे सासरे आजारी होते आणि माझ्या चार वर्षांच्या मुलीला हृदयाचा विकार जडला होता. दोघांच्या आजाराचा ४ लाख रुपये खर्च परवडणे आम्हाला शक्य नव्हते. मात्र राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमुळे हे शक्य झाले. दोघांनाही नवे जीवन मिळाले.

**- विमला तिवारी**

उपचार करणार आहेत.

### शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

या योजनेंतर्गत राज्यातील जिल्हा परिषदांकडील प्राथमिक शाळा (खाजगी व शासकीय), माध्यमिक शाळा (अनुदानित व विनाअनुदानित), आश्रम शाळा, वस्तिशाळा, पर्यायी शिक्षण केंद्रे, समाजकल्याणमार्फत चालविण्यात येणाऱ्या विशेष शाळा, अपंग विद्यार्थी शाळा इत्यादींचा समावेश आहे.

केंद्र शासनाने शालेय आरोग्य तपासणी उपक्रमाची दखल घेऊन ही योजना राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम म्हणून संपूर्ण देशात राबविण्यास सुरुवात केली आहे. या योजनेच्या शुभारंभासाठी महाराष्ट्रातील पालघर तालुक्याची निवड करण्यात आली.

### पूर्णवेळ मार्गदर्शन

रुग्णास चांगल्याप्रकारे व योग्य रुग्णसेवा वेळेत देणे शक्य होण्यासाठी पुणे येथे पूर्णवेळ (२४ x ७) मार्गदर्शन सल्ला केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राशी दूरध्वनी क्रमांक १०४ वर कोणत्याही दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधल्यास आरोग्य कार्यक्रम, वैद्यकीय सल्ला तसेच तज्ज्ञाचे मार्गदर्शन व सल्ला आदी माहिती २४ तास उपलब्ध आहे.

### आरोग्य संस्थांचे भक्कम जाळे

राज्यात १२,९१७ विविध शासकीय आरोग्य संस्थांचे भक्कम जाळे राज्यभर निर्माण करण्यात आले आहे. जनतेच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेऊन आरोग्य व्यवस्थेच्या बृहत आराखड्याला या वर्षी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात नव्याने १ हजार २५७ विविध आरोग्य संस्था स्थापन करण्यात येतील.

### मानवी अवयव प्रत्यारोपण

मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ ची प्रभावी अंमलबजावणी आणि दान केलेले अवयव गरजू रुग्णांना त्वरित उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. अवयव दानाबाबतची प्रक्रिया सुलभ करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. अवयवदान मोहिमेबाबत विशेष जनजागृती करण्यात येत आहे. वाहनचालकांना वाहन परवाना देतांना त्यांच्याकडून अवयवदान संमती पत्र भरून घेण्याची मोहीम मुंबईत सुरू करण्यात आली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अवयवदानाबाबत जागृती व्हावी यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत.

**- अजय जाधव**

# सुरक्षित पाणी, सुदृढ आरोग्य

**ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे तसेच ग्रामीण भागात स्वच्छतेच्या मूलभूत सुविधा, प्रत्येक कुटुंबात शौचालय सुविधा निर्माण करणे हे पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी विविध योजना, कार्यक्रम राबविले जात आहेत. निर्मल ग्राम मोहिमेत देशात महाराष्ट्रातील सर्वाधिक ग्रामपंचायतींनी निर्मल ग्राम पुरस्कार पटकावले आहेत.**

ग्रामीण आणि नागरी भागातील जनतेला पिण्याचे स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी राज्य शासनामार्फत विशेष योजना राबविण्यात येतात. त्याचबरोबर व्यक्तिगत शौचालयासाठी साहाय्य देण्यात येते.

**अनुसूचित जाती आणि नवबौद्ध कुटुंबांना घरगुती पाणी जोडणी आणि वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून देण्याऱ्या सुवर्णजयंती दलितवस्ती नागरी पाणीपुरवठा आणि आरोग्यरक्षण योजनेचा लाभ ६३,०८६ कुटुंबांना.**

जलस्वराज्य प्रकल्प, आपले पाणी प्रकल्प, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, शिवकालीन पाणी साठवण या योजनांमध्ये लोकसहभागाला महत्त्व दिल्याने त्याचे चांगले परिणाम दिसत आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम मागणीनुसार गावातील महिला बचतगटांकडे सोपवण्यात येते.

**सुजल महाराष्ट्र, निर्मल महाराष्ट्र**

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा प्रभावीपणे राबविली जात आहे. राज्यात आतापर्यंत ९ हजार ५२३ ग्रामपंचायती व ११ पंचायत समित्यांना केंद्र शासनाच्या निर्मल ग्राम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

संपूर्ण स्वच्छता अभियानाचे नामकरण २०१२ पासून निर्मल भारत अभियान असे करण्यात आले आहे. या नव्या कार्यक्रमामध्ये दारिद्र्यरेषेवरील सर्व मागासवर्गीय कुटुंबांना, सर्व आदिवासी कुटुंबांना, अल्पभूधारक, महिला प्रमुख असलेल्या कुटुंबांना, अपंग यांना प्रोत्साहन अनुदान दिले जात आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा आणि निर्मल भारत अभियान या दोन मोठया कार्यक्रमांच्या समन्वयातून गावातील बहुतांश कुटुंबांना लाभ देण्यात येत आहे. या अभियानातून दारिद्र्यरेषेखालील सर्व कुटुंबांना आणि दारिद्र्यरेषेवरच्या निवडक कुटुंबांना ४ हजार ६०० रुपये (दुर्गम आणि पर्वतीय भागात ही रक्कम ५ हजार १०० रु.) प्रोत्साहन निधी म्हणून दिले जाते. रोजगार हमी कायदा मधून ४ हजार ५०० रु.पर्यंत मजुरी मिळू शकेल.

**सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन**

ग्रामीण भागातील घनकचऱ्याचे व सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी निर्मल भारत अभियानांतर्गत कुटुंबसंख्येच्या आधारावर अर्थसाहाय्य करण्यात येते. त्यानुसार १५० पर्यंत कुटुंबसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी ७ लाख रुपये, ३०० पर्यंत कुटुंबसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी १२ लाख रुपये, ५०० पेक्षा अधिक कुटुंबसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी २० लाख रुपयांपर्यंत तरतूद करण्यात आली आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम**

केंद्र आणि राज्य शासनामार्फत हा कार्यक्रम महाराष्ट्रात राबविण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत २०१३-१४ आणि २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी १३ हजार २३७ गावे, वाड्या व वस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. २०१३-१४ साठी केंद्र आणि राज्य शासनाकडून एकूण १,४९६.४८ कोटी



रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. राज्यातील १४ हजार ४५३ अंशत: हाताळण्यात आलेल्या वाड्या व वस्त्यांसाठी पिण्याच्या पाणीपुरवठा योजना राबवण्यासाठी कृती आराखड्यास मान्यता देण्यात येऊन कामांना सुरुवात करण्यात आली आहे.

**पाणी योजनांची शाश्वतता**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी करण्यात येत असलेल्या तरतुदीच्या १० टक्के रक्कम स्रोत शाश्वततेसाठी राखून ठेवण्यात येते.

**दरडोई खर्चाच्या निकषात वाढ**

ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीसाठी वापरल्या जाणाऱ्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढ करण्यात आली आहे. यामुळे प्रलंबित पाणीपुरवठा योजना मार्गी लागणार असून त्यांच्या निधीमध्ये वाढ होईल.

**सुरक्षित जल अभियान**

राज्यात 'सुरक्षित जल अभियान' राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील सर्व पाणी स्रोतांचे गुणवत्ता संनियंत्रण, आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती वाढविणे अशी या कार्यक्रमांची उद्दिष्टे आहेत.

**महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान**

नागरी भागासाठी पाणीपुरवठा व मलनि:सारणाच्या व्यापक सुविधा उपलब्ध करणे हा सुजल निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या योजनेसाठी नागरी संस्थांना अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

**नागरी दलितवस्त्यांमध्ये पाणीपुरवठा**

राज्यात सुवर्णमहोत्सवी नागरी दलितवस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना राबविली जात आहे. नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकामधील कुटुंबीयांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य केले जाते.

**जलस्वराज्य टप्पा २**

ग्रामीण भागात मागणी आधारित व लोकसहभागातून प्रत्येक गावाला व गावातल्या प्रत्येकाला शुद्ध व पुरेसे पाणी सातत्याने समूहशक्तीतून प्राप्त व्हावे, स्वच्छ परिसर, निर्मळ शरीर व

## संपूर्ण स्वच्छतेकडे

- अनुसूचित जाती आणि नवबौद्ध कुटुंबांना घरगुती पाणी जोडणी आणि वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती दलितवस्ती नागरी पाणीपुरवठा आणि आरोग्यरक्षण योजना.



- आजवर ६३,०८६ कुटुंबांना या योजनेखाली पाणीपुरवठा आणि आरोग्यरक्षण सुविधा उपलब्ध.
- केंद्र शासनाच्या एकात्मिक कमी खर्चाच्या शौचकूप योजनेंतर्गत नागरी क्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकांना वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी अनुदान. या योजनेंतर्गत केंद्र शासनामार्फत ३९,४८६ वैयक्तिक शौचालये मंजूर. यापैकी २५,६२७ शौचालयांचे बांधकाम पूर्ण.
- आजवर ९,५२३ ग्रामपंचायती तर ११ पंचायत समित्यांना निर्मल ग्राम पुरस्कार.

देखरेख, दुरुस्ती व सर्वेक्षणामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे, ग्रामपंचायतींना या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करणे व त्यांना सक्षम बनविणे, सोप्या पद्धतीने पाणी तपासणीच्या संचाचा वापर करून गावातच पाण्याची तपासणी करणे, लोकांमध्ये स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठ्याबाबत तसेच अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यदायी जीवन यासाठी जलस्वराज्य प्रकल्प २००३ पासून २६ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला. त्यामध्ये ३००७ ग्रामपंचायती समाविष्ट होत्या. त्यापैकी २९५६ ग्रामपंचायतीमध्ये पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

**– इर्शाद बागवान**

## प्रेरणादायी यश



# मळगावचा आदर्श

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील नरेंद्र डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या मळगावची लोकसंख्या ९९४ आहे. गावाने २०१२-१३ मध्ये १०० टक्के पाणीपट्टी आणि घरपट्टी वसुली केली. शिवकालीन पाणी साठवण योजनेमध्ये एक विहीर व राष्ट्रीय पेयजल योजनेमध्ये चार विहिरी घेतल्या आहेत त्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेमध्ये वैयक्तिक लाभधारकांनी तीन सिंचन विहिरी घेतल्या. या विहिरींचे काम पूर्ण झाले आहे. गावामध्ये घनकचरा व्यवस्थापनाचे महत्त्व लोकांना पटले असून ग्रामपंचायतीने प्रति कुटुंब कचरा साठविण्यासाठी एक प्लॅस्टिक भांडे दिले आहे. यामध्ये कचरा साठवून शेतामध्ये त्याची विल्हेवाट लावली जाते.

या गावात २८० बायोगॅस आहेत. त्यामुळे इंधन बचत होत आहे. ग्रामपंचायतीतर्फे निर्धूर चुली गावामध्ये देण्यात आल्या आहेत. गावामध्ये २१ सौरपथदीप बसवण्यात आले आहेत. यामुळे विजेची बचत होण्यास मदत होत आहे.

गावात स्वतंत्र नळयोजनेद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मळगावच्या घाटीतील नैसर्गिक जलस्रोतातून येणारा पाण्याचा साठा करून हे पाणी साठवण टाकीत आणले जाते. तेथे शुद्धीकरण करून जून ते फेब्रुवारी असे ८ ते ९ महिने नैसर्गिक पाण्याचा वापर नळयोजनेसाठी केला जातो. पाण्याच्या स्वयंपूर्ततेबरोबरच गावातील ९० टक्के रस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे. विविध विकास योजना राबवून नावारूपास आलेल्या मळगावची वाटचाल उन्नतीकडे जाणारी आहे.

**- संध्या गरवारे**

# ‘महान्यूज’ आणि मी

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विविध माध्यमांद्वारे राज्यातील नागरिकांशी थेट संवाद साधत असते. आजघडीला विभागाचे महान्यूज हे वेब पोर्टल अतिशय लोकप्रिय झाले आहे. या पोर्टलची निर्मितीप्रक्रिया रंजक आणि प्रेरणादायी आहे. महान्यूजच्या सुरुवातीच्या काळाविषयी टीमचे सदस्य आलोक जत्राटकर आपले अनुभव सांगत आहेत...**

‘महान्यूज आणि मी’ या विषयावर लेख देण्यासंदर्भात फोन आला आणि त्यानंतर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या एका ध्यासपर्वाच्या स्मृतींनी माझ्या मनाचा ताबा घेतला. ’महान्यूज’ या वेबपोर्टलची निर्मिती ही जितकी महत्त्वाकांक्षी योजना होती, तितकीच ती निर्मिती प्रक्रिया खूप जिकिरीची आणि तरीसुद्धा एक समृद्ध अनुभव देणारी होती. त्यामागं तत्कालीन महासंचालक आणि आताच्या सचिव मनीषा म्हैसकर यांची तळमळ आणि सक्रिय मार्गदर्शनाचा वाटा आहे.

’महान्यूज’ या वेबपोर्टलची संकल्पना प्रत्यक्षात येण्यापूर्वी आणि दि. १९ सप्टेंबर २००८ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री (स्व.) विलासराव देशमुख यांच्या हस्ते या पोर्टलचे लोकार्पण होणार होतं. या काळात म्हैसकर मॅडमनी विभागाचा चेहरामोहरा पालटण्याचा ध्यास घेतला होता. ब्लॅक ॲन्ड व्हाईट ’लोकराज्य’चं संपूर्ण फोर कलर ’न्यू लूक लोकराज्य’मध्ये रूपांतर झालेलं होतं आणि त्याचं समाजाच्या सर्व स्तरांतून स्वागत झालेलं होतं. या यशानं प्रेरित होऊन ’ऊर्दू लोकराज्य’चंही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं होतं. मुद्रित माध्यमांमध्ये अशी मोहोर उमटवीत असतानाच इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये आकाशवाणीवरील ’दिलखुलास’ आणि दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील ’जय महाराष्ट्र’ हे कार्यक्रम लोकप्रियतेचे नवनवे उच्चांक प्रस्थापित करत होते. इंटरनेटवर वेबपोर्टल तयार करून राज्यातीलच नव्हे, तर जगभरातील मराठी भाषिक वाचकांशी जोडण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनी होती. त्यातून त्यांनी राज्यभरातल्या अधिकाऱ्यांमधून डॉ. गणेश मुळे यांची टीम लीडर म्हणून तर त्यांच्या जोडीला डॉ. किरण मोघे, मनीषा पिंगळे आणि तांत्रिक बाजू सांभाळण्यासाठी मयुरा देशपांडे, अरविंद जक्कल आणि आर्टिस्ट सुनील डुंभेरे यांची निवड केली होती. ही टीम मॅडमच्या मार्गदर्शनाखाली कामालाही लागली होती. काम प्रचंड होतं. राज्यभरातून दररोज यशकथांच्या अक्षरश: शेकडो इ-मेल्स प्राप्त होत होत्या. त्यामुळं त्यातील मजकूर डाऊनलोड करून घेणं आणि त्यांचं विभागनिहाय, विषयनिहाय सॉर्टिंग करणं ही जबाबदारी प्रामुख्यानं मी, मोघे सर आणि पिंगळे मॅडम यांच्यावर होती. बेलसरे मॅडम, मुळे सर हे प्रशासकीय तर देशपांडे मॅडम, जक्कल आणि तांत्रिक सल्लागार संजीव लाटकर हे तांत्रिक बाजू सांभाळत होते.

अनेक चर्चा, बैठकांमधून ’महान्यूज’मध्ये सुरवातीलाच एकूण तेरा सदरं आणि त्या दिवशीच्या राज्यातील सर्वाधिक महत्त्वाच्या पाच बातम्या असाव्यात, असं नियोजन होतं. सदरांमध्ये महाइव्हेंट, ई-बातम्या, साक्षात्कार (मुलाखती), महासंस्कृती, शलाका, तारांकित (यशकथा), चौकटीबाहेर, आलेख (शासकीय योजनांची तपशीलवार माहिती), फर्स्ट पर्सन, गॅलरी (छायाचित्रे), महाऑप (रोजगार संधी), हॅलो (वाचक प्रतिक्रिया), लोकराज्य (कर्टन रेझर), दिलखुलास व जय महाराष्ट्र (मुलाखतींचे शब्दांकन) यांचा समावेश होता. आणि महत्त्वाचं म्हणजे ही सर्व सदरं आम्हाला रोजच्या रोज अपलोड करावयाची होती- अगदी रविवार आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशीसुद्धा!

ऑनलाइन मिडियावरील मजकुरासाठीची महत्त्वाची पूर्वअट म्हणजे तो शॉर्ट बट स्वीट आणि क्रिस्पी असला पाहिजे. वाचकाला जास्त स्क्रोल न करावे लागता संपूर्ण स्टोरी आशयासह समजली पाहिजे. या आणि आणखी व्यवधानांसाठी डॉ. मुळे यांनी एक स्टाइलबुक तयार केलं. त्यामुळं कन्टेन्टच्या आमच्या टीमवर जबाबदारी होती- ती प्रत्येक स्टोरीला शॉर्ट पण आशयसंपन्न बनवण्याची. लाटकर सरांनी डमी साइट आमच्या हवाली केली. त्यावर काम सुरू झालं. साइटमधल्या त्रुटी जशा लक्षात येतील, तशा आम्ही आमच्या तांत्रिक टीमला आणि वरिष्ठांना सांगत होतो. त्यावर काम केलं जात होतं. ऑफिसमध्ये दररोज



## महान्यूजचा सन्मान

**महान्यूजला विविध संस्थांनी पुरस्कार देऊन उत्कृष्ट कामाची पावती दिली आहे. त्यामध्ये राज्य मराठी विकास संस्थेमार्फत देण्यात येणारा शासकीय वेब पोर्टल प्रवर्गातील प्रथम पुरस्कार आणि माहिती-तंत्रज्ञान विभागातर्फे देण्यात येणारा शासकीय संकेतस्थळासाठीचा गोल्ड पुरस्कार यांचा समावेश होतो. राष्ट्रीय पातळीवर मानाचा समजल्या जाणाऱ्या मंथन पुरस्काराच्या अंतिम फेरीपर्यंत महान्यूजने मजल मारली होती.**



## जिल्हावार बातम्या महत्त्वाच्या

राज्य शासन विविध क्षेत्रात खूप चांगले काम करीत आहे. अनेक क्षेत्रात महाराष्ट्र हे देशपातळीवर पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. शासनाचे हे काम नागरिकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे असल्याने न्यूज पोर्टल हा महत्त्वाचा विषय आहे. जिल्ह्यांच्या बातम्यांसाठी मी हे पोर्टल पाहतो. सर्वांनी ते आवश्य पहावे. महान्यूजचे मोबाईल ॲप हे देखील बदलत्या काळातील महत्त्वाचे पाऊल आहे. – **पृथ्वीराज चव्हाण,** मुख्यमंत्री



## माहिती खात्यात गुणात्मक बदल

माहिती व जनसंपर्क विभागाने मोठ्या जिद्दीने व चिकाटीने 'महान्यूज' हा उपक्रम साकारला. त्यामुळे मी सर्वप्रथम या विभागाचे अभिनंदन करतो. गेल्या दोन टर्ममध्ये माहिती विभागाच्या चांगल्या कामाचा मी गुणात्मक फरक अनुभवतो आहे. महान्यूजमधून आता शासन निर्णय सरळ लोकांपर्यंत जाणार आहेत. हे वेब पोर्टल मराठीतून आहे हे विशेष. हल्ली मराठीवर खूप चर्चा होते. जगभरातले समस्त मराठीजन यामुळे महाराष्ट्राशी जोडले जातील. या उपक्रमाला मी मनापासून शुभेच्छा देतो.

– विलासराव देशमुख, मुख्यमंत्री **('लोकराज्य' ऑक्टोबर २००८ मधून )**

दिवसातून तीनवेळा आमचं ब्रेनस्टॉर्मिंग सेशन व्हायचं ते बेलसरे मॅडमच्या केबीनमध्ये. पहिलं सकाळी कार्यालयात आल्या आल्या–त्यात दिवसभराचं नियोजन केलं जायचं. दुपारी तीनच्या बैठकीत त्या नियोजनाचा फॉलोअप आणि स्टेटस पाहिला जायचा. आवश्यक तिथं ॲडिशन, डिलीशन व्हायचं आणि संध्याकाळी पाचच्या बैठकीत मजकुरावर अंतिम हात फिरवला जायचा.

उद्‌घाटनासाठी वेगळं काय करता येईल, यावर विचारमंथन सुरू असतानाच मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध अष्टपुत्रे यांनी फ्लॅशमध्ये एक प्रोग्राम तयार करून मुख्यमंत्र्यांनी माऊस क्लिक करताच अगदी चौघडे, ढोलताशांच्या गजरासह (हे सारं व्हर्च्युअलच!) एक महाद्वार उघडते आणि त्यातून महान्यूजचा लोगो सामोरा येतो आणि लगेच पोर्टलचे होम पेज उघडते, अशी कल्पना मांडली. महासंचालकांनी ती उचलून धरली.

या उद्‌घाटनानंतर मुख्यमंत्र्यांना पोर्टलबद्दल लाइव्ह प्रेझेंटेशन देण्याचे ठरले होते. त्यासाठी नॅरेशनला म्हैसकर मॅडम आणि प्रेझेंटेशनच्या लॅपटॉपवर मी बसावे, असे ठरले होते. या ठिकाणीही मॅडमच्या क्राइसिस मॅनेजमेंटच्या व्यवधानाची प्रचिती आली. समजा, पोर्टल ऐनवेळी ऑनलाइन उघडले नाही, तर प्लॅन ए, बी आणि सी अशी तयारी करण्यात आली. उद्‌घाटनाच्या दिवशी क्रीम कलरच्या ड्रेसकोडमध्ये महान्यूज टीम 'वर्षा' बंगल्यावर पोहोचली. उद्‌घाटन समारंभ झोकात पार पडला. मुख्यमंत्र्यांनी, मुख्य सचिवांनी या प्रकल्पाबद्दल समाधान व्यक्त केले आणि त्याच्या यशस्वितेसाठी शुभेच्छा दिल्या. मग राजभवनवर तत्कालीन राज्यपाल एस.सी. जमीर आणि मंत्री हर्षवर्धन पाटील यांनाही प्रेझेंटेशन देण्यात आले. राज्यपालांनी त्यावेळी एक मार्मिक प्रश्न उपस्थित केला होता, 'या तुमच्या उपक्रमाचा माझ्या चंद्रपुरातल्या आदिवासी बांधवांना काय लाभ होणार?' त्यावर म्हैसकर मॅडमनीही खूप प्रभावी उत्तर दिलं होतं. त्या म्हणाल्या होत्या, 'सर, आम्ही त्यांच्यासाठीच्या साऱ्या योजनांची माहिती या पोर्टलवर देणार आहोत, जेणेकरून त्याठिकाणी कार्यरत असलेल्या शासकीय, अशासकीय व्यक्ती, संस्थांना त्यांची माहिती होईल आणि सरकारी दफ्तरातून त्यासंदर्भात थेट मदत मिळवून देता येईल किंवा काम करता येईल. भविष्यात त्यांच्यापर्यंत सहज पोहोचण्याचा हा एक महत्त्वपूर्ण पर्याय असेल. तंत्रज्ञानाचे लाभ तिथपर्यंत पोहोचविण्यासाठीच हा उपक्रम आम्ही आरंभला आहे.' आज त्यांच्या या विधानाची प्रचिती आपल्याला येते आहेच.

उद्‌घाटन झालं, पण आता महान्यूज टीमची जबाबदारी वाढली होती. पहिल्या तीन दिवसांतच दहा हजारांहून अधिक हिट्स पोर्टलला मिळाल्या. यावरून लोकांचं पोर्टलवर बारकाईनं लक्ष आहे, हे दिसत होतं.

दरम्यानच्या काळात म्हैसकर मॅडम मुंबई महानगरपालिकेत गेल्या. माझीदेखील बदली झाली. आज ई–प्रशासनाच्या सुवर्ण पुरस्काराची मोहोर महान्यूज टीमच्या कामगिरीवर उमटली आहे. यावेळी पुन्हा म्हैसकर मॅडमच माहिती व जनसंपर्क विभागाच्या सचिव आहेत, ही सुद्धा योगायोगाची गोष्ट. त्यामुळंही महान्यूज टीमचा आनंद आणि उत्साह द्विगुणित झाला असल्यास नवल नाही. महान्यूज टीमच्या कामगिरीचा मला निरतिशय अभिमान आहे. सुवर्ण पुरस्कार प्राप्त महान्यूजच्या पायोनिअर टीमचा एक महत्त्वाचा भाग म्हणून मला काम करता आलं, अशी अभिमानाची भावना मनी दाटून येते आहे. शेवटी आपलं लेकरू ते आपलंच, हेच खरं!

# लाखमोलाची पपई

**जिद्द आणि परिश्रमाची जोड मिळाली तर शेती वरदान ठरू शकते. हा राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून दिलेला संदेश वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील कान्हापूरच्या श्रीमती सविता जीवनराव येळणे यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरविला आहे. नागपूर महामार्गावर असलेल्या शेतीमधील पपईच्या विक्रीतून त्या दररोज एक हजार रुपये मिळवीत आहेत. मागील वर्षी त्यांनी चार लक्ष रुपयाचे पपईचे उत्पादन घेतले.**

वर्ध्यावरुन नागपूरकडे जाताना पवनारनंतर कान्हापूर हे छोटेसे गाव लागते. या गावातील श्रीमती सविता जीवनराव येळणे यांनी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या माध्यमातून नैसर्गिक शेती करण्याला सुरुवात केली. आपल्या एक एकर शेतात तैवान जातीच्या ६०० पपईच्या झाडाची लागवड केली. महामार्गावर श्रीमती येळणे यांचे टिनशेडचे पपई विक्री केंद्र आहे. या टिनशेडमधील पिवळ्या रंगाच्या तजेलदार पपई महामार्गावरुन जाणाऱ्या प्रवाशांना आकर्षित करतात. अनेक प्रवासी गाडी थांबवून २० रुपये किलोप्रमाणे पपईची खरेदी करतात. दररोज ८०० ते १००० रुपयाच्या पपईची विक्री शक्य होते. हा अनुभव इतर शेतकऱ्यांसाठी स्फूर्ती देणारा आहे.

कान्हापूरच्या सामान्य घरातील गृहिणी असलेल्या श्रीमती सविता येळणे यांनी तीन वर्षापासून कापूस, सोयाबीन आदी पारंपरिक पीक न घेता ग्राहकांपर्यंत थेट पोहचता येईल असे फळे व भाज्यांच्या उत्पादनाला सुरुवात केली. अडीच एकरामध्ये मागील वर्षी त्यांनी ४ लक्ष रुपयांचे पपईचे उत्पादन घेतले. यावर्षीही एक एकरामध्ये ६०० पपईचे झाडे लावली आहेत. परंतु मध्यंतरी गारपीट व अतिवृष्टीमुळे पपईच्या बागेवर विपरीत परिणाम झाला तरीही मेहनतीने त्यांनी सर्व झाडे जगविली. त्यामुळे दररोज एक हजार रुपयाचे उत्पादन शक्य झाले. या हंगामात १ लक्ष ५० हजार रुपयाचे उत्पादन होईल, असा विश्वास श्रीमती येळणे यांना आहे. त्यांच्या शेतात पपईसोबतच मिरची, वांगी, काकडी, भेंडी, चवळी आदी नैसर्गिक पिके असून, यामधून एक ते दीड लक्ष रुपयाचे उत्पादन होईल असाही त्यांना विश्वास आहे.

**– अनिल गडेकर**

## बचत गटाचा आधार

गावातील इतर महिलांना सोबत घेवून श्रीमती सविता येळणे यांनी जयभोले शेतकरी स्वयंसहायता बचतगटाची स्थापना केली. या गटामार्फत विविध उद्योगासोबतच दालमीलही सुरू केली आहे. ग्राहकांना नैसर्गिक शेतीमधून दाळ उपलब्ध करुन देतानाच स्वच्छ गहूसुध्दा या दालमिलमधून तयार केल्या जातो. गावातील महिलांना गावातच या माध्यमातून रोजगार उपलब्ध झाला आहे.



महाराष्ट्र शासन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित

# शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...



ऐकायलाच हवा
दिलखुलास संवाद...
@१९५९

सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक

जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...६४७ भाग

MAHARASHTRA
*Ahead*

لوک راجیہ
Urdu Lokrajya

बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ४५ लाख

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
https://dgipr.maharashtra.gov.in

## माध्यमं संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, June 2014.
Date of Publication : 10th of every Month




लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक **प्रल्हाद दत्तात्रय जाधव**, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीड्िया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई – ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
**मुख्य संपादक : प्रल्हाद दत्तात्रय जाधव**